जुलै, २०२६

आपलं मंत्रालय

एक सुसंवाद

अतिथी संपादक

रनजीत सिंह देओल

प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
महाराष्ट्र शासन

जातपात, धर्म, भाषा, श्रीमंती-गरिबी या सर्व सीमारेषा ओलांडून मानवतेचा संदेश देणारी 'पंढरीची वारी' ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे जिवंत प्रतीक आहे. डोळ्यांत विठ्ठल माऊलीच्या भेटीची आर्त ओढ, मुखी अखंड हरिनामाचा गजर, टाळ-मृदंगाच्या निनादात हरपलेले देहभान आणि शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास करतही न संपणारे भक्तीचे चैतन्य, या सर्व अनुभवांचे प्रभावी चित्रण 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' या माहितीपटातून साकारले आहे.

वारीचे सांस्कृतिक वैभव रूपेरी पडद्यावर

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि वॉर्नर ब्रदर डिस्कव्हरी वाहिनी यांच्या संयुक्त विद्यमाने या माहितीपटाची निर्मिती करण्यात आली आहे. सुमारे २२ मिनिटांच्या या माहितीपटात वारीचे आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व आधुनिक चित्रभाषेतून उलगडण्यात आले आहे. मराठीसह हिंदी, इंग्रजी, तमिळ, तेलुगू, बंगाली, कन्नड आणि मल्याळम अशा विविध भारतीय भाषांमध्ये डबिंग करण्यात आल्याने महाराष्ट्राच्या या वैश्विक सांस्कृतिक वारशाला देशभरातील आणि जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याचे व्यापक माध्यम उपलब्ध झाले आहे.

चिखल-माती तुडवत पुढे सरकणाऱ्या दिंड्या, अबीर-गुलालाच्या रंगांनी न्हालेली भक्ती, रिंगण सोहळ्यात दौडणारे अश्व, चंद्रभागेच्या तीरावर उसळलेला भक्तिसागर आणि 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या अखंड गजरात एकरूप झालेले लाखो वारकरी-प्रत्येक दृश्यातून वारीची समता, श्रद्धा आणि अध्यात्माचा स्पर्श जाणवतो. हा केवळ दृश्यांचा प्रवास नसून माणसाला माणसाशी जोडणाऱ्या भक्तिभावाचा अनुभव आहे. शतकानुशतके अखंड सुरू असलेल्या या परंपरेत वय, जात, धर्म, भाषा किंवा सामाजिक स्तर यांचे कोणतेही बंधन नसते. प्रत्येक वारकरी विठ्ठलाचा आणि प्रत्येक माणूस माऊलीचा असा भाव या परंपरेतून दृढ होतो. म्हणूनच वारी ही केवळ धार्मिक यात्रा नसून सामाजिक समतेचा, लोकसंस्कृतीचा आणि मानवतेचा उत्सव आहे. या माहितीपटाच्या माध्यमातून वारीचे उद्दिष्ट, तिच्यामागील तत्त्वज्ञान, संतपरंपरेचा वारसा, वारकऱ्यांच्या मनातील भक्तिभाव आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संचिताचे आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रभावी दस्तऐवजीकरण करण्यात आले आहे. डिजिटल युगात भावी पिढ्यांसाठी हा माहितीपट वारीचा जिवंत सांस्कृतिक ठेवा जपणारा महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरतो.

महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला जागतिक स्तरावर पोहोचविणारे हे पाऊल निश्चितच कौतुकास्पद आहे. भक्ती, समता, मानवता आणि सांस्कृतिक ऐक्याचा संदेश देणारी 'पंढरीची वारी' या माहितीपटाच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत आणि जगभरातील रसिकांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचेल, यात शंका नाही.

७ ७६वा बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

आंतरराष्ट्रीय चित्रपट जगतात फ्रान्समध्ये आयोजित केला जाणारा 'कान्स' आणि इटलीमध्ये आयोजित केला जाणारा 'व्हेनिस चित्रपट महोत्सव' याबरोबरच जर्मनीत होणारा 'बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' म्हणजेच 'बर्लिनाले' हा अत्यंत महत्त्वाचा असा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव समजला जातो. हा महोत्सव या वर्षी १२ फेब्रुवारी ते २२ फेब्रुवारी या दरम्यान बर्लिन येथे संपन्न झाला.

१४ येवा कोकण आपलोच असा...

कोकणात सामाजिक समानता निसर्गातून आलेली...अगदी उपजत... स्त्री-पुरुष सहजपणे वावरतात...संविधान न वाचताही...सामाजिक दऱ्याही लोप पावत चालल्या आहेत. याचं कारण निसर्ग. त्याला तो वचकून असतो. निसर्ग त्याचे पाय जमिनीवर ठेवतो. तोही या मातीत ममतेने पाय रोवून उभा आहे. निसर्ग कोणताही भेदभाव करत नाही. येथील माणूस निसर्ग वाचतो, त्याला निसर्गाने सांगितलेलं आकलन होतं. निसर्गाच्या आणि चांदण्यांच्या साक्षीने तो त्याच्या रंगात मिसळून जातो.

२२ विद्यार्थी विज्ञान वारी

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती आणि नवकल्पनांची क्षमता विकसित करणे ही काळाची गरज बनली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्येही अनुभवाधारित शिक्षण, संशोधन, नवोपक्रम आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरावर विशेष भर देण्यात आला आहे.

२४ मराठी माझी शाळा

महाराष्ट्रात आतापर्यंत इतिहास घडवला, तो जिल्हा परिषदेच्या शाळांनी. या शाळांमधून आजचे उच्चपदस्थ अधिकारी, शास्त्रज्ञ, डॉक्टर, वकील, कवी, लेखक, कृषीतज्ज्ञ, समाजसुधारक तयार झाले आहेत. विशेषतः मराठी माध्यमातून शिकूनही ते कुठेही गुणवत्तेत मागे पडलेले नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उदाहरण आमच्या अनेक पिढ्यांनी अनुभवले आहे.

३१ कॉम्प्युटर व्हिजन : जेव्हा यंत्रांना 'दृष्टी' मिळते!

कॉम्प्युटर व्हिजन हे कृत्रिम बुद्धिमत्तेचे (AI) असे क्षेत्र आहे, जे संगणकाला डिजिटल प्रतिमा (Images) आणि व्हिडिओंमधून उच्च-स्तरीय समज प्राप्त करून देण्यास सक्षम करते. सोप्या भाषेत, जे काम मानवी डोळे आणि मेंदू करतात, तेच काम कॅमेरा, सेन्सर्स आणि अल्गोरिदमच्या मदतीने करणे म्हणजे कॉम्प्युटर व्हिजन.

३५ शिवरायांच्या विचारांची आजची गरज...

छत्रपती शिवाजी महाराज आपल्यात भिनवायचे असतील, तर आधी त्यांचा विचार समजून घ्या. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन्'. त्यांनी आपल्या कृतीतून हा विचार प्रत्यक्षात आणला. परिणामाची (Result) चिंता करून वेळ आणि ऊर्जा वाया घालवण्यापेक्षा, तीच ऊर्जा आपले कर्म सर्वोत्तम करण्यासाठी वापरणे म्हणजेच खरा 'कर्मयोग' होय.

मा. मुख्यमंत्री आणि बालमुलाखतकार ६
७६वा बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव ७
अफलातून माणसं १०
'संस्कृती'... २५व्या वर्षात पदार्पण... ११
दादा माणूस... १२
येवा कोकण आपलोच असा... १४
पाऊस - काही प्राचीन कल्पना १५
स्मार्ट शेती १७
मनाचा आरसा : न्यूरो-लिंग्विस्टिक प्रोग्रामिंग (NLP) समजून घेताना... १८
विद्यार्थी विज्ञान वारी २२
शाळेतील पहिल्या दिवसाच्या स्वागताचा उत्सव : 'शाळा प्रवेशोत्सव' २३
मराठी माझी शाळा २४
राष्ट्रीय सांख्यिकी दिन २६
शिबिरातून मिळालेली प्रेरणा २७
ग्रामीण जीवनाचा जिवंत वारसा : वाडा संस्कृती २८
गगनभरारी २९
कॉम्प्युटर व्हिजन : जेव्हा यंत्रांना 'दृष्टी' मिळते! ३१
मुक्त वाचनालय ३३
शिवरायांच्या विचारांची आजची गरज... ३५
स्वरसाधना ३६
खगोलशास्त्र म्हणजे काय? ३७
संवाद वार्ता ३८
अधिकाऱ्यांचे आयआयएमसी, नवी दिल्ली येथे माध्यम व संवाद प्रशिक्षण यशस्वी ३९

वर्ष ४ थे । अंक ४ । जुलै २०२६

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

आपलं मंत्रालय

संपादन

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संकल्पना, मुखपृष्ठ — अजय भोसले
- व्यवस्थापकीय संपादक — डॉ. किशोर गांगुर्डे, गोविंद अहंकारी
- संपादक — केशव करंदीकर
- सहसंपादक — अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — वृंदावन एंटरप्रायजेस प्रा. लि., सिडको बस स्टॉप, ठाणे (प.)

पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.
Email : aaplemantralay@gmail.com

फॉलो करा...www.twitter.com&MahaDGIPR
लाइक करा...www.facebook.com&dgipr

प्रतिक्रियांचे स्वागत

आपलं मंत्रालय या नियतकालिकाची गुणवत्ता वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आणि सूचनांचे स्वागत आहे.

'आपलं मंत्रालय' नियतकालिक ही गृहपत्रिका असून या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची...

आषाढी वारीदरम्यान पंढरपूरकडे पायी जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांना सुलभ, मोफत व दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री साहाय्यता निधी तथा धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामार्फत 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' या संकल्पनेवर आधारित 'चरण सेवा' उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे. वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक आरोग्यसेवेची प्रभावी जोड देणारा हा उपक्रम राज्य शासनाच्या लोकाभिमुख उपक्रमांपैकी एक ठरत आहे.

राज्यातील ११ जिल्ह्यांमधील पालखी मार्गावरील सुमारे ४०० मुक्कामस्थळी हा उपक्रम राबविण्यात येणार असून, १२ हजारांहून अधिक डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय विद्यार्थी आणि स्वयंसेवक वारकऱ्यांच्या सेवेसाठी कार्यरत राहणार आहेत. या उपक्रमांतर्गत वारकऱ्यांच्या पायांवरील ताण कमी करण्यासाठी औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायांची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, आरोग्य तपासणी; तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयात संदर्भित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आपत्कालीन परिस्थितीसाठी रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात आली आहे.

यासोबतच पालखी मार्गावर आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, संसर्गजन्य व पावसाळी आजारांपासून बचाव, निरोगी जीवनशैली; तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक मार्गदर्शन वारकरी व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. निवडक ठिकाणी योगसत्रांचे आयोजन करून आरोग्यविषयक जनजागृतीलाही चालना देण्यात येत आहे.

वारकरी परंपरेतील निःस्वार्थ सेवा, समर्पण आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांना आधुनिक आरोग्यसेवेची प्रभावी जोड देणारा 'चरण सेवा' उपक्रम आरोग्यदायी, सुरक्षित आणि सुसंघटित वारीसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. पायी प्रवास करणाऱ्या वारकऱ्यांच्या आरोग्याची वेळेवर काळजी घेणे, आवश्यक वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देणे; तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक जनजागृती करणे, या माध्यमातून वारकऱ्यांचा वारीचा प्रवास अधिक सुखकर करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात येत आहे.

वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला वैद्यकीय सुविधांची जोड देत लोकाभिमुख आरोग्यसेवा प्रत्यक्ष वारकऱ्यांच्या दारी पोहोचविण्याची शासनाची भूमिका या उपक्रमातून दिसून येत आहे.

वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक आरोग्यसेवेची जोड देणारा हा उपक्रम राज्य शासनाच्या लोककल्याणकारी, जनकेंद्रित आणि संवेदनशील प्रशासनाची साक्ष देणारा उपक्रम ठरत आहे.

ज्ञानसंवाद

शिक्षण ही केवळ ज्ञानार्जनाची प्रक्रिया नसून सुसंस्कृत, संवेदनशील आणि सक्षम समाज घडविण्याचा भक्कम पाया आहे. बदलत्या काळात शिक्षणाची व्याप्ती वर्गखोल्यांपुरती मर्यादित न राहता विज्ञान, तंत्रज्ञान, संस्कृती, पर्यावरण, सामाजिक जाणीव आणि जीवनकौशल्ये अशा विविध क्षेत्रांपर्यंत विस्तारत आहे. विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, सर्जनशीलता, चिकित्सक दृष्टी आणि सामाजिक बांधिलकी रुजविण्यासाठी शासन विविध उपक्रमांच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्नशील आहे.

शालेय शिक्षण विभाग शिक्षण हे सर्वसमावेशक, समताधिष्ठित आणि विद्यार्थी–केंद्रित बनवण्यासाठी कटिबद्ध आहे. 'शाश्वत विकास लक्ष्य ४' (SDG 4), 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' आणि शिक्षण हक्क कायदा २००९ यांच्या सुसंगत राहून पूर्व–प्राथमिक ते बारावीपर्यंत प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी उच्च गुणवत्तेचे शिक्षण दिले जात आहे. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यावर आधारित सुधारित अभ्यासक्रम, पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तके विकसित करण्यात येत आहेत. 'निपुण भारत' कार्यक्रमांतर्गत मूलभूत साक्षरता, संख्याज्ञानावर भर दिला जात आहे. तसेच शिक्षकांसाठी ५० तासांचे अनिवार्य प्रशिक्षण, शाळा व्यवस्थापन समिती सक्षमीकरण, शैक्षणिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, प्रत्येक विद्यार्थ्याचे नियतकालिक मूल्यमापन व बाल–स्नेही पायाभूत सुविधा आणि मुली व CWSN साठी विशेष सर्वसमावेशक शिक्षण दिले जात आहे. SQAAF द्वारे शाळांचे पारदर्शक मूल्यांकन करण्यात येत असून त्यांचा दर्जा निश्चित करण्यात आला आहे. विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगतीत वाढ करण्यासाठी विभागाने विविध शैक्षणिक व प्रशासकीय सुधारणा सुरू केल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर 'आपलं मंत्रालय'च्या या महिन्याच्या अंकात शिक्षण, संस्कृती, विज्ञान, तंत्रज्ञान, ग्रामीण जीवन आणि व्यक्तिमत्त्व विकास या विविध विषयांचा वेध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. विशेषतः शालेय शिक्षणाला केंद्रस्थानी ठेवत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला दिशा देणाऱ्या उपक्रमांचा आणि विचारांचा परामर्श या अंकातून मांडण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला आनंददायी व प्रेरणादायी बनविणाऱ्या शाळेतील पहिल्या दिवसाच्या स्वागत उत्सवापासून ते 'मराठी माझी शाळा', 'अक्षरांचा प्रवास' आणि 'विद्यार्थी विज्ञान वारी' यांसारख्या लेखांमधून भाषा, वाचनसंस्कृती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याच्या प्रयत्नांचा आढावा घेण्यात आला आहे. बालमनातील जिज्ञासा आणि आत्मविश्वास वृद्धिंगत करणाऱ्या विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मुख्यमंत्र्यांच्या मुलाखतीचाही समावेश करण्यात आला आहे.

या अंकात जागतिक स्तरावरील घडामोडींचाही वेध घेण्यात आला असून, ७६ व्या बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील मराठी संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या कल्पनेची दखल घेण्यात आली आहे. सांस्कृतिक वारसा जपत आधुनिकतेकडे वाटचाल करण्याचा संदेश या लेखातून अधोरेखित होतो. त्याचबरोबर ग्रामीण भागातील लोप पावत चाललेल्या वाडा संस्कृतीचा मागोवा घेत सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे वास्तवही उलगडण्यात आले आहे.

ज्ञानाधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी अचूक, विश्वासार्ह आणि वस्तुनिष्ठ माहितीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या दृष्टीने 'सांख्यिकी– अचूकता आणि वस्तुनिष्ठतेचा वेध' हा लेख आकडेवारीच्या शास्त्रीय वापराचे आणि धोरणनिर्मिती, विकासनियोजन; तसेच प्रशासनातील तिच्या उपयुक्ततेचे महत्त्व स्पष्ट करतो. तंत्रज्ञानाच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता हे परिवर्तनाचे प्रभावी साधन बनत आहे. 'कृत्रिम बुद्धिमत्ता महागाथा' या लेखातून कृत्रिम बुद्धिमत्तेचे विविध पैलू, तिच्या अमर्याद शक्यता आणि भविष्यातील बदलांचा वेध घेतला आहे. कृषी क्षेत्रातील नव्या संधींचा परामर्श घेणारा 'कार्यात्मक अन्नपदार्थ आणि शेतकऱ्यांचा नफा' हा लेख मूल्यवर्धित उत्पादनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या संधी उलगडून दाखवतो, तर 'शिबिरातून मिळालेली प्रेरणा' या लेखातून आत्मविश्वास, नेतृत्वगुण, यांसारख्या जीवनमूल्यांची जपणूक कशी घडते, याचे प्रभावी चित्रण करण्यात आले आहे.

'वेगळ्या वाटा' या नियमित सदरातून शासकीय अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनी पारंपरिक करिअरच्या चौकटीपलीकडे जाऊन विविध क्षेत्रांत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा परिचय करून देण्यात आला आहे. बदलत्या काळातील नव्या संधी ओळखून चिकाटी, सातत्य, परिश्रम आणि नावीन्यपूर्ण दृष्टिकोन यांच्या बळावर यशाचे नवे मानदंड निर्माण करणाऱ्या या तरुणांची प्रेरणादायी वाटचाल वाचकांसमोर मांडण्यात आली आहे. समाजातील नव्या पिढीला स्वतःच्या आवडी, क्षमता आणि कौशल्यांनुसार करिअरची दिशा निवडण्याचा आत्मविश्वास देण्याबरोबरच पारंपरिक चौकटींपलीकडे विचार करण्याची प्रेरणाही या सदरातून मिळते. शिक्षण, संस्कार, नवोपक्रम, विज्ञान, संस्कृती आणि विकास यांचा समन्वय साधणारा हा अंक आपणास प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धक ठरेल, असा विश्वास आहे.

रनजीत सिंह देओल
(अतिथी संपादक)

मा. मुख्यमंत्री आणि बालमुलाखतकार

रायगड जिल्हा परिषदेच्या 'पीएमश्री शाळा वहाळ'मधील तो वर्ग एरवीसारखाच होता; पण आजच्या दिवशी तिथे एक वेगळीच ऊर्जा आणि कमालीचा उत्साह ओसंडून वाहत होता. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर अनेक मान्यवर समोर उपस्थित होते. याच गर्दीत इयत्ता चौथीमध्ये शिकणारी एक लहान; पण कमालीची चुणचुणीत मुलगी उभी होती–तिचे नाव यशश्री मिठू घुले. तिच्या चेहऱ्यावर भीतीचा लवलेशही नव्हता, उलट डोळ्यांत एक वेगळीच चमक होती. आपली शिक्षिका साधना पाटील यांनी दिलेल्या मार्गदर्शनावर आणि स्वतःच्या आत्मविश्वासावर विसंबून, यशश्री थेट मुख्यमंत्र्यांच्या समोर उभी राहिली आणि तिने अत्यंत आत्मविश्वासाने मुख्यमंत्र्यांचे स्वागत करत त्यांच्या मुलाखतीला सुरुवात केली.

एका छोट्याशा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थिनीने मुख्यमंत्र्यांना थेट प्रश्न विचारायला सुरुवात करावी, हा अनुभव तिथे उपस्थित असलेल्या प्रत्येकासाठी थक्क करणारा होता. यशश्रीने हातातील फाईल उघडून पहिलाच प्रश्न अगदी थेट विचारला, ''सर, आपले नाव काय?'' बालसुलभ; पण अत्यंत स्पष्ट आवाजात विचारलेल्या या प्रश्नावर मुख्यमंत्र्यांच्या चेहऱ्यावर एक छानसे हसू उमटले. त्यांनीही तितक्याच आपुलकीने उत्तर दिले, ''माझे नाव देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस.'' त्यानंतर यशश्रीने मुख्यमंत्र्यांच्या राजकीय आणि सामाजिक प्रवासाविषयी विचारण्यास सुरुवात केली. तिने विचारले, ''सर, आपल्या या प्रवासाची सुरुवात कशी झाली?'' मुख्यमंत्र्यांनी तिच्या डोळ्यात पाहत अगदी सोप्या शब्दांत भूतकाळात डोकावत सांगितले की, त्यांच्या या प्रवासाची सुरुवात एका सामान्य 'विद्यार्थी चळवळीतून' झाली होती. विद्यार्थी परिषदेत काम करताना विद्यार्थ्यांचे छोटे–मोठे प्रश्न सोडवता–सोडवता ते हळूहळू इथपर्यंत कसे पोहोचले, हे त्यांनी अत्यंत रंजकतेने तिला सांगितले.

संवाद पुढे सरकत असताना यशश्रीने आणखी एक प्रगल्भ प्रश्न विचारला, ''सर, तुमच्या या सामाजिक कामात कोणती मोठी आव्हाने आली आणि तुम्ही त्यावर कशी मात केली?'' यावर मुख्यमंत्र्यांनी तिला अगदी एखाद्या मित्राप्रमाणे समजावून सांगितले. ते म्हणाले, ''जेव्हा आपण समाजात काहीतरी चांगले बदल घडवू इच्छितो, तेव्हा तिथल्या जुन्या व्यवस्थेला बदलावे लागते. व्यवस्था बदलताना अनेक अडचणी आणि आव्हाने येतात; पण अशा वेळी आपल्यासमोर छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महान आदर्श आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य स्थापन करताना स्वतःच्या माणसांशी आणि मुघलांशीही लढा दिला, तर बाबासाहेबांनी आपल्याला संविधानाच्या माध्यमातून मानवी हक्क आणि समतेची शिकवण दिली. त्यामुळे कितीही संघर्ष करावा लागला, तरी आपण प्रामाणिकपणे चांगले काम करत राहिलो की, त्यात नक्कीच यशस्वी होतो.'' मुख्यमंत्र्यांचे हे विचार ऐकताना तिथे उपस्थित असलेले शिक्षण विभागाचे अधिकारी आणि पालकांचे चेहरे अभिमानाने भरून आले होते.

मुलाखतीचा शेवट तर अधिकच रंजक आणि मजेशीर ठरला. यशश्रीने विचारले, ''सर, आपल्या संपूर्ण कारकिर्दीतील असा कोणता अनुभव आहे, जो आजपर्यंत तुमच्या लक्षात आहे आणि तुम्हाला प्रेरणा देतो?'' यावर मुख्यमंत्र्यांनी हसतमुख चेहऱ्याने आणि अत्यंत हजरजबाबीपणे उत्तर दिले, ''माझ्या आयुष्यात अनेक मोठे अनुभव आहेत; पण आजच्या घडीला तुझी ही घेतलेली मुलाखत माझ्या नेहमी लक्षात राहील आणि मला प्रेरणा देत राहील!''

मुख्यमंत्र्यांच्या या उत्तराने संपूर्ण वर्गात एकच हशा पिकला आणि सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला. शेवटी यशश्रीने मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या मौल्यवान वेळेबद्दल त्यांचे मनापासून आभार मानले आणि मुख्यमंत्र्यांनीही तिच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. अन् तेही वहाळ शाळेच्या या चिमुरड्या 'यशश्री'चे फॅन झाले!

एका शिक्षिकेने घेतलेले परिश्रम आणि जिल्हा परिषद शाळेतील मुलीची ही प्रगल्भ पातळी पाहून, तेथील 'डिजिटल लॅब' आणि 'प्रवेशोत्सव' खऱ्या अर्थाने सार्थ ठरल्याची जाणीव प्रत्येकाला झाली.

टीम आपलं मंत्रालय

७६वा बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

प्रशांत साजणीकर

आंतरराष्ट्रीय चित्रपट जगतात फ्रान्समध्ये आयोजित केला जाणारा 'कान्स' आणि इटलीमध्ये आयोजित केला जाणारा 'व्हेनिस चित्रपट महोत्सव' याबरोबरच जर्मनीत होणारा 'बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' म्हणजेच 'बर्लिनाले' हा अत्यंत महत्त्वाचा असा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव समजला जातो. हा महोत्सव या वर्षी १२ फेब्रुवारी ते २२ फेब्रुवारी या दरम्यान बर्लिन येथे संपन्न झाला. यंदाचे या महोत्सवाचे ७६ वे वर्ष होते, यावरून या महोत्सवाचे महत्त्व लक्षात यावे.

गेली काही वर्षे महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ 'कान्स' चित्रपट महोत्सवात सहभागी होऊन निवडक मराठी चित्रपट तेथील चित्रपट बाजारात प्रदर्शित करण्यासाठी घेऊन जात असले, तरी 'बर्लिनाले'मध्ये महामंडळाने अद्याप सहभाग नोंदवला नव्हता. या वर्षी महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या पुढाकाराने महामंडळाने प्रथमच या वर्षी बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आपला सहभाग नोंदवला.

७६वा बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव १२ ते २२ फेब्रुवारी या दरम्यान बर्लिन (जर्मनी) येथे संपन्न झाला. केवळ चित्रपट प्रदर्शनापुरता मर्यादित न राहता हा महोत्सव म्हणजे जागतिक चित्रपट उद्योगासाठी सर्जनशीलता, व्यवसाय, तंत्रज्ञान आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याचे महत्त्वपूर्ण व्यासपीठ आहे. महाराष्ट्र शासनाने या महोत्सवातील पहिला अधिकृत सहभाग यंदाच्या पर्वात नोंदवला, त्या निमित्ताने...

हा महोत्सव केवळ चित्रपट प्रदर्शनापुरता मर्यादित नसून आंतरराष्ट्रीय स्तरावर चित्रपट व्यवसाय, सहनिर्मिती (को-प्रॉडक्शन), वितरण, तंत्रज्ञान, नेटवर्किंग आणि चित्रपट धोरणे यांविषयीच्या देवाण-घेवाणीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे व्यासपीठ आहे. दरवर्षी जगभरातील हजारो चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, वितरक, गुंतवणूकदार, फिल्म कमिशन्स आणि सांस्कृतिक संस्था या महोत्सवात सहभागी होतात. या महोत्सवामुळे नव्या चित्रपटांना जागतिक प्रेक्षक मिळण्यास मदत होते. तसेच विविध देशांना त्यांच्याकडील चित्रपट उद्योग आणि चित्रीकरण स्थळे यांची जागतिक स्तरावर प्रसिद्धी करण्याची संधी मिळते.

यंदाच्या महोत्सवामध्ये सुमारे ७०० पेक्षा अधिक चित्रपटांचे प्रदर्शन विविध विभागांमध्ये करण्यात आले. जवळपास १,५०० हून अधिक चित्रपटांचे स्क्रिनिंग्ज आयोजित करण्यात आले होते. सुमारे २० ते २२ चित्रपट मुख्य स्पर्धा विभागात 'गोल्डन बेअर' पुरस्कारासाठी स्पर्धेत होते. जगभरातील १०० पेक्षा अधिक देशांतील हजारो प्रतिनिधी या महोत्सवात सहभागी झालेले होते. यावरून या महोत्सवाचे महत्त्व लक्षात येते.

मुख्य चित्रपट महोत्सवात बर्लिनालेमध्ये चित्रपटांचे प्रदर्शन विविध विभागांमध्ये केले जाते. ज्यामुळे जगभरातील वेगवेगळ्या शैलीतील आणि विषयांवरील चित्रपटांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध होते. मुख्य स्पर्धा ही सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठी दिल्या जाणाऱ्या 'गोल्डन बेअर' आणि 'सिल्व्हर बेअर' या पुरस्कारासाठी ओळखली जाते. याचबरोबर 'बर्लिनाले स्पेशल' या विशेष विभागात खास प्रीमिअर स्क्रिनिंग केले जाते. 'पॅनोरमा' सदरात सामाजिक व समकालीन विषयांवरील चित्रपट प्रदर्शित केले

जातात, तर 'फोरम' या विभागात प्रयोगशील आणि स्वतंत्र चित्रपट पाहण्याची संधी सिनेरसिकांना मिळते. त्याचबरोबर 'जनरेशन' विभागात बाल आणि युवा प्रेक्षकांसाठी चित्रपट, 'बर्लिनाले सीरिज'मध्ये वेबसीरिज आणि मालिका, तर विशेष विभागात माहितीपट प्रदर्शित केले जातात. याचबरोबर येथे भरविण्यात आलेल्या 'युरोपियन फिल्म मार्केट'चे महत्त्वही अनन्यसाधारण असे होते. या युरोपियन फिल्म मार्केटमध्ये जगभरातील हजारो चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, वितरक, गुंतवणूकदार, फिल्म कमिशन्स, विविध देशांतील सिनेविषयक संस्था सहभागी होऊन आपापले चित्रपट उद्योग, चित्रीकरण स्थळे यांची

जागतिक स्तरावर जाहिरात आणि प्रसिद्धी करत असतात. यंदाच्या महोत्सवामध्ये १२,५०० इतक्या व्यावसायिकांनी युरोपियन फिल्म मार्केटला भेट दिली. ६०० पेक्षा जास्त चित्रपट विक्रीसाठी प्रदर्शित करण्यात आले होते. यंदा सुमारे ६०० पेक्षा अधिक दालने या मार्केटमध्ये होती. हजारो उद्योग प्रतिनिधी, वितरक, खरेदीदार आणि गुंतवणूकदार येथे उपस्थित होते. चित्रपटांचे वितरण हक्क, सहनिर्मिती प्रकल्प, वित्तपुरवठा, विपणन या बाबतीतील व्यवहार आणि चर्चा होते. अनेक देश आपले फिल्म कमिशन, चित्रीकरण स्थळे, स्टुडिओ सुविधा आणि प्रोत्साहनपर योजना सादर करून आंतरराष्ट्रीय चित्रपट निर्मिती घटकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात. स्पेनसारखा देश सातत्याने गेली २० वर्षे या महोत्सवात सहभागी होत आला आहे. यावरून या मार्केटचे महत्त्व अधोरेखित होते.

महामंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाने प्रथमच या महोत्सवात राज्याचा सहभाग नोंदवला. युरोपियन फिल्म मार्केटमध्ये महामंडळाचे स्वतंत्र दालन उघडण्यात आले होते. या दालनाचे उद्घाटन सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आले. व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील आणि सांस्कृतिक कार्य सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्यासमवेत मा. मंत्री महोदयांनी युरोपियन फिल्म मार्केटमधील दालनांना भेटी देऊन विविध देशांमधील चित्रपटविषयक योजना, सुविधा आणि तंत्रज्ञान यांची माहिती करून घेतली.

युरोपियन फिल्म मार्केटमध्ये राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ (एनएफडीसी) आणि 'वेव्हज् बाजार' यांच्यामार्फत आयोजित परिसंवादामध्ये महाराष्ट्र शासनाने सहभाग नोंदवला. राज्य शासनाच्या विविध योजना, त्याचप्रमाणे चित्रनगरी, एन. डी. स्टुडिओ, कोल्हापूर चित्रनगरी या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या विविध सुविधांबाबत व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांनी सादरीकरण केले. याच परिसंवादामध्ये सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनीदेखील महाराष्ट्र शासन चित्रपट क्षेत्राच्या विकासासाठी करत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. ते यावेळी म्हणाले की, भारत हा जगातील सर्वात जास्त चित्रपट निर्माण करणारा देश आहे, तर भारतीय चित्रपटजगताचा मुंबई आणि महाराष्ट्र हा केंद्रबिंदू आहे. आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांसाठी जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध आहे. तसेच महाराष्ट्र राज्यात गुंतवणूक करण्याचे आवाहन करत, तंत्रज्ञान आणि इतर क्षेत्रांत विविध घटकांशी सामंजस्य करार करण्यास राज्य शासन उत्सुक असल्याचेही त्यांनी याप्रसंगी आवर्जून नमूद केले. त्याचप्रमाणे बर्लिन महोत्सवामध्ये यापुढे महाराष्ट्र शासनाकडून मराठी चित्रपट प्रदर्शित करण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी यावेळी केली.

बर्लिन अभ्यास दौऱ्यामध्ये हॅंबर्ग येथील अत्यंत अद्ययावत अशा स्टुडिओ बर्लिन येथे भेट देऊन तेथील सुविधांची माहिती घेण्यात आली. विस्तीर्ण अशा परिसरात हा स्टुडिओ उभारण्यात आलेला असून तेथील विविध आकारांच्या कलागारांमध्ये चित्रीकरणासाठी अद्ययावत अशा सुविध उपलब्ध करून देण्यात आलेल्या होत्या चित्रपट, वेबमालिका, रिॲलिटी-शो अशा विविध कार्यक्रमांसाठी या ठिकाणी चित्रीकरणासाठी सुविधा उपलब्ध केल्या होत्या. अद्ययावत मेकअप रूम्स, निर्मितीपश्चात करावयाच्या सुविधा, कॉन्फरन्स रूम्स, उपाहारगृहे अशा विविध सोयींनी जागतिक दर्जाच्या सुविधा या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आलेल्या होत्या. गोरेगावमधील चित्रनगरीमधील पायाभूत सुविधा अद्ययावत करण्याची; तसेच पुनर्विकास करण्याची कार्यवाही सुरू असून त्या दृष्टीने स्टुडिओ बर्लिनची भेट अतिशय उपयुक्त ठरली.

युरोपमध्ये समांतर चित्रपट प्रदर्शित करणे आणि तो पाहण्यासाठी रसिकांना चित्रपटगृहे उपलब्ध करून देण्याकरिता विविध उपक्रम राबवले जातात. 'किनो सिनेमा' ही त्यांपैकीच एक चळवळ. सर्वसाधारणपणे मुख्य प्रवाहातील मोठ्या बजेटचे चित्रपट हे मल्टिप्लेक्स आणि मोठ्या थिएटरमध्ये प्रदर्शित केले जातात. यामध्ये कमी बजेटमध्ये तयार केल्या जाणाऱ्या आणि प्रायोगिक चित्रपटांना संधी मिळतेच असे नाही. यासाठी छोट्या; परंतु आधुनिक सोयींनी सुसज्ज अशा चित्रपटगृहांची एक चळवळच तिथे राबवली गेली आहे. किनो सिनेमा या नावाने ती ओळखली जाते. साधारण ५० ते १०० आसन क्षमता असलेल्या; परंतु अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज अशा छोट्या थिएटर्सचे एक संकुल उभारले जाते. त्या ठिकाणी विविध भाषांतील समांतर चित्रपट पाहण्याची संधी रसिकांना उपलब्ध करून दिली जाते. आम्ही भेट दिली त्यावेळी एका चित्रपटगृहामध्ये प्राथमिक शाळेतील मुले बीबीसीवरील एक माहितीपट पाहण्यासाठी तिथे आलेली होती. यावेळी

महाराष्ट्रातील तंबू चित्रपट प्रदर्शन सुविधेची माहिती तेथील संचालकांना देण्यात आली. किनो सिनेमासारखी चळवळ मराठी चित्रपटांसाठी उपयुक्त ठरेल, याबाबतही या प्रसंगी चर्चा करण्यात आली.

जर्मनीसह अनेक युरोपीय देशांत आता मराठी माणसे मोठ्या प्रमाणात स्थायिक झालेली आहेत.

बर्लिन

मराठी तरुणांकडून आयोजित केल्या जाणाऱ्या महोत्सवांसाठीही काही योजना करता येईल काय आणि मराठी चित्रपटांना आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रदर्शित करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील, यावर सकारात्मक चर्चा झाली.

स्पेनमधील Escola Superior de Cinema (ESCAC) Audiovisuals de Cata ही एक महत्त्वाची चित्रपटविषयक शिक्षणसंस्था आहे. ही संस्था महाराष्ट्रातील तरुणांसाठी काही अभ्यासक्रम राबविण्यास; तसेच त्या अनुषंगाने शिष्यवृत्ती देण्यास उत्सुक असून, राज्य शासनाच्या वतीने या संस्थेबरोबर महामंडळाने एक सामंजस्य करार या महोत्सवादरम्यान स्वाक्षरीत केला. शैक्षणिक आदान–प्रदान, त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये सहकार्य करण्यासाठी या सामंजस्य कराराच्या माध्यमातून चालना मिळणार आहे.

महोत्सवादरम्यान महाराष्ट्राच्या प्रतिनिधी मंडळाने विविध देशांतील प्रतिनिधींशी संवाद साधला. बैठकींमध्ये सहनिर्मिती (को–प्रॉडक्शन) संधी, महाराष्ट्रातील चित्रीकरण स्थळे, चित्रनगरीतील स्टुडिओ सुविधा, आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये सहकार्य आणि चित्रपटविषयक प्रशिक्षण व शैक्षणिक सहकार्य या मुद्यांवर चर्चा झाली. या बैठकींमुळे महाराष्ट्रासाठी सिनेमा क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने भविष्यातील आंतरराष्ट्रीय सहकार्याची शक्यता निर्माण झाली.

महोत्सवाच्या दरम्यान अशा तरुणांशी संवाद साधण्यात आला. यामध्ये रमेश होलबोले हा तरुण एक मराठी चित्रपट तयार करत असून, त्याला जर्मन नागरिकांकडून सहकार्य मिळत आहे, तर हर्षल पंथे हा आणखी तरुण चित्रकर्मी छत्रपती राजाराम महाराज यांच्यावर एक ॲनिमेशन चित्रपट तयार करत आहे. महाराष्ट्र शासनाची आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांना साहाय्य करण्याची योजना असून त्या योजनेंतर्गत परदेशात बर्लिन महोत्सवात अनेक देशांनी त्यांच्या चित्रपट प्रोत्साहन योजना सादर केल्या. अनेक देश परदेशी चित्रपटनिर्मिती आकर्षित करण्यासाठी कर सवलती, अनुदाने आणि आर्थिक प्रोत्साहन देतात. यामुळे चित्रपटनिर्मितीसाठी स्पर्धात्मक आर्थिक प्रोत्साहनाची गरज, महामंडळाची विपणनविषयक सक्रिय भूमिका आणि आंतरराष्ट्रीय सहनिर्मितीला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे, या बाबी अधोरेखित झाल्या.

बर्लिनालेसारख्या आंतरराष्ट्रीय महोत्सवातील सहभागामुळे मराठी चित्रपट उद्योगासाठी अनेक संधी खुणावत आहेत. मराठी चित्रपटांचे जागतिक प्रदर्शन व वितरण, आंतरराष्ट्रीय निर्मात्यांसोबत सहनिर्मिती प्रकल्प यांविषयीची चर्चा, तसेच महाराष्ट्राला आंतरराष्ट्रीय पातळीवर 'शूटिंग डेस्टिनेशन' म्हणून पुढे आणण्याची, शिवाय युरोपमधील मराठी 'भाषक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याची आणि दादासाहेब फाळके चित्रनगरी, एन. डी. स्टुडिओ, कोल्हापूर चित्रनगरी यांसारख्या राज्यातील स्टुडिओ सुविधांचा प्रचार करण्याची संधी या निमित्ताने प्राप्त झाली आहे.

बर्लिनालेच्या अभ्यास दौऱ्यातून महत्त्वाच्या बाबी लक्षात आल्या, ज्या राज्य शासनामार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या 'चित्रपताका' या मराठी चित्रपट महोत्सवासाठीदेखील उपयुक्त ठरू शकतात. अशा महोत्सवामध्ये चित्रपट प्रदर्शनासोबत मजबूत फिल्म मार्केट; तसेच आंतरराष्ट्रीय सहनिर्मिती प्रकल्पांना प्रोत्साहन देणारे व्यासपीठ असणे गरजेचे आहे. त्याचबरोबर जागतिक स्तरावर प्रभावी ब्रँडिंग आणि विपणनाची जोड देणे; तसेच उद्योग, प्रेक्षक व विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र कार्यक्रम आणि सिनेपर्यटन व चित्रीकरण स्थळांची प्रसिद्धी यांवरही भर देणे आवश्यक आहे. या अनुभवांचा उपयोग करून भविष्यात महाराष्ट्रात प्रस्तावित आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अधिक प्रभावीपणे आयोजित करता येईल.

बर्लिनाले हा केवळ चित्रपट महोत्सव नसून जागतिक चित्रपट उद्योगासाठी सर्जनशीलता, व्यवसाय, तंत्रज्ञान आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याचे महत्त्वपूर्ण व्यासपीठ आहे. महाराष्ट्र शासनाचा या महोत्सवातील पहिला अधिकृत सहभाग हा मराठी चित्रपट उद्योगाला जागतिक स्तरावर नेण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरलेला आहे. या सहभागामुळे महाराष्ट्रातील चित्रपट उद्योग, चित्रनगरीतील सुविधा आणि राज्यातील चित्रीकरण स्थळे यांची आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख निर्माण होण्यास मदत होईल आणि भविष्यात मराठी चित्रपटांना जागतिक बाजारपेठ मिळण्याच्या दृष्टीने संधी वाढतील.

(सहसचिव, महाराष्ट्र शासन व सहव्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ.)

अफलातून माणसं

सतीश जोंधळे

शासकीय, निमशासकीय नोकरीत सेवेत आल्यावर आपल्याला आपला सेवानिवृत्त दिनांक माहीत असतो. त्यानुसार नियोजन करून अनेक सेवानिवृत्त लोक आनंदी जीवन जगतात.

काही लोकांना कौटुंबिक अडचणीमुळे अन् अजून मुलं आर्थिक स्थिर नसल्याने नाइलाजाने सेवानिवृत्त झाल्यावर कंत्राटी काम स्वीकारावे लागते. काही जणांना आता घरी काय करावे म्हणून रोजगार हमी योजना सारखे यात पुन्हा यायचे असते.

सेवा काळात असलेल्या सुविधा (घर, गाडी, राजशिष्टाचार, विविध समारंभ सहभाग इत्यादी) आता जाणार, या भीतीने भयकंपित कुटुंब त्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याला अशी कंत्राटी सेवा वा इतर नेमणूक घ्यायला भरीस घालतात. मुंबई व दिल्लीमध्ये अनेक मोठ्या पदांचा उपभोग घेतलेल्या सेवानिवृत्त व्यक्तीने खासगीमधील मोठी नोकरी अन् सुविधा सोडून शासकीय क्षेत्रात केवळ power withdrawal symptoms सहन करावे लागू नये, म्हणून कमी मानधनात सेवा केली होती. हे सर्वांकडे होत असते.

काही लोकांचे ज्ञान व अनुभव अजूनही विभागाला आवश्यक असल्याने त्यांना बोलवून घेतले जाते. अशा प्रकारे सेवानिवृत्त झाल्यावर पदस्थापना मिळवून येणाऱ्या लोकांचे आदेश पाहिल्यावर 'ये चले अतीव राष्ट्रसेवा करने...' अशी कुत्सित हेटाळणी करणारे कडक शिस्तीचे अतिवरिष्ठ, रिटायर झाल्यावर दुसऱ्याच महिन्यात इतरत्र चाकरीत आल्याचे पाहिले आहे. अशी विविध प्रकारची माणसे शासकीय नोकरीत अनुभवली. हा सगळा प्रपंच आज पहाटे सी. डी. देशमुख यांच्या चरित्रातील काही भाग 'साधना' साप्ताहिकात वाचताना आठवला.

भारताचे प्रधानमंत्र्यांशी मतभेद झाल्यावर राजीनामा देणारे चिंतामणराव द्वारकादास देशमुख म्हणजे सी. डी. देशमुख आतापर्यंत सर्वांना माहीत आहेत; परंतु महत्त्वाचे संवैधानिक पद सोडताना त्यांना सर्वोत्तम सुविधांचे पद आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संस्थेत मिळत असताना त्यांनी समाजकल्याणाला अग्रक्रम दिला. पत्नीचे समाजकल्याण क्षेत्रात सुरू असलेले काम आणि देशाच्या गरजेला प्राधान्य दिले. आवडते क्षेत्र म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्षपद स्वीकारले. संवैधानिक पदापेक्षा अधिक वेतन मिळत असताना हेत्वारोप नको म्हणून विनावेतन काम केले. अशी स्वार्थहीन काम करणारी माणसं आता विरळ झाली आहेत.

'course of my life' या १९७६ मध्ये प्रकाशित आत्मकथनात्मक पुस्तकाचा मराठी अनुवाद 'माझा जीवनप्रवाह' म्हणून झाला. हे पुस्तक नव्याने 'साधना' प्रकाशनकडून पुनरावृत्ती स्वरूपात आले आहे.

आजकाल सेवानिवृत्त झाल्यावर पदस्थापना मिळवण्यासाठी इच्छुकांच्या झुंडी पाहिल्या की, सी. डी. देशमुख यांचे वेगळेपण सहजपणे मनात ठसून जाते.

आपल्या गरजांना जरासा लगाम घालून बिनतारखेचं अन् वेळापत्रकविरहित जगणं मिळायला पाहिजे राव!

असली अफलातून माणसं निर्माण करणारी फॅक्ट्री पुन्हा निर्माण झाली पाहिजे; नव्हे, समाजाने ती फॅक्ट्री चालावी, अशी भूमिका घ्यायलाच हवी.

(सहसचिव, महाराष्ट्र शासन.)

'संस्कृती'... २५व्या वर्षात पदार्पण...

शिवाजी मानकर

तुमच्या सात पिढ्यांत कोणी हॉटेल टाकले होते का? हॉटेल टाकणं इतकं सोपं वाटलं का? हॉटेल चालवून चांगले-चांगले दमले. यांनाही लवकरच हॉटेलचे शटर बंद करावे लागेल, असे एक ना अनेक कुत्सित बोलणे मी २५ वर्षांपूर्वी खूप ऐकले आहे. व्यवसायाची परंपरा नसताना जो कोणी प्रतिकूल परिस्थितीतून व्यवसायाला सुरुवात करतो, त्याच्या कानावर हे शब्द पडतातच ही जगरहाटी आहे. आपण व्यवसायावर सरकारी कर पैशाच्या रूपात भरत असतो, मात्र हा कर आपण समाजात राहत असल्यामुळे आपल्याला शब्दाच्या रूपात हितचिंतकांना द्यावाच लागतो आणि तो मी मोठ्या प्रमाणात दिला आहे.

नाशिक-त्र्यंबकेश्वरच्या पवित्र रस्त्यावर ग्रामीण संस्कृतीचे संवर्धन करण्याची संकल्पना घेऊन २५ वर्षांपूर्वी मी हॉटेल सुरू करण्याचे धाडस केले. (लोक आता त्याला धाडस म्हणतात, खरे म्हणजे तो माझा भावनिक वेडेपणा- Emotional Madness होता.) आपले गाव, बलुतेदार पद्धती, पाटलाचा वाडा, चुलीवरचा स्वयंपाक, पाट-चौरंगावर बसून खास महाराष्ट्रीयन सुग्रास जेवण अशी ही संकल्पना होती. मी ही कल्पना अनेकांना सांगितली; बऱ्याच जणांनी तोंडावर खोटे हसून होकार दिला. काही नातेवाईकांना संकल्पना आवडली, काहींनी मूक होकार दिला. (एकदा याची हौस होऊन जाऊ द्या, असाही सद्हेतू असेल.)

मी माझी महाराष्ट्रीयन संस्कृती जपण्याची कल्पना माझ्या ७० वर्षांच्या अशिक्षित आईला सांगितली. तिने माझं सर्व नीट ऐकून घेतलं आणि ती म्हणाली, जे करायचं ते जपून करा. तिची संमती आणि सल्ला माझ्यासाठी खूप मोठा होता. आईने नुसती संमतीच नाही दिली, तर शेवटच्या श्वासापर्यंत माझं स्वप्न पूर्ण करण्यासाठी तिने 'संस्कृती'मध्ये चुलीवर भाकरी करण्याचं काम केलं. माझ्या आईच्या हातची भाकरी खाल्लेले अनेक जण आजही आईच्या आठवणी सांगतात.

२४ मार्च २००२ रोजी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या शुभ हस्ते नाशिक-त्र्यंबकेश्वरच्या पवित्र रस्त्यावर 'हॉटेल संस्कृती'ची सुरुवात झाली. जुन्या काळातील गावाची दगडी वेस, प्रवेश करताच गणपतीचे मंदिर, आणि पाटील वाड्यात पाट-चौरंगावर जेवण अशी सुरुवात झाली. तीन एकरच्या जागेत एकही झाड नव्हते. येथे २,५०० ट्रक माती आणून भर टाकलेली होती. त्यामुळे झाडे असण्याचा प्रश्नच नव्हता. 'संस्कृती'ची पायाभरणी कशी झाली आणि तिचा प्रवास कसा झाला, याचे सविस्तर वर्णन माझा मुलगा दिग्विजय मानकर यांनी लिहिलेल्या 'संस्कृती : एका खडतर प्रवासाची कहाणी' (२०२३) या पुस्तकात आले आहे.

'संस्कृती'चा २४ मार्च २००२ रोजी सुरू झालेला हा प्रवास अनेक खाचखळगे, अडथळे आणि प्रतिकार सहन करत-करत आता २४ मार्च २०२६ रोजी २४ वर्षे पूर्ण करून २५व्या वर्षात पदार्पण करत आहे. म्हणजे आता संस्कृतीचे 'रौप्यमहोत्सवी वर्ष' सुरू झाले आहे. व्यवसायाची कोणतीही परंपरा नसलेल्यांसाठी २४ वर्षे हा फार मोठा कालावधी आहे. २४ वर्षे म्हणजे २८८ महिने, ८,७६६ दिवस आणि २,१०,३८४ तास 'संस्कृती' अखंडपणे सुरू आहे. गेल्या २४ वर्षांत 'संस्कृती'ने खूप काही शिकवलं. 'संस्कृती'मधील श्री गणेशाच्या आशीर्वादाने; तसेच माझी आई स्वर्गीय भागुबाई, पत्नी कविता, मुलगा दिग्विजय, मुलगी प्रतिभाताई, डॉ. राजश्री, प्रियदर्शनी, सुनबाई जान्हवी आमच्या कुटुंबाचे सदस्य दत्तात्रय शेवाळे, संजय कातकाडे, भिमराव खैरनार, मुकेश पाटील, माणिक सानप, करुणा पाटेकर यांच्या खंबीर पाठिंब्यामुळे हा प्रवास सोपा झाला.

'संस्कृती'ने आमची समाजात स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. गेल्या २४ वर्षांत सहन केलेला त्रास, वेदना, अपमान, आर्थिक ओढाताण यापेक्षाही आपण या आयुष्यात काहीतरी चांगले निर्माण करू शकलो, याचं समाधान खूप मोठं आहे. त्यामुळे 'संस्कृती'ने आयुष्य 'कृतार्थ' केलं. माझा मुलगा दिग्विजय 'संस्कृती' परिवाराची जबाबदारी खांद्यावर घेऊन दमदार वाटचाल करीत आहे. 'संस्कृती'चा हा अखंड प्रवास सुखकर व्हावा, म्हणून आमच्यावर सर्व नाशिककरांनी उदंड प्रेम केले. महाराष्ट्रातून, भारतातून; तसेच परदेशातून आलेल्या पर्यटकांनी महाराष्ट्रीयन 'संस्कृती'चा अनुभव घेतला. परंपरेचे दर्शन आणि आपुलकीचे भोजन हे ब्रीदवाक्य यशस्वी करण्यासाठी आमचे व्यवस्थापक; तसेच सर्व कर्मचारी यांनी अखंड मेहनत घेतली. त्यामुळे हा २४ वर्षांचा प्रवास यशस्वी झाला. हे यश आमच्या संपूर्ण टीमचे आहे.

एका संस्कृत सुभाषितात म्हटले आहे की,

कृते यशस्वी संनदन्ति बहवो जना:
अपकृते तु तुष्णी तिष्ठन्ति सर्वे।

एखाद्याला यश मिळाल्यावर त्याचे श्रेय घेणारे बरेच असतात; परंतु संकटात साथ देणारे फार थोडे असतात. त्यामुळे बोलणाऱ्यांकडे जास्त लक्ष न देता आपण आपल्या कार्यात मग्न राहावे. आमचा २४ वर्षांचा प्रवास सुखकर करणाऱ्या सर्व स्नेही, आप्तेष्ट व हितचिंतकांचा मी मनापासून ऋणी आहे. तुमच्या सर्वांच्या सहकार्याने ही वाटचाल अशीच खंबीरपणे पुढे चालू राहील.

(संचालक (निवृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन.)

दादा माणूस...

अजित देशमुख

रहने को सदा दहर में आता नही कोई।
दादा, तुम जैसे गए ऐसे भी जाता नही कोई।।

स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या पहिल्या जयंतीनिमित्त करावयाच्या कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत चर्चा कानावर आली आणि मन सुन्न झाले. दादांचा अतिदुर्दैवी अपघाती मृत्यू नि:शब्द करणारा होता. दादांच्या अकाली जाण्याने निर्माण झालेली पोकळी काळाच्या ओघात विस्तारत असल्याची जाणीव अधिक तीव्र झाली. जयंतीच्या चर्चांमुळे दाहकता अधिकच आणि मन पिळवटून टाकणारी होती. आपल्याला मिळालेल्या प्रत्येक श्वासातून दादांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी जिवाचे रान केले. नियतीने इतक्या मोठ्या संख्येने उरलेले श्वास अचानक हिरावून घेतले.

राजकारण्यांमध्ये आपलं वेगळेपण अगदी नैसर्गिकरीत्या आणि दृढतेने जगणारे दादा म्हणजे राजकारणातील एक मुलखावेगळं रसायन होतं. कठीण प्रसंगात अधिक तेजाने तळपणारं धुरंधर नेतृत्व होतं.

मी मंत्रालयात कक्षाधिकारी या पदावर कृषी विभागात काम करत असताना एखाद्या मंत्रीमहोदयांच्या वैयक्तिक आस्थापनेवर जाण्याची खूप इच्छा होती. अगदी राज्यमंत्रीमहोदयांकडे रूजू होऊन वेगळ्या कामाचा अनुभव घ्यावा, या दृष्टीने प्रयत्नरत असताना अचानक मला कै. दादांच्या आस्थापनेवर 'स्विय साहाय्यक' म्हणून नियुक्ती मिळाली. साध्या कंपनीत अनुभव घेऊ म्हणत असताना एकदम मोठ्या नामांकित मल्टिनॅशनल कंपनीत काम करण्याची संधी मिळावी तसा आनंद झाला. मात्र दादांच्या लष्करी शिस्तीचे, तापट स्वभावाचे आव्हान पेलण्यासाठी प्रोबेशन पिरियड माझ्यासाठी लष्करी प्रशिक्षणासारखाच खडतर होता. त्यानंतर मी सन मे २००५ ते सप्टेंबर २०१४ असा नऊ वर्षांहून अधिक काळ दादांचा स्विय साहाय्यक, ओ.एस.डी., खासगी सचिव अशा वेगवेगळ्या पदांवर कार्यरत होतो. अत्यंत जवळून दादा हे रसायन समजायला याची खूप मदत झाली. बाहेरून फणसासारखं दिसणारं हे व्यक्तिमत्त्व अंतरंगाने एक संवेदनशील, प्रेमळ असल्याची मनोमन खात्री झाल्याने नंतरचा दादांसोबतचा सहप्रवास विनासायास झाला.

दादा हे राजकारणातील एकमेवाद्वितीय व्यक्तिमत्त्व होते. जेवढे दादा सर्वसामान्यांना उमजले त्यापेक्षाही ते खूप महान आणि उत्तुंग होते. आदरणीय साहेबांचा वारसा म्हणून राजकारणात आले, तरी कितीतरी परीक्षा देऊन, चक्रव्यूह भेदून, विष पचवून त्यांचं व्यक्तिमत्त्व स्वकर्तृत्वावर सिद्ध झालेलं होतं. फटकळ, स्पष्टवक्ते, सडेतोड बोलणारे, ही दादांची एकेकाळची दूषणे होती. मात्र तीच दादांची नंतर आभूषणे बनली. दादांच्या मनाचा नितळपणा, सच्चेपणा यामुळे ते शक्य झाले. मात्र त्यांना कितीही त्रास झाला, तरी दिलेला शब्द पाळताना मी जवळून पाहिले आहे. *'जो पुरा करे वादा, उसका नाम अजितदादा'* हे तंतोतंत खरे होते. दादा वेगवेगळ्या सभांमध्ये, बैठकांमध्ये भाषणादरम्यान जी आश्वासने देत, ती तंतोतंतपणे पाळली गेलीच पाहिजे, त्यासाठी एक काटेकोर पाठपुरावा प्रणाली दादांच्या मार्गदर्शनातून तयार झाली होती. प्रत्येक आश्वासने पूर्णत्वास जाण्यासाठी दादा स्वत:ही त्याचा आढावा घेत. कधी–कधी वित्तीय तुटीमुळे किंवा राजकीय अडचणीमुळे आश्वासने पाळणे अवघड होत आहे, असे दिसल्यावर दादा स्वत: ॲक्शन मोडमध्ये यायचे आणि ते पूर्णत्वास न्यायचे.

दादांनी भल्या पहाटे कामाला सुरुवात करण्यात नेहमी धन्यता मानली. आपल्यामुळे सर्वसामान्यांना त्रास होऊ नये म्हणून पुणे, पिंपरी चिंचवड, बारामती येथील विकास कामांची पाहणी तांबडं फुटायच्या आतच पूर्ण व्हायची. अधिकाऱ्यांची मात्र रात्रीबरोबर पहाटेची झोपही वाया जायची. सर्वसामान्यांना दादांचे दरवाजे सकाळी सातपासून खुले असायचे. कोणाच्याही मध्यस्थीशिवाय थेट उपमुख्यमंत्री यांना भेटून काम मार्गी लागू शकते हा विश्वास फक्त दादांच्या दरबारातच शक्य होता. कामाशी संबंधित अधिकाऱ्याला सकाळी सातपासून दादांच्या फोनचा सपाटा सुरू व्हायचा. अनेक अधिकारी बेडवरून खडबडून जागे व्हायचे. कधी कोणी जिममध्ये, कोणी बाथरूममध्ये तिथेच त्यांना दादांच्या सूचनांची दखल घ्यावी लागायची.

दादांची सतरा–अठरा तास काम करण्याची तयारी असे. मंत्रालयात असताना बैठकांचा सपाटा, अपॉइंटमेंट याचा धडाका असे. मोकळा वेळ असला की, ते बेचैन व्हायचे. बरेचदा दादांना पूर्णवेळ खऱ्या अर्थाने मिनीट टू मिनीट बिझी ठेवणारे दैनंदिन कार्यक्रम आखताना आमची खूप पंचाईत व्हायची. कारण दादा कामवेडा माणूस होता. लोकांत रमणारा माणूस होता. लोकं नसली, मोकळा वेळ असला की, ते बेचैन व्हायचे. अर्थात एखादा कार्यक्रम, बैठक रद्द झाली तरी त्यांचा लगेच दुसरा प्रॉडक्टिव्ह कार्यक्रम तयार असायचा. आराम हा दादांनी कायमचा हद्दपार केला होता. प्रत्येक क्षण लोकांसाठी कामी लागला पाहिजे हा त्यांचा आग्रह असे. मरगळ, कंटाळा, बैठक किंवा कार्यक्रम रेंगाळणे हे मला दहा वर्षांत जवळून काम करताना अक्षरश: एकदाही आढळले नाही. मी दादांबरोबर राज्यभर गाडीने फिरलो. गाडीत बसलो की दादांचे ऑफिस सुरू व्हायचे. पूर्वीच्या कार्यक्रमाची दिलेली कागदपत्रे चाळणे, मला सूचना करणे, फोन

लावून देणे. कधी–कधी महत्त्वाच्या कामासाठी अधिकारी–पदाधिकारी किंवा कार्यकर्ता याला गाडीत बसवायचे. शांतपणे गाडीत कामाची चर्चा व्हायची. मोठे निर्णय व्हायचे. दादांच्या बैठका म्हणजे टू द पॉईंट आणि पक्का निर्णय. काटेकोर वेळेत बैठका घेणारे दादा कदाचित एकमेव मंत्री होते. सार्वजनिक कार्यक्रमातही तोच खाक्या. कुठे कार्यक्रम रेंगाळणार आणि लांबणार असे वाटले की, दादा थेट माईक हातात घेऊन आपले भाषण संपवून काटेकोर वेळेत कार्यक्रम स्थळावरून रवाना व्हायचे. दिलेले कार्यक्रम आपल्याकडून झालेच पाहिजे, याची दक्षता दादा घ्यायचे. एकदा दादांना अचानक मुंबईला पक्षाच्या बैठकीला जावे लागणार होते. संध्याकाळी सहाच्या हडपसर येथील पॅथॉलॉजिकल लॅब उद्‌घाटनाचा कार्यक्रम तीनला घेण्याचे दादांनी आयोजकांना दुपारी एक वाजताच्या दरम्यान कळवले. आयोजकांची खूप दमछाक झाली. मात्र पक्षाची महत्त्वाची बैठक असतानाही दादा कार्यक्रमाला वेळात वेळ काढून आले, ही कृतज्ञतेची भावना आयोजकांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होती.

दादा स्वभावाने स्पष्टवक्ते होते. न होणाऱ्या कामाला नाही म्हणण्याचे त्यांचे धारिष्ट कमालीचे होते. काही काळ अर्जदाराला वाईट वाटायचे; पण नंतर त्यालाही उपरती व्हायची. दादा भेटायला येणाऱ्या माणसांचा फक्त कागद वाचायचे. तो कोणत्या पक्षाचा, जातीचा, धर्माचा याचे त्यांना काही घेणेदेणे नसायचे. खरोखरच योग्य काम असले की, ते मार्गी लागणारच. बारामतीचे काम बारामतीत असताना, पुण्याचे काम पुण्यात आणि मंत्रालयातील काम मंत्रालयातच सांगितले गेले पाहिजे, असा त्यांचा कडक नियम होता. त्यात कोणी चूक केली की, मात्र त्याची खैर नाही. एखाद्या प्रामाणिक कार्यकर्त्याला दुखावल्याचे दादांना लक्षात आले की, आम्हाला फर्मान सुटायचे. शोधा त्याला, घेऊन या माझ्याकडे. मग आमची शोधाशोध करता करता दमछाक व्हायची. नंतर दादा आणि त्यांच्यातील संवाद कमालीचा भारी असायचा. त्यांचे काम मार्गी लागायचे, त्यामुळे दादा रागावले की, काम होणारच असाही एक ठोकताळा झाला होता. दादांचा जनता दरबार खूप जवळून वर्षानुवर्षे मी पाहिलाय. विषयाचे ज्ञान, नेमक्या अधिकाऱ्याला नेमकेपणाने सांगणे. यामुळे सर्वसामान्यांचे खूप प्रश्न मार्गी लागत. एखाद्या बैठकीला संबंधित खात्याचा मंत्री, सचिव, आयुक्त दर्जाचा अधिकारी आला की, त्यांच्याकडे त्यांच्याशी संबंधित बैठकीच्या विषयाव्यतिरिक्त असलेल्या इतर कामाची आठवण करून देण्याबाबत दादांच्या स्टँडिंग ऑर्ड्सं आम्हाला असायच्या. महत्त्वाची कामे मार्गी लावण्याचे दादांचे असे अनेक प्रशासकीय अंगभूत कसब वाखाणण्यासारखे होते.

दादांचे प्रशासकीय कसब व कामाचे मॅनेजमेंट जबरदस्त होते. विषयांचे असलेले ज्ञान आणि गाढा अनुभव याची जोड देऊन जटिल समस्याही तडीस नेण्यात त्यांचा हातखंडा होता. खऱ्या अर्थाने दादा म्हणजे जटिल समस्यांवरचे ब्रम्हास्त्र होते. प्रश्न सोडवण्यासोबतच त्याची अंमलबजावणी झालीच पाहिजे, यावर त्यांचे लक्ष असायचे. यामुळे फार मोठी विकासाची कामे त्यांच्या हातून झाली. सहकार, शिक्षण, बँकिंग, क्रीडा आणि मंत्रालयीन प्रशासन यातील त्यांचा व्यासंग दादांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व सिद्ध करणारा होता. प्रत्येक काम हे आपल्या स्वतःच्या घरातील कामाइतकेच महत्त्वाचे मानायचे. विकासकामांचे आर्किटेक्चर डिझाइन कसे असावे, लँड स्केपिंग कसे असावे, कुठल्या रंगाच्या टाईल्स, बिल्डिंगला कोणता रंग, परिसरात कोणती झाडे लावायची अशा अनेक छोट्या–छोट्या मायक्रोप्लानिंगमध्ये दादा लक्ष घालायचे. कामाचा दर्जा, गुणवत्ता यावर व्यक्तिशः खूपच काटेकोर लक्ष असायचे. जे निर्माण कराचे ते देखणे आणि भव्य दिव्य! त्यांची सौंदर्यदृष्टी कमालीची होती. इतरांसाठी मॉडेल ठरावे अशा अनेक देखण्या, सुंदर सर्व सोयींनी युक्त विकासकामांची निर्मिती दादांकडून झाली हे खूपच कौतुकास्पद होते. वैयक्तिक स्वच्छतेसोबतच सार्वजनिक ठिकाणाची स्वच्छता दादांसाठी तितकीच महत्त्वाची. दादांचे केस कधी पांढरे चमकले, भांग व्यवस्थित नाही, कपडे काहीसे चुरगळलेले आहेत, आज दाढी केलेली नाही असे एका क्षणासाठीही मला कधी दिसले नाही. एवढा व्याप आणि धावपळीतून वैयक्तिक टापटीपपणासाठी कसा वेळ काढायचे ते त्यांनाच ठाऊक. दादांचे आहारावरही प्रचंड नियंत्रण होते. आठवडयात चार दिवस दौऱ्यावर राहत असल्याने आहारात साध्या, चौरस आहारावरच त्यांचा भर असे. नाष्ट्यात, जेवणात काय–काय असावे, हे आम्ही आयोजकांना दौऱ्याआधीच कळवत असू. सुपारीच्या खांडाचेही व्यसन नसल्याने दादांचे शरीरमान एकदम धडधाकट होते.

दादांचे विकासाचे व्हिजन काय ते पाहण्यासाठी बारामती, पिंपरी–चिंचवड, दादांच्या बँका, शिक्षण संस्था, सहकारी साखर कारखाने त्यांनी मंत्री म्हणून हाताळलेले प्रशासकीय विभागांतर्गत झालेली कामे यांची विकासवारी खरंच केली पाहिजे. एकटा माणूस विकासाच्या अनेकविध क्षेत्रांत एवढं मोठं, देखणं, प्रचंड काम उभ करू शकतो यावर खरंच विश्वास बसत नाही. अठरा–अठरा तास काम करण्याची तयारी, निर्णयक्षमता, विकासाची दिव्यदृष्टी, करारी बाणा, धाडसी प्रवृत्ती आणि या उपर प्रत्येक क्षण विकासाचे चिंतन यामुळेच हे होऊ शकले. दादांना आदरणीय पवार साहेबांबद्दल आंतरिक जिव्हाळा, आदर आणि कृतज्ञतेचा अंतःकरणपूर्वक भाव होता. तो नेहमी बोलण्यातून, व्यक्त होण्यातून जाणवायचा.

माझ्या वैयक्तिक जीवनावर दादांचा खूप प्रभाव आहे. दादांसोबत महाराष्ट्र फिरलो. शेकडो वेळा विमान, हेलिकॉप्टरने प्रवास करण्याचे भाग्य मिळाले. माझ्या व्यक्तिमत्त्व विकासात मोलाची भर पडली. दादांनी माझ्या कोतुळ गावाला पिण्याच्या पाण्याची योजना दिली. आज माझा कोतुळ आणि परिसर पिंपळगाव खांड धरणाच्या माध्यमातून बारामाही झाला तो केवळ आणि केवळ दादांमुळेच. माझ्या प्रत्येक अनेक सार्वजनिक कामांना न्याय दिला. दोन वेळा माझ्या रिमोट गावात माझ्या घरी येऊन गेले. एकदा निवडणूक प्रचार सभेसाठी आले तेव्हा आणि दुसऱ्यांदा माझ्या वडिलांचे दुःखद निधन झाल्यावर सांत्वन करण्यासाठी. दादांच्या वैयक्तिक आस्थापनेवर नव्हतो, तेव्हाही दादांचे दरवाजे मला नेहमी खुले होते. माझ्यावर त्यांचे अनंत उपकार आहेत. त्यांच्या स्मृती मी चिरंतन ह्रदयात जतन करून ठेवेन.

स्वर्गीय दादांच्या पहिल्या जयंतीनिमित्त दादांना अंतःकरणपूर्वक विनम्र अभिवादन!!

अजितदादा अमर रहे...

(सहसचिव, महाराष्ट्र शासन.)

येवा कोकण आपलोच असा...

अजय भोसले

निसर्ग, उच्च/कनिष्ठ, मध्यमवर्गीय आणि निम्नस्तर याची भौगोलिक व सामाजिक रचना म्हणजे कोकण. भारतातील सर्वसाधारण रचना अशीच असली, तरी निसर्गाची साथ सर्वांनाच लाभली आहे असं नाही. निसर्गाचा आदर करत, तो जे देईल, त्यात समाधान मानणारा, फणसासारखा खडबडीत वाटणारा; परंतु आतून मऊ लुसलुशीत गऱ्यासारखा... निसर्ग त्याला देतोही भरभरून... हिरवी माया... कधी झाडावरून आंबे, फणस, केळी, शेतीतून तांदूळ... काही नाही, तर पाण्यात हात घालावा, मासे देईल... दगडाखाली हात घालावा, खेकडे देईल... गरजा कमी समाधान मोठं... आत्महत्या वगैरे असा प्रकारच नाही.

कोकणातील सण म्हणजे जगण्याचा उत्सवच. त्यासाठी कोकणी माणूस आवर्जून कुठूनही येतोच. तसं औद्योगिक प्रगतीमुळे कोकण शहराच्या जवळ आलं आहे. अनेक ठिकाणी अजूनही चंद्रावरचे खड्डे तुमचं कंबरडं मोडायला रस्त्यावर दारुड्या माणसासारखे आ वासून चहूकडे लडबडलेले असले, तरी त्याला जबाबदार असलेल्यांची आय माय काढत आमचा कोकणी माणूस मार्गस्थ होतो. (आपलं चांद्रयान कदाचित हयचं गावतलंय) वर कार्य करूचा म्हटलं तर विघना येतलीच, असं सहजपणे म्हणतो. लाल गाडी म्हणजे त्यांची सखीच. आपल्या प्रियेसारखी तिची प्रतीक्षा करतात. त्यांची ती सखी लाल प्रिया खड्ड्यातून त्यांना चेंडूसारखी वरखाली फेकत असली, वळणावर घुसळत असली, तरी आमका फिकीर ना... जाऊचा म्हणजे जाऊचा... तू आमचे पाय सुजव, नाही तर अंग सुजव... बापे फेर धरतलेच आणि बाया फुगड्या खेळतल्याच...

शहरातल्यांना सणाची गोडी लागलीय. तो कुठलीतरी धार्मिक पुस्तके वाचून, कुठलेसे व्हिडिओ पाहून देवाला दागिन्यांनी, हार फुलांनी मढवून जीव नकोसा करून टाकतो. म्हणे सर्व विधिवत व्हायला हवं...तुमची श्रद्धा असेल, तर जरूर करावं... येथे तात्पुरता शहरातून पुस्तकी शहाणपण घेऊन आलेला श्रीमंत माणूस... (येथील श्रीमंत म्हणजे शहरातील कनिष्ठ मध्यमवर्गीय, तो शहरात सेलिब्रेटीच्या घरातील गणेशाच्या साधेपणाचे गोडवे गात असतो. श्रीमंती सापेक्ष असते असं म्हणतात. तुम्ही ज्या परिप्रेक्ष्यातून पाहता तशी ती असते.) मग तो निम्नस्तरीय वर्गाकडून उसना भाव घेतो. विधिवत कार्य करण्यासाठी हार घालणे, दुर्वा आणणे, मोदक बनवणे वगैरे वगैरे आणि हा भाव देवाला समर्पित करतो. विघ्न नको म्हणून सर्व समजुतीने होत राहतं. सर्व घरात थोड्या फार फरकाने हेच; पण येथील जमिनीवरचा माणूस काळाच्या पुढे आहे. त्याची निसर्गाची सच्ची मैत्री आहे. अगदी निसर्गाकडून केळीचं पान, दोन चार फुलं घेऊन निसर्गाशी तादात्म्य पावत, आतले भाव ओतून सण साजरा करतो. देव भक्तीचा भुकेला हे संतवचन त्याला पक्कं कळलं आहे. असो, सण महत्त्वाचा...

निसर्ग नटतो, त्याच्या कैकपटीने बाया, मुली नटतात. झरे थिरकतात, त्यापेक्षा त्या थिरकतात. नद्या आणि बाया ठुमकत निघतात. किशन कन्हैये गोल फेर धरतात. शहरातील पोरं मातीचा गंध अनुभवतात. मोकळ्या रानात, काठावरच्या नदीवर, डोंगराच्या कुशीत वारं शिरल्यासारखं आणि पायाला भिंगरी लागल्यासारखी हुंदडतात. मोकळं वारं अंगात भरून घेतात. गणेशजी येतात, मग सोबतीला गौराबाई. मुखवटा, तेरड्याच्या फांद्या बस. या सामग्रीवर तिची सुंदर आरास सजविली जाते. तिला सजवणे हा एक सोहळा असतो.

कोकणात सामाजिक समानता निसर्गातून आलेली...अगदी उपजत...स्त्री-पुरुष सहजपणे वावरतात...संविधान न वाचताही... सामाजिक दऱ्याही लोप पावत चालल्या आहेत. याचं कारण निसर्ग! त्याला तो वचकून असतो. निसर्ग त्याचे पाय जमिनीवर ठेवतो. तोही या मातीत ममतेने पाय रोवून उभा आहे. निसर्ग कोणताही भेदभाव करत नाही. येथील माणूस निसर्ग वाचतो, त्याला निसर्गाने सांगितलेलं आकलन होतं. निसर्गाच्या आणि चांदण्यांच्या साक्षीने तो त्याच्या रंगात मिसळून जातो. हा निसर्गाचा उत्सव अनुभवायचा असेल, तर येवा कोकण आपलोच असा...

(अवर सचिव, महाराष्ट्र शासन.)

पाऊस – काही प्राचीन कल्पना

रेश्मा घाणेकर

आपल्याला सगळ्यांनाच लहानपणी एक बडबडगीत म्हटल्याचं आठवत असेल. ते होते.

येरे येरे पावसा
तुला देतो पैसा
पैसा झाला खोटा
पाऊस आला मोठा

आपण मोठे होत जातो; पण पावसाची आणि आपली जवळीक कमी होत नाही, तीही वेगवेगळ्या रूपात व्यक्त होते. कुठे ती नभ मेघांनी आक्रमिले, अशी नाट्यगीताची तान मारत व्यक्त होते, तर कुठे कवी:–

गडद निळे गडद निळे जलद भरून आले
शीतल तनु चपल चरण अनिलगण निघाले

असे अनुप्रासाच्या लयीतील पावसाचे वर्णन करतो.

'ओ सजना बरखा बहार आयी' गाजलेले फिल्मी गीत असो की, 'अबके सावन ऐसे बरसे है' अल्बम गीत असो वर्षानुवर्षे पाऊस बालगीतापासून सिनेगीतापर्यंत मनाला रुंजी घालत असतो. अर्वाचीन भारतीयच नाही, तर अगदी प्राचीन भारतीयालाही हे निसर्गाचे रूप मोठे विस्मयकारक विलोभनीय वाटते. तो त्याला आदराने देवतेच्या रूपात बघत असे.

प्राचीन मनुष्य पावसाबद्दल काही अंदाज बांधतो. हा, आता ते शास्त्रीय निकषांवर घासलेले नसतील; परंतु तो पाऊस म्हणजे काय? तो का पडतो, याच्यावर कल्पना मात्र करतो.

सर्वसाधारणपणे समजूत अशी आहे की, इंद्र पाऊस पाडतो, असा समज प्राचीन काळी होता, मात्र वैदिक ऋषी इंद्राला पावसाचा देव मानत नव्हते. वरुण देवतेचा पाण्याशी जवळचा संबंध आहे, हे निर्विवाद! त्यामुळेच वरुण राजा पाण्यातून फिरतो, अशा सारख्या वैदिक वचनांबरोबर वरुणाची सभा पाण्यात असल्याचा उल्लेख महाभारतात आढळतो तरीही वैदिक काळात वरुण हा पाऊस पाडणारा देव नव्हता.

पावसाविषयी वेदात एक कल्पना आढळते, ती म्हणजे सूर्य आपल्याला पाऊस देतो. ऋग्वेदातील कल्पनेप्रमाणे सूर्याचा निवास द्युलोकातील पाण्यात असतो. अथर्ववेदातील एका वचनाप्रमाणे सूर्याचे सात किरण हे पृथ्वीवर पावसाच्या रूपात पाणी सोडतात. तैत्तिरीय ब्राह्मणात सूर्याला आहुती देण्याचे समर्थन करण्यासाठी सूर्याने वृष्टी धरून ठेवलेली असते आणि तोच आपल्याला वृष्टी देतो, असे कारण दिले आहे.

तैत्तिरीय आरण्यकात असा प्रश्न विचारला आहे की, पाणी इथून जाते ते कुठे राहते? प्रश्नाचे उत्तर दिले आहे वर सूर्यात ते एकत्रितपणे राहते. (आपः सूर्ये समाहिताः) रामायणातही अशी कल्पना आहे की, नऊ महिने, सूर्याची किरणे पृथ्वीवरून शोषलेले पाणी गर्भाप्रमाणे धरून ठेवतात. पृथ्वीवरून शोषलेले पाणी सूर्य पुन्हा आपल्याला पावसाच्या रूपात देतो. या वैदिक कल्पनेला जोडकल्पना उदयास आली ती म्हणजे पाऊस पडतो तो यज्ञातील अग्नीमुळे. यज्ञातल्या धुरातून पृथ्वीवरचे पाणी वर जाते आणि तेच मग पावसाच्या रूपात खाली येते. शतपथ ब्राह्मण म्हणते अग्नीपासून धूर निर्माण होतो; धुरापासून ढग आणि ढगातून वृष्टी. सूर्य आणि अग्नी यांच्या जोडीला मरूत देवतांचाही पाऊस देणाऱ्या देवतांत अंतर्भाव होतो. यजुर्वेदाच्या संहितेत सूर्य, अग्नी आणि वारा यांच्या ताब्यात वृष्टी असते आणि ते आपल्याला वृष्टी देतात असा उल्लेख आढळतो. एते वै वृष्ट्या: प्रदातारः याबाबत अशी कल्पना

आहे की, या देवतांत कामाची वाटणी झाली आहे. अग्नी पृथ्वीवरून वृष्टीला वर नेतात आणि सूर्य आपल्या किरणांनी पाण्याचा वर्षाव करतो.

या कल्पनांखेरीज ऋग्वेदाच्या १०२८ सूक्तांमध्ये पर्जन्याला उद्देशून तीन सूक्ते आहेत. पर्जन्य ही स्वतंत्र देवता आणि ती पाऊस पाडते, असे वर्णन आहे. पृथ्वीवर पाऊस पडणे, या नैसर्गिक घटनेचे पर्जन्य देवतेच्या रूपात दैवतीकरण झाले आहे.

पावसाळ्यातील निसर्गाचे उत्तम वर्णन या तीन सूक्तांत आढळते. ऋषी म्हणतात:–

प्र वाता वान्ति पतयन्ति विद्युत
उदोषधीर्जिहते पिन्वते स्वः
इरा विश्वस्मै भुवनाय जायते
यत्पर्जन्यः पृथिवी रेतसावति

(पाऊस पडतो तेव्हा वारे जोरात वाहतात. विजा चमकत असतात. वनस्पती वर डोके काढतात आणि आकाश उतू जाते.) भौम अत्रिंच्या पर्जन्यसूक्तात पावसाला रथात बसलेल्या रथीची उपमा दिली आहे. ते म्हणतात रथात बसलेल्या रथी चाबकाच्या साहाय्याने पुढे जोडलेल्या घोड्यांना

आवर घालीत अवतीर्ण होतो, तसाच हा पर्जन्य मेघरूपी दूत पुढे घालून विजेचे चाबूक ओढत येतो.

रथीव कशयाश्वाँ
अभिक्षिपन्नाविर्दूतान्
कृणुते वर्ष्यां उ अहं

ऋग्वेदाच्या सातव्या मंडलातील सूक्त म्हणते पाऊस वनस्पतींना गर्भाधान करतो. पर्जन्याची प्रार्थना करताना ऋषी त्याच्याकडे सुख निर्माण करणारी सृष्टी, धनधान्य वनस्पतींची समृद्धी मागतात. निर्जल रेताड प्रदेश पावसामुळे मनुष्यवस्तीला योग्य होतात हे ऋषी जाणतो. त्याचवेळेस अतिवृष्टीमुळे नुकसान होऊ नये म्हणून पावसाला एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच वर्षाव करण्याची ते विनंती करतात. ऋषी म्हणतात:–

अवर्षिर्वर्षमुदु षू गृभाया
कर्धन्वान्यत्येतवा उ

पावसा, तू पुष्कळ पडला आहेस. तुझ्या वृष्टीने तू वाळवंटेसुद्धा ओलांडून जाण्याजोगी केली आहेत. औषधी वाढल्या आहेत व लोक तुझी स्तुती करीत आहेत. आता मात्र पडण्याचे थांब. ही ऋचा पूर थांबवण्यासाठी आहे. असे सायण म्हणतो (इयमृक् अतिवृष्टिविमोचिनी).

पाऊस पडला तरच पृथ्वीवरील वनस्पतींची उत्पत्ती आणि वाढ होत असल्यामुळे पर्जन्यात चराचर सृष्टीचा आत्मा आहे, असे ऋग्वेद म्हणतो. तस्मिन्नात्मा जगतस्तस्थुषश्च. (ऋग्वेद ७.१०१.६) मानवी जीवनात पावसाला केवढे अनन्यसाधारण महत्त्व आहे, याची जाणीव या लहानशा वाक्यात उत्तम व्यक्त झाली आहे.

ऋग्वेदादि वैदिक साहित्यानंतर आपण आदिकाव्यांचा जरी वेध घेतला, तरी त्यातही पाऊस, त्याच्यामुळे निसर्गात आणि माणसाच्या भावभावनांत झालेले बदल यांचे चित्रण आढळते. वाल्मिकींच्या रामायणातील अयोध्याकांडात त्रेसष्टाव्या सर्गात पाच आणि किष्किंधाकांडात अठ्ठाविसाव्या सर्गातील जवळजवळ सत्तावीस श्लोक वर्षा वर्णनाने चिंब भिजलेले आहेत.

किष्किंधाकांडातील पावसाळ्याचे चित्रण वैचित्र्यामुळे विशेष विलोभनीय वाटते. पावसाळ्यातील निसर्गाचे ते मनोहर चित्रण आहेच; परंतु रामजीवनातील अनुभवांशी व संवेदनांशी ते एकरूप झालेले आहे. किष्किंधाकांड म्हणजे रामाच्या आयुष्यातील सीतावियोगाचा काळ. त्यामुळे वियोगाने पोळलेल्या मनावर पावसाची शिंपण सुखदही ठरते आणि दुःखदही.

राम आभाळातले ढग, वर्षाकालचा सुगंधित वारा यांचं वर्णन करतानाच उष्म्याने हैराण झालेली आणि पाण्यानं भिजलेल्या धरणीचेही वर्णन करतो. ती धरणी त्याला शोकसंतप्त आणि अश्रू ढाळणाऱ्या सीतेसारखी वाटते.

पर्वतशिखरावर फुललेली कुड्याची फुले, चक्रवाकाला भेटणारी चक्रवाकी, आनंदी बलाका आणि मेघ, नर्तन करणारे मोर त्याला सीतेचीच आठवण करून देतात.

नीलमेघाश्रिता विद्युत् स्फुरन्ती प्रतिभाति मे
स्फुरन्ती रावणस्याङके वैदेहीव तपस्विनी।।

रावणाशी तेजस्विनी सीतेने झटापट करावी तशी ही काळ्या मेघात लख्खकन् चमकणारी वीज त्याला भासते. पावसाळ्यात आरंभी अंधारून आलेल्या आकाशाचे वर्णन करताना दुःखी रामाच्या मनातील रसिक प्रियकर डोकावतो. तो म्हणतो, दिशांचा भेद नाहीसा झाल्याने प्रेयसी आणि प्रियकरांवर दिशा उपकार करत आहेत.

निसर्गाचे सूक्ष्म अवलोकन कवी करतो. धुळीचे खाली बसणे, वाऱ्याची शीतलता, पर्वतांतील धातूंनी लाल झालेल्या नद्या अशा बारीकसारीक फरकांची नोंद तो घेतो. पावसाने फुललेल्या झाडांचे, फळांचे चित्रदर्शी वर्णन यात केले आहे. काळ्या भुंग्यांप्रमाणे जांभळाचे घोस, हवेच्या झोक्याने हलणारी आम्रफळे, फुलाच्या भारांनी वाकलेले कदंबवृक्ष, लाल खडीकाम केलेल्या हिरव्या वस्त्राप्रमाणे दिसणारी हिरवीगार भूमी आणि त्यावरील लाल इंद्रगोप किडे यांचं वाल्मिकींनी केलेले वर्णन सुंदर चित्र उभं करतं.

पावसाने केवळ झाडांनाच डोलायला लावले नाही तर प्राणी पक्ष्यांनाही नादावले आहे. हत्तींचे चित्कार, भुंगे, केकावणारे मोर, हत्तींचे हिंडणे, मोरांचे नृत्य यांनी जंगल गजबजले आहे. हे वर्णन करताना नादमय शब्दांचा वापर वाल्मिकी करतात. ते म्हणतात:–

मत्ता गजेन्द्रा मुदिता गवेन्द्रा
वनेषु विश्रान्ततरा मृगेन्द्राः ।।
रम्या नगेंद्रा निभृता नरेन्द्रा
प्रकीडितो वारिधरैः; सुरेन्द्रः ।।

मोरांच्या केकांनी नृत्याने नटलेली वनभूमी कधी रामाला धुंद मधुशालेसारखी वाटते, तर कधी संगीत महोत्सव सुरू झालेल्या भूमीसारखी वाटते.

या वर्षा वर्णनाने केवळ निसर्गातील बदल वाल्मिकी टिपत नाहीत, तर राजाच्या दृष्टीनेही या पावसाकडे ते बघतात, राम हा एक राजा. त्याला सुग्रीवाच्या मदतीने सीतेला सोडवायचे आहे. त्यामुळे वर्षाकाल हा आपल्या मार्गातला त्याला मोठाच अडथळा वाटतो.

तो म्हणतो :–

रजःप्रशान्तं सहिमोद्य वायुर्निदाघदोषप्रसरा; प्रशान्ता; ।
स्थिता हि यात्राः वसुधाधिपानां प्रवासिनो यान्ति नरा; स्वदेशान् ।।
वृत्ता यात्रा नरेन्द्राणां सेना प्रतिनिवर्तते
वैराणि चैव मार्गाश्च सलिलेन समीकृताः

(राजांची युद्धे पावसाळयाने खंडित झाली आहेत. निरंतर होणाऱ्या पावसानं आणि पाण्यानं रस्ते विस्कळीत झाली आहेत. त्याच्यावर रथ जाणं थांबलं आहे. राजाच्या युद्धयात्रा थंडावल्या आहेत. मार्गक्रमण करणारी सेनादेखील रस्त्यातच पडाव टाकून बसली आहे.)

वाल्मिकींनी सुबोध शैलीत पावसाळ्याचे वर्णन केले तर कवी कुलगुरू कालिदास त्यांच्याही पुढे गेला.

कालिदासाच्या मेघदूतातल्या विरही यक्षाला आपल्या प्रियेला निरोप पाठवावासा वाटला आणि त्याने मेघाला दूत केले. मेघदूताच्या पहिल्या काही श्लोकांतच यक्षाला दिसलेल्या मेघाचं वर्णन आहे.

आषाढस्य प्रथम दिवसे मेघमाश्लिष्टसानुं
वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं ददर्श

मेघालाच विरही जनांचा दूत बनवणारे हे काव्य माणसाच्या जीवनाचे आणि पावसाचे जिव्हाळ्याचे नातेच व्यक्त करते.

(अपर राज्यकर आयुक्त, परिक्षेत्र-२, पुणे, महाराष्ट्र शासन.)

स्मार्ट शेती

डॉ. प्रकाश कोंडेकर

भारताच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात कृषी क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. देशातील सुमारे ६० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या थेट किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. हवामानातील बदल, पाण्याची कमतरता, अनियमित पाऊस, जैव–कीटकनाशकांचा अयोग्य वापर आणि उत्पादन खर्चातील वाढ यांसारख्या अनेक समस्यांमुळे शेतीची उत्पादकता घटत आहे. त्यामुळे पारंपरिक शेती पद्धतींचे आधुनिकीकरण करून स्मार्ट शेतीचा अवलंब करणे, ही काळाची गरज बनली आहे.

स्मार्ट शेतीमध्ये सेन्सर नेटवर्क, इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT), क्लाऊड संगणन आणि डेटा विश्लेषण यांचा वापर केला जातो. मातीतील आर्द्रता, तापमान, वातावरणातील आर्द्रता आणि इतर घटकांची माहिती सेन्सरद्वारे गोळा करून क्लाऊडवर साठवली जाते. या माहितीच्या आधारे सिंचन, तणनियंत्रण आणि फवारणी यांसारखे निर्णय अधिक अचूकपणे घेता येतात. यामुळे उत्पादन खर्च कमी होतो आणि पीक उत्पादन वाढण्यास मदत होते.

बहुतेक शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पादन मिळत नाही. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पीक उत्पादनाचा अंदाज घेणे आणि योग्य नियोजन करणे आवश्यक ठरते. याशिवाय आंबा, अननस, जांभूळ, फणस, डाळिंब इत्यादी फळांपासून वाईन, जॅम, ज्यूस किंवा इतर मूल्यवर्धित उत्पादने तयार करून शेतकरी अतिरिक्त उत्पन्न मिळवू शकतात.

कृषी क्षेत्रातून आपल्याला अनेक आरोग्यवर्धक अन्नपदार्थ मिळतात. अशा अन्नपदार्थांना कार्यात्मक अन्नपदार्थ (Functional Foods) असे म्हणतात. जवस (Flaxseed), लसूण, आले, टोमॅटो, हिरवा चहा, विविध मसाले, सोयाबीन, संपूर्ण धान्ये, फळे आणि भाज्या यामध्ये आरोग्यास उपयुक्त जैवसक्रिय घटक आढळतात. हे अन्नपदार्थ केवळ पोषणच देत नाहीत, तर विविध आजारांचा धोका कमी करण्यास आणि शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत करू शकतात.

आधुनिक पोषणशास्त्रात केवळ पोषणतत्त्वांच्या कमतरतेपासून बचाव करण्यापेक्षा सकारात्मक किंवा उत्तम पोषणावर भर दिला जात आहे. संशोधनातून असे दिसून आले आहे की, काही अन्नघटक शरीरातील विविध जैविक प्रक्रियांवर लाभदायक परिणाम करू शकतात. त्यामुळे नैसर्गिक; तसेच समृद्ध (Enriched), सुदृढीकृत (Fortified) आणि सुधारित (Enhanced) अन्नपदार्थांची मागणी वाढत आहे.

कार्यात्मक अन्नपदार्थांचे काही प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे आहेत:–

नैसर्गिक अन्नपदार्थ : फळे, भाज्या, संपूर्ण धान्ये, सोयाबीन.

समृद्ध अन्नपदार्थ : अतिरिक्त पोषकतत्त्वे मिसळलेले पदार्थ.

सुदृढीकृत अन्नपदार्थ : जीवनसत्त्वे व खनिजे वाढवून तयार केलेले पदार्थ.

सुधारित अन्नपदार्थ : आरोग्यदायी घटकांची मात्रा वाढवलेले पदार्थ.

किण्वन प्रक्रियेतून तयार होणाऱ्या काही अन्नपदार्थांमध्ये लाभदायक सूक्ष्मजीव असतात. अशा सूक्ष्मजीवांना प्रोबायोटिक्स म्हणतात. लॅक्टोबॅसिलस आणि बिफिडोबॅक्टेरिया ही त्याची उदाहरणे आहेत, तर आतड्यातील चांगल्या जीवाणूंची वाढ होण्यासाठी मदत करणाऱ्या, परं घटकांना प्रिबायोटिक्स म्हणतात. इन्युलिन आणि ऑलिगोफ्रक्टोज ही त्याची उदाहरणे आहेत.

पाश्चिमात्त्य देशांमध्ये कार्यात्मक अन्नपदार्थ हा वेगाने वाढणारा उद्योग मानला जातो; परंतु पूर्वेकडील देशांमध्ये, विशेषतः चीनमध्ये, अन्नाचा औषधी उपयोग हजारो वर्षांपासून केला जात आहे. आज जगभरात अन्नाच्या प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक गुणधर्मांना अधिक मान्यता मिळत आहे.

वृद्ध लोकसंख्या वाढत असल्याने स्मृतिभ्रंश (Dementia) आणि अल्झायमर यांसारख्या समस्या मोठ्या प्रमाणावर समोर येत आहेत. ओमेगा–३ फॅटी आम्ले, व्हिटॅमिन–डी आणि इतर काही पोषकतत्त्वे आरोग्यासाठी उपयुक्त ठरू शकतात. असे काही संशोधनात सिद्ध झाले आहे. त्यामुळे अशा घटकांनी समृद्ध अन्नपदार्थांची मागणी वाढत आहे. नारळ आणि त्यापासून बनविलेल्या उत्पादनांबाबतही अलीकडच्या काळात नव्याने संशोधन झाले आहे. काही प्रकारची संपृक्त स्निग्ध आम्ले (Saturated Fatty Acids) आरोग्यासाठी उपयुक्त असू शकतात, असे काही अभ्यास दर्शवितात. तथापि यासंबंधी अधिक संशोधनाची आवश्यकता आहे.

शेवटी, आधुनिक तंत्रज्ञानाधारित शेती आणि कार्यात्मक अन्नपदार्थांचे उत्पादन यांचा संगम शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवू शकतो. आरोग्यदायी अन्नपदार्थांची वाढती मागणी शेतकऱ्यांसाठी नवीन बाजारपेठा निर्माण करू शकते. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारेल, जनतेचे आरोग्य उंचावेल आणि राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेलाही बळकटी मिळेल.

कृषी आणि आरोग्य यांचा परस्पर संबंध अत्यंत घनिष्ठ आहे. कार्यात्मक अन्नपदार्थांचे उत्पादन, मूल्यवर्धन आणि स्मार्ट शेती तंत्रज्ञानाचा अवलंब यामुळे शेतकऱ्यांची नफा क्षमता वाढू शकते. परिणामी, देशाच्या आर्थिक विकासाला आणि लोकांच्या आरोग्यवर्धनाला महत्त्वपूर्ण चालना मिळू शकते.

(BSc(Hons), MD (Homeo), ND, AVR, FRSH (London), BTER
मानद संचालक, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी.)

मनाचा आरसा : न्यूरो–लिंग्विस्टिक प्रोग्रामिंग (NLP) समजून घेताना...

राजेंद्र नारायण कुऱ्हाडे

मन जिंकले, तर जग जिंकले, असे आपण नेहमी म्हणतो; पण हे मन नेमके कसे घडते? ते आपल्या विचारांवर कसे प्रभाव टाकते? आणि आपण आपल्या विचारांची दिशा बदलू शकतो का? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करणाऱ्या अनेक पद्धतींपैकी एक म्हणजे न्यूरो–लिंग्विस्टिक प्रोग्रामिंग (NLP).

काही महिन्यांपूर्वी मानसिक आरोग्याविषयी आयोजित विविध ऑनलाइन कार्यशाळांमध्ये सहभागी होण्याची संधी मला मिळाली. त्यातील एका कार्यशाळेचे प्रमाणपत्र मी सोशल मीडियावर शेअर केले होते. ते पाहून ज्येष्ठ प्रशासकीय अधिकारी अजय भोसले यांनी सहज विचारले, हे NLP म्हणजे नेमके काय? त्या एका प्रश्नातून या विषयाचा सखोल अभ्यास करण्याची प्रेरणा मिळाली आणि हा लेख आकाराला आला.

आज मानसिक आरोग्याबद्दल समाजात मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू आहे. ताण, नैराश्य, चिंता, असुरक्षितता आणि भावनिक संघर्ष यांमुळे अनेकजण स्वतःला समजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. यासाठी आर.ई.बी.टी., माईंडफुलनेस, पॉझिटिव्ह साइकोलॉजी, ध्यान, योग, विपश्यना, इनर इंजिनीअरिंग अशा अनेक पद्धती वापरल्या जातात. NLP ही त्यापैकीच एक वेगळी विचारपद्धती आहे.

NLP म्हणजे नक्की काय?

NLP या शब्दाचे तीन भाग आहेत. 'न्यूरो' म्हणजे मेंदू, मज्जासंस्था आणि चेतापेशींची कार्यपद्धती. 'लिंग्विस्टिक' म्हणजे भाषा, जी आपल्या अनुभवांना अर्थ देते आणि आपल्या विचारांना आकार देते, तर 'प्रोग्रामिंग' म्हणजे आपल्या सवयी, विचारांच्या पद्धती आणि वर्तनामध्ये बदल घडवून आणण्याची प्रक्रिया. सोप्या भाषेत सांगायचे झाले, तर NLP ही अशी विचारपद्धती आहे जी सांगते की, आपण ज्या पद्धतीने विचार करतो, बोलतो आणि अनुभव घेतो, त्याच पद्धतीने आपले वर्तन घडते. जर विचारांची रचना बदलली, तर आयुष्याकडे पाहण्याची दृष्टीही बदलू शकते.

ही संकल्पना १९७० च्या दशकात विकसित झाली. या संकल्पनेचा मुख्य उद्देश असा आहे की, आपण आपल्या विचारांची रचना समजून घेतली तर संवाद अधिक प्रभावी करू शकतो, भीती कमी करू शकतो आणि आपल्या ध्येयांकडे अधिक स्पष्टपणे वाटचाल करू शकतो. तिचा मुख्य भर मानवी अनुभवांच्या आशयावर नसून त्या अनुभवांच्या रचनेवर आहे. एखादी घटना घडते तेवढे महत्त्वाचे नसते; त्या घटनेचा अर्थ आपण स्वतःला कसा सांगतो, हे अधिक महत्त्वाचे असते.

मानवी मेंदूची रचना समजून घेतली तर NLP अधिक स्पष्ट होते. उत्क्रांतीच्या प्रक्रियेत मानवी मेंदूचे तीन प्रमुख स्तर विकसित झाले आहेत. सर्वात जुना भाग म्हणजे रेप्टिलियन ब्रेन, जो केवळ अस्तित्व टिकवण्यासाठी काम करतो. त्यानंतरचा लिम्बिक ब्रेन भावना, स्मृती आणि नातेसंबंधांशी संबंधित असतो. सर्वात विकसित भाग म्हणजे नेओकॉर्टेक्स, ज्यामुळे माणूस विचार करू शकतो, भाषा निर्माण करू शकतो, तर्क करू शकतो आणि नवनिर्मिती करू शकतो. आपल्या मेंदूमध्ये अब्जावधी चेतापेशी सतत एकमेकांशी संवाद साधत असतात. हा संवाद विविध रसायनांच्या माध्यमातून घडतो. डोपामिन, सेरोटोनिन, एन्डॉर्फिन, ऑक्सिटोसिन, ॲड्रिनॅलिन, कोर्टिसोल आणि ॲसिटिलकोलीन यांसारखे न्यूरोट्रान्समीटर आपल्या भावना, प्रेरणा, आनंद, भीती, ताण आणि वर्तनावर प्रभाव टाकतात. त्यामुळे आपण काय विचार करतो, कसे अनुभवतो आणि कसे वागतो, हे आपल्या मेंदूतील या जैविक प्रक्रियांशी जोडलेले असते.

NLP मनाचे दोन स्तर मानते. एक म्हणजे चेतन मन, जे आपण जागे असताना निर्णय घेते, विचार करते आणि परिस्थिती समजून घेते. दुसरे म्हणजे अचेतन मन, जे आपल्या आठवणी, सवयी, विश्वास आणि स्वयंचलित प्रतिक्रिया सांभाळते. अनेकदा आपल्या कृतींचे नियंत्रण अचेतन मनाकडे असते आणि म्हणूनच जुन्या सवयी बदलणे कठीण वाटते. NLP या अचेतन स्तरावर सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न करते.

या पद्धतीचे चार महत्त्वाचे आधारस्तंभ मानले जातात. पहिला म्हणजे उद्दिष्ट स्पष्ट असणे. आपण नेमके काय साध्य करू इच्छितो, याचे स्पष्ट चित्र मनात असणे आवश्यक आहे. दुसरा आधारस्तंभ म्हणजे इंद्रियांची जागरूकता अर्थात निरीक्षणशक्ती–समोरच्या व्यक्तीचे शब्दच नव्हे, तर तिचा आवाज, चेहऱ्यावरील भाव, डोळ्यांची हालचाल, श्वासाची गती आणि देहबोली समजून घेणे. तिसरा म्हणजे वर्तनातील लवचिकता. एखादी पद्धत उपयोगी पडत नसेल, तर हट्ट न धरता नवा मार्ग स्वीकारणे. आणि चौथा म्हणजे सलोखा (रॅपॉर्ट) म्हणजेच विश्वासावर आधारित प्रभावी संवाद व नातेसंबंध निर्माण करणे.

NLP मध्ये VAK मॉडेललाही महत्त्व दिले जाते. काही लोक दृश्यांच्या माध्यमातून चांगले शिकतात, काही ऐकून आणि काही अनुभवातून. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीची शिकण्याची पद्धत वेगळी असू शकते. त्याचप्रमाणे मॉडेलिंग ही संकल्पना सांगते की, यशस्वी व्यक्तींच्या विचारसरणीचा आणि कृतींचा अभ्यास करून आपणही काही सकारात्मक सवयी आत्मसात करू शकतो.

NLP मधील एक महत्त्वाचा विचार म्हणजे 'कारण' (Cause) आणि इफेक्ट, अनेकदा आपण अपयशाचे कारण परिस्थिती, लोक किंवा नशीब यांना देतो. NLP मात्र सांगते की, आपल्या प्रतिसादाची जबाबदारी स्वतः स्वीकारली, तर बदलाची सुरुवात होते. सबबी शोधण्याऐवजी उपाय शोधण्याची वृत्तीच व्यक्तीला पुढे घेऊन जाते. त्यामुळे भाषेतील बदल विचार बदलवतात आणि विचार बदलले की मनाची स्थितीही बदलू शकते.

विचारांची दृष्टी

NLP मधील आणखी एक अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत असा आहे की, आपण जगाला जसे आहे तसे पाहत नाही; आपण जसे आहोत तसे पाहतो. आपल्या आयुष्यातील अनुभव, मनातील श्रद्धा, जपलेले विश्वास, पूर्वग्रह, घेतलेले निर्णय आणि स्मृती, हे सर्व आपल्या दृष्टीला आकार देत असतात. म्हणूनच एकाच प्रसंगाकडे पाहणाऱ्या दोन व्यक्तींना दोन पूर्णपणे वेगवेगळे अर्थ दिसू शकतात. एका व्यक्तीला संकट दिसते, तर दुसऱ्याला त्यात संधी दिसते. एका व्यक्तीला अपयश जाणवते, तर दुसरी व्यक्ती त्याच अनुभवाकडे शिकण्याची संधी म्हणून पाहते. आपल्या मराठीत याच विचाराला अत्यंत सुंदर म्हण आहे, 'जशी दृष्टी, तशी सृष्टी'. आपण ज्या नजरेने जगाकडे पाहतो, तशीच आपली दुनिया घडत जाते. NLP विविध क्षेत्रांत वापरले जाते. वैयक्तिक विकास, नेतृत्व, संवादकौशल्य, विक्री, प्रशिक्षण आणि कोचिंगमध्ये त्याचा उपयोग केला जातो. भीती कमी करण्यासाठी विचारांची पुनर्रचना, संवाद अधिक प्रभावी बनवणे, ध्येय निश्चित करणे आणि व्यक्तीला मानसिक अडथळ्यांतून बाहेर काढण्याचा प्रयत्न NLP द्वारे केला जातो.

मानसिक आरोग्याचा सुरक्षित आणि विश्वासार्ह मार्ग

NLP लोकप्रिय असले, तरी वैज्ञानिक आणि वैद्यकीय क्षेत्रात त्याच्या परिणामकारकतेबाबत एकमत नाही. अनेक मानसशास्त्रज्ञ आणि संशोधक त्याला 'छद्मविज्ञान' (Pseudoscience) मानतात, कारण त्याच्या प्रभावीपणाला पुरेशा प्रमाणात वैज्ञानिक पुरावे उपलब्ध नाहीत. त्यामुळे नैराश्य, चिंता किंवा इतर मानसिक आरोग्याच्या गंभीर समस्या असल्यास मानसोपचारतज्ज्ञ, मानसशास्त्रज्ञ किंवा पुराव्यावर आधारित उपचार पद्धतींची मदत घेणे अत्यंत आवश्यक आहे. NLP पूरक साधन म्हणून उपयोगी ठरू शकते; पण ते वैज्ञानिक उपचारांचा पर्याय नाही. आजच्या काळात मानसिक आरोग्याच्या नावाखाली अनेक संस्था, कार्यशाळा आणि प्रशिक्षण कार्यक्रम कार्यरत आहेत. लँडमार्क फोरम, REBT, माइंडफुलनेस, इनर इंजिनीअरिंग, लॉ ऑफ अ‍ॅट्रॅक्शन, विपश्यना, विविध आश्रम आणि इतर अनेक विचारप्रवाह आपापल्या पद्धतीने जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन देतात. त्यातील प्रत्येकाची काही बलस्थाने आणि काही मर्यादा आहेत.

या सर्वांमधून नेमके काय स्वीकारायचे, हे ठरविण्याची जबाबदारी मात्र आपलीच आहे. म्हणून कोणतीही पद्धत स्वीकारताना आपला विवेक जागा ठेवणे आवश्यक आहे. कोणतीही संकल्पना अंधपणे स्वीकारण्याऐवजी तिची तज्ज्ञांकडून पडताळणी करणे, वैज्ञानिक आधार समजून घेणे आणि स्वतःच्या अनुभवांच्या कसोटीवर तपासणे अधिक महत्त्वाचे आहे. शेवटी, प्रत्येक माणसाच्या खांद्यावर त्याचे स्वतःचे डोके असते. त्या डोक्याचा वापर विवेकाने करणे, हाच खऱ्या अर्थाने मानसिक आरोग्याकडे जाणारा सर्वात सुरक्षित आणि विश्वासार्ह मार्ग आहे.

मन समजून घेण्याचा प्रवास कोणत्याही एका तंत्राने पूर्ण होत नाही. तो सतत शिकण्याचा, स्वतःला जाणून घेण्याचा आणि अधिक सजगपणे जगण्याचा प्रवास असतो. आपले विचार, भावना, भाषा आणि कृती यांच्यामध्ये सुसंवाद निर्माण करणे हीच खरी मनःशांतीची वाट आहे. NLP त्या प्रवासातील एक दिशा दाखवणारे साधन असू शकते; पण अंतिम निर्णय आणि जबाबदारी मात्र प्रत्येक व्यक्तीची स्वतःचीच असते. बरोबर ना!

(वस्तू व सेवाकर विभाग, पुणे, महाराष्ट्र शासन.)

कविता

मुसळधार भेट...

येणाऱ्या पहिल्या पावसाला
मी नाव तुझे सांगणार आहे,
मागच्या पावसापासून या पावसापर्यंत
एकदाही न भेटता,
कित्येकदा येऊन भिडत राहिलास
असा साधा हिशेब घेऊन
मी ठाण मांडून बसणार आहे,
पावसाळा ते पावसाळा
माझा कसा कोरडाच रे ऋतू
असा किती काळ माझा हंगाम तरसणार आहे...

तुझ्या पावसाची नसेल तयारी
तर मला खुशाल सांग,
मी यंदा तुझाही ढग घेऊन
मुसळधार बरसणार आहे...

मग वारा घेऊन माझं अधीर मन
सोसाट्याने सुटणार आहे,
माझ्या रागातील आग होऊन वीज
आकाशासह तुटून खाली पडणार आहे...

अंतरातला ओलावा असा जोरात
उसळून डोळ्यातून टपटपणार आहे,
मातीचा गंध क्षणात धडधडून येईल वर
अन् वेगात उलट्या पावली
पाण्यात विरघळणार आहे...

झाडांच्या छत्र्या पाऊस झेलणार नाहीत यंदा
ढग बनून त्याही धो-धो कोसळणार आहेत,
नदीनाले तुडुंब भरून ओसंडून
माझ्या पावसात वाहून जाणार आहेत...

तलाव अन् विहिरी भरून काठोकाठ
पाऊसपाण्याला बाहेर सांडणार आहेत,
सुकली माती अन जमिनीची कोरडी जखम
पाऊसपाण्याने मी सांधणार आहे...

तडा गेलेल्या शेतात आता एक
हिरवगार गर्द रान उठणार आहे,
कुणी, बीज पेरो अथवा न पेरो
हट्टाची हिरवळ अशी या हंगामात वाढणार आहे...

निसर्गाचं चक्र राहू दे वाट पाहत
यंदा माझा पाऊस मीच पाडणार आहे...

– लीना संखे,
उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.

या उंचच उंच झाडांना पाहून काही शब्द ओठावर आले...

माझं शरीर माणसाचं
तुझं शरीर झाडाचं,
माझ्या वाहिन्यात रक्त वाहतं
तुझ्या वाहिन्यात पाणी,
सांग तुझ्या जगण्यातही असते का
मनुष्यासारखी आणीबाणी...

झगडतोस का तूही भरण्या
दोन वेळचे पोट,
स्वार्थासाठी तूही घेतोस का
दुसऱ्याच्या नरडीचा घोट...

दिवसभर उन्हात तापून
तुलाही येतो का ताप,
कोणती औषधे घेऊन
त्यावर तू करतोस मात...

तू बहरला नाही त्याचं
दुखः तुला होत का?
तुझा समाज तुला यावर
टोमणे मारत नाही का?

तुझं बरं आहे,
तू जागेवरून हलत नाहीस,
जरी नाही आला पाऊस तरी
खोलवर रुजायचं विसरत नाहीस...

जमिनीत तुझी मुळं घट्ट रोवून
दिमाखात उभा असतोस,
आले किती वादळं तरी त्यांना शमवतोस...

थोड्याशा यशाने हुरळून
मनुष्य उडतो रे हवेत,
तू मात्र उडणाऱ्या विहंगांना घेतोस कवेत...

तुझी ही जिद्द गड्या तू मला दे
जगण्यात माझ्या तुझी कला दे..
तुझी परोपकारी माया, माझ्या अंगी भिनू दे
तुझी स्थितप्रज्ञता माझ्या कणाकणात रुजू दे....

– अश्विनी धावणे,
पर्यटन व सांस्कृतिक विभाग महाराष्ट्र शासन.

अंगारा...

मंत्रालयाला आग लागली त्यादिवशी,
जोराचा पाऊस पडावा म्हणून, खूप विनवणी केली त्याची,
नाही पाझरले हृदय आभाळाचे...

आज आषाढात श्रावणाची धार कोसळली...
एक जळालेल्या कागदाचा बंद्या रुपयाएवढा तुकडा
चौथ्या मजल्यावरून पावसाला घाबरून
खिडकीतून अलगद् माझ्या दालनात येऊन पडला,
कुठल्या विभागातल्या कोणत्या फाईलीचा कोण जाणे
वैयक्तिक लाभाच्या योजनेचा अर्ज की,
निराधारांसाठी नियम शिथिल करावयाचा प्रस्ताव?
एका कागदाच्या कपट्यामागे हजारो संभाव्य चेहऱ्यांची गर्दी...

गर्दीत एक चेहरा,
बंद्या रुपयाएवढं कुंकू लावून-लावून
रापलेल्या कपाळावर पांढरी खूण उमटलेली,
ठिगळांची नऊवारी आणि विटकी चोळी घातलेली,
दारिद्र्याने दात काळे पडलेली
एक अगतिक म्हातारी बाई...
डोळ्यात पाणी आणून गेली...
मी देवाकडे प्रार्थना केली
'देवा हा कपटा त्या फाईलचा नसू दे'
कागदाचा कपटा पुन्हा वाऱ्याने उडाला
एवढा नाजूक,
उडता-उडता त्याचा देवाचा अंगारा झाला...

– विवेक दहिफळे,
('गृहपाठ' या काव्यसंग्रहातून)

सरिता

मृगनयनी सुहास्य वदनी
मंगल हृदयी चंचल ती...
ती भावनांचा गुंता
दवबिंदुंची अनंत माळ
स्व विश्वात रममाण ती...

कधी शांत दर्यापरी गूढगम्य ती
कधी विशाल डोंगरापरी सौम्य ती
कधी शंकराचा रूद्र तांडव ती
कधी पार्वतीसम प्रेमळ माता ती
इंद्रधनूचे सप्तरंगी भावतरंग ती...

सोडून मागे हिरवे माहेर
डोंगर अहळ, आभाळ सोबती
चंद्र धवल तिच्या साक्षीला
दया अनंत कृष्ण सखा
भेटीस त्याच्या अधीर, व्याकूळ ती...

कृष्णसख्याची अथांग दर्याची
धुंदावल्या बासुरीची वेडी सरिता
श्यामसख्याचा निळा रंग ती
षड्जांच्या सुरांची खुळी खुळी,
तटिनी ती, बावरी राधा ती...

का कोण जाणे
जरी हास्य तिचे मोतेरी
जरी हास्य तिचे रूपेरी
खोल खोल मनात
मनातल्या डोहात
कुठेतरी अस्वस्थ
कुठेतरी संभ्रमी
कुठेतरी अतृप्त ती...

– अजय भोसले,
अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.

विद्यार्थी विज्ञान वारी

ब्रिजकिशोर झंवर

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती आणि नवकल्पनांची क्षमता विकसित करणे ही काळाची गरज बनली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्येही अनुभवाधारित शिक्षण, संशोधन, नवोपक्रम आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरावर विशेष भर देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने 'मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी' हा महत्त्वाकांक्षी आणि दूरदृष्टीपूर्ण उपक्रम सुरू केला आहे. विद्यार्थ्यांना विज्ञानाची आवड निर्माण करणे, त्यांची जिज्ञासा वाढविणे आणि त्यांना जागतिक दर्जाच्या वैज्ञानिक संस्थांचा परिचय करून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

राज्यात दरवर्षी राष्ट्रीय बालवैज्ञानिक प्रदर्शनाच्या अनुषंगाने तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावर विज्ञान प्रदर्शनांचे आयोजन केले जाते. या प्रदर्शनांमध्ये विद्यार्थी विविध वैज्ञानिक संकल्पना, प्रयोग आणि नवकल्पना सादर करतात. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता, समस्या सोडविण्याची क्षमता आणि संशोधनात्मक विचार विकसित होण्यास मदत होते. मात्र विज्ञान प्रदर्शनांमध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा आणि विज्ञान–तंत्रज्ञानाविषयी त्यांच्यामध्ये दीर्घकालीन आकर्षण निर्माण व्हावे, यासाठी शासनाने विज्ञान प्रदर्शनांना प्रेरणादायी स्वरूप देण्याचा निर्णय घेतला आहे.

या उपक्रमांतर्गत तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना विज्ञानाच्या प्रत्यक्ष अनुभवाची संधी दिली जाणार आहे. राज्यातील ३५८ तालुक्यांमधून निवड होणाऱ्या प्रत्येकी सहा विद्यार्थ्यांसह एकूण २,१४८ विद्यार्थ्यांना त्यांच्या जवळील विज्ञान केंद्रांना भेटी आयोजित करण्यात येणार आहेत. नागपूर येथील रमन सायन्स सेंटर, पुणे येथील पिंपरी–चिंचवड सायन्स सेंटर; तसेच मुंबई येथील नेहरू तारांगण यांसारख्या संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक पाहण्याची संधी मिळेल. विज्ञान केवळ पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष अनुभवातून समजावे, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा हेतू आहे.

या पुढील टप्प्यात जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनांमधून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना देशातील अग्रगण्य अंतराळ संशोधन संस्थेला भेट देण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सामान्य, दिव्यांग आणि आदिवासी गटांतील एकूण १८० विद्यार्थ्यांना आणि त्यांच्यासोबतच्या शिक्षकांना बेंगळुरू येथील Indian Space Research Organisation (इस्त्रो) केंद्राला भेट देता येणार आहे. भारताच्या अंतराळ मोहिमा, उपग्रह तंत्रज्ञान, संशोधन प्रयोगशाळा आणि वैज्ञानिक कार्यपद्धती यांचा प्रत्यक्ष परिचय विद्यार्थ्यांना या भेटीद्वारे होणार आहे. त्यामुळे विज्ञान क्षेत्रात करिअर करण्याची प्रेरणा मिळण्याबरोबरच देशाच्या वैज्ञानिक प्रगतीबद्दल अभिमानाची भावना निर्माण होईल.

'मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी'ची सर्वाधिक वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनांमधून निवड झालेल्या उत्कृष्ट विद्यार्थ्यांना अमेरिकेतील National Aeronautics and Space Administration (नासा) केंद्राला भेट देण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्राथमिक, माध्यमिक, दिव्यांग आणि आदिवासी गटांतील एकूण ५१ गुणवंत विद्यार्थ्यांची निवड या शैक्षणिक दौऱ्यासाठी करण्यात येणार आहे. त्यांच्यासोबत शिक्षक आणि प्रशासकीय अधिकारीही सहभागी होणार आहेत. नासा भेटीद्वारे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील अंतराळ संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान, वैज्ञानिक प्रयोगशाळा आणि संशोधन संस्कृतीचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे. भविष्यातील वैज्ञानिक, अभियंते आणि संशोधक घडविण्यासाठी ही संधी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

या उपक्रमासाठी शासनाने आवश्यक आर्थिक तरतूदही केली आहे. नासा भेटीसाठी विमानप्रवास, व्हिसा, निवास व्यवस्था आणि स्थानिक प्रवासाचा खर्च विचारात घेऊन सुमारे ३.३० कोटी रुपयांच्या निधीस मान्यता देण्यात आली आहे. तसेच तालुका आणि जिल्हास्तरीय विज्ञान वारीसाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

'मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी' हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक क्षमतेला नवे क्षितिज उपलब्ध करून देणारा ठरणार आहे. विज्ञान प्रदर्शनातील सहभागाला प्रोत्साहन देत विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक संस्थांचा प्रत्यक्ष परिचय करून देणारा हा उपक्रम विज्ञाननिष्ठ, संशोधनाभिमुख आणि नवोन्मेषी महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल मानला जात आहे. विद्यार्थ्यांच्या मनात विज्ञानाची गोडी निर्माण करून त्यांना जागतिक दर्जाच्या संधी उपलब्ध करून देण्याचा शासनाचा हा प्रयत्न विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्राच्या निर्मितीस निश्चितच बळकटी देणारा ठरेल.

(विभागीय संपर्क अधिकारी, महाराष्ट्र शासन.)

शाळेतील पहिल्या दिवसाच्या स्वागताचा उत्सव : 'शाळा प्रवेशोत्सव'

ब्रिजकिशोर झंवर

राज्यातील सर्व मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पटसंख्या वाढविणे; तसेच शाळेच्या पहिल्या दिवसाचे उत्सवात रूपांतर करणे, या उद्देशाने राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्यावतीने 'शाळा प्रवेशोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. शालेय शिक्षणाचा पहिला दिवस विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि संस्मरणीय क्षण असल्याने या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत आनंददायी वातावरणात केल्यास त्यांचा उत्साह द्विगुणित होईल आणि शैक्षणिक वर्षाची सुरुवात अत्यंत उत्साही आणि आनंददायी वातावरणात होईल. यासाठी विदर्भातील शाळा वगळता उर्वरित महाराष्ट्रात यंदाचा 'शाळा प्रवेशोत्सव' १५ जून २०२६ रोजी साजरा करण्यात आला.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमानुसार प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. या पार्श्वभूमीवर शाळा प्रवेशोत्सव हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आकर्षण निर्माण करणे, पालकांचा विश्वास दृढ करणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांबाबत सकारात्मक वातावरण तयार करणे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

शालेय शिक्षण विभागाने शाळा प्रवेशोत्सवासाठी व्यापक नियोजन केले. राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्रीमंडळातील सदस्य, लोकप्रतिनिधी; तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी राज्यभरातील विविध शाळांना भेट देऊन नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

मागील वर्षी राबविण्यात आलेल्या शाळा प्रवेशोत्सवामुळे शाळांमधील पटसंख्येतील घट कमी होण्यास मदत झाली. काही जिल्ह्यांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत पटसंख्येत वाढही दिसून आली. या सकारात्मक परिणामांच्या आधारे यंदा अधिक व्यापक आणि परिणामकारक पद्धतीने हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शाळा प्रवेशोत्सवांतर्गत प्रत्येक शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले गेले. 'पहिले पाऊल' या संकल्पनेंतर्गत इयत्ता पहिलीत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या पायाचा ठसा घेऊन त्याची प्रत पालकांना दिली गेली. तसेच सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके आणि गणवेशांचे वितरण करण्यात आले असून शाळेचा पहिला दिवस उत्सवाप्रमाणे साजरा केला गेला.

या उपक्रमात लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांची सक्रिय भूमिका निश्चित करण्यात आली आहे. प्रत्येक लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्याने किमान एका शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करायचे आणि संबंधित अधिकाऱ्यांनी शाळा वर्षभरासाठी 'दत्तक शाळा' म्हणून स्वीकारून तेथील शैक्षणिक गुणवत्ता, भौतिक सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घ्यायचा आहे. यामुळे शाळांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे.

शाळांमधील पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांनी परिसरातील अंगणवाडी व बालवाडी केंद्रांना भेट देऊन प्रवेशपात्र विद्यार्थ्यांची माहिती संकलित करावी, पालकांशी संवाद साधावा आणि शासकीय शाळांमधील विविध सुविधा, शिष्यवृत्ती, नावीन्यपूर्ण उपक्रम यांची माहिती द्यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. समाजमाध्यमे, ग्रामस्तरीय जनजागृती, दवंडी आणि पालकांच्या व्हॉट्सॲप गटांद्वारेही शाळा सुरू होण्याबाबत व्यापक प्रचार-प्रसार करण्यात आला.

यंदाच्या प्रवेशोत्सवासाठी जिल्हास्तरावर विशेष नियंत्रण व्यवस्था उभारण्यात आली असून 'शाळा प्रवेशोत्सव कक्ष' स्थापन करून कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवले गेले. लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांच्या शाळा भेटींची माहिती, छायाचित्रे आणि अहवाल ऑनलाइन प्रणालीद्वारे नोंदविले जाणार आहेत. शिक्षण हा सामाजिक परिवर्तनाचा सर्वात प्रभावी मार्ग मानला जातो. शाळा प्रवेशोत्सव २०२६ हा उपक्रम विद्यार्थ्यांचे शाळेशी नाते अधिक दृढ करण्याबरोबरच गुणवत्तापूर्ण शिक्षण, वाढती उपस्थिती आणि सक्षम शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. शासन, प्रशासन, शिक्षक, पालक आणि समाज यांच्या संयुक्त सहभागातून प्रत्येक बालक शिक्षणाच्या प्रवाहात यावे, हा या उपक्रमामागील मूलभूत हेतू असून त्याद्वारे 'शिक्षणसमृद्ध महाराष्ट्र' घडविण्याच्या दिशेने आणखी एक सकारात्मक पाऊल टाकले जात आहे.

(विभागीय संपर्क अधिकारी, महाराष्ट्र शासन.)

मराठी माझी शाळा

प्रवीण टाके

जून महिना उजाडला की, नव्या शैक्षणिक वर्षाची चाहूल लागते. घराघरांत मुलांच्या शाळा प्रवेशाची लगबग सुरू होते. आपल्या पाल्याला कोणत्या शाळेत प्रवेश द्यावा, हा प्रत्येक पालकासमोरील महत्त्वाचा प्रश्न असतो. अशा वेळी एक मराठी माणूस, एक जबाबदार पालक आणि आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगणारा नागरिक म्हणून आपण स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे, आपल्या मुलाला जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत प्रवेश का देऊ नये?

आज आपल्या राज्यातील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक, माध्यमिक शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षण, उत्तम शिक्षक, आधुनिक सुविधा आणि संस्कारक्षम वातावरण यामुळे नव्या उंचीवर पोहोचत आहेत. याला आणखी उंचीवर पोहोचविण्यासाठी आवश्यक आहे तो पालकांचा विश्वास आणि पालक म्हणून आपला सक्रिय सहभाग! केवळ अफवा आणि यंत्रणेसंदर्भातील नकारात्मक दृष्टिकोन यामुळे ग्रामीण भागातील कमी खर्चाची, योग्य गुणवत्तेची आणि संस्कार करणारी एक यंत्रणा आम्ही कमकुवत तर करत नाही ना? हा प्रश्न एकदा स्वतःला विचारणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रात आतापर्यंत इतिहास घडवला तो जिल्हा परिषदेच्या शाळांनी. या शाळांमधून आजचे उच्चपदस्थ अधिकारी, शास्त्रज्ञ, डॉक्टर, वकील, कवी, लेखक, कृषीतज्ज्ञ, समाजसुधारक तयार झाले आहेत. विशेषतः मराठी माध्यमातून शिकूनही ते कुठेही गुणवत्तेत मागे पडलेले नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उदाहरण आमच्या अनेक पिढ्यांनी अनुभवले आहे. अपार कष्ट, अवहेलना सहन करून अशा शाळांमधून शिक्षण घेत त्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. देशातील मोठमोठ्या संस्थांवरचे गुणवान जिल्हा परिषदेच्या शाळांमधूनच तयार झाले आहे. त्यामुळे आपल्या पाल्यांना मराठी माध्यमाच्या आणि विशेषतः जिल्हा परिषद शाळांच्या दारी नेण्याची हीच योग्य वेळ आहे.

जिल्हा परिषद शाळा : गुणवत्तेची खात्री

जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची निवड अत्यंत पारदर्शक आणि गुणवत्तेच्या निकषांवर आधारित असते. शिक्षक पात्रता परीक्षा (TET), विविध स्पर्धात्मक प्रक्रिया, शैक्षणिक गुणवत्ता आणि शासनाने ठरवून दिलेल्या नियमांच्या आधारे शिक्षकांची नियुक्ती केली जाते. त्यामुळे समाजातील गुणवंत, प्रशिक्षित युवकच शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांसमोर उभे राहतात. जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या गुणवत्तेची वेळोवेळी तपासणी होते. प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे या शाळांमध्ये अप्रशिक्षित शिक्षक हा प्रश्न निकाली निघाला आहे.

शिक्षक हे राष्ट्रनिर्माते असतात. आपल्या गुरु-शिष्य प्राचीन परंपरेला याच शाळा पुढे घेऊन गेल्या आहेत. येथील शिक्षक केवळ अभ्यासक्रम शिकवत नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, संस्कारांसाठी, देशाच्या आधुनिक शैक्षणिक धोरणांशी जोडले गेले असतात. त्यामुळे शासकीय शैक्षणिक संस्था अर्थात आपल्या शाळा जबाबदार नागरिक घडविणारी यंत्रणा म्हणून पुढे आल्या आहेत.

मातृभाषेतून शिक्षण : अधिक आत्मविश्वास देणारे

शैक्षणिक संशोधन सातत्याने सांगते की, मुलांचे प्राथमिक शिक्षण मातृभाषेत झाले, तर त्यांची आकलनशक्ती, विचारशक्ती आणि सर्जनशीलता अधिक चांगल्या प्रकारे विकसित होते. मराठी माध्यमातून शिकणारी मुले केवळ भाषा शिकत नाहीत, तर आपल्या संस्कृतीशी, इतिहासाशी, परंपरांशी, वारशाशी आणि सामाजिक मूल्यांशी जोडली जातात.

मराठी भाषेतील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. ते आपले विचार स्पष्टपणे व्यक्त करू शकतात. इंग्रजी व अन्य भाषा शिकणे आवश्यक आहेच; परंतु शिक्षणाचा पाया मातृभाषेत असणे अधिक परिणामकारक असल्याचे अनेक जागतिक तज्ज्ञांनी नमूद केले आहे.

सर्वात मोठे बलस्थान : समर्पित शिक्षक

जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना शासनाकडून नियमित व पूर्ण वेतन दिले जाते. त्यामुळे त्यांचे संपूर्ण लक्ष अध्यापन, विद्यार्थ्यांचा विकास आणि शाळेच्या प्रगतीकडे केंद्रित राहते. काही समर्पित शिक्षक स्वतःच्या खर्चातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देतात, विविध उपक्रम राबवितात आणि गावोगावी शिक्षणाची ज्योत तेवत ठेवतात. साने गुरुजींच्या महाराष्ट्रात आजही अनेक ठिकाणी शिक्षकांच्या नावाने त्या शाळा ओळखल्या जातात.

आज अनेक जिल्हा परिषद शाळांनी डिजिटल वर्गखोल्या, संगणक शिक्षण, विज्ञान प्रयोगशाळा, ई-लर्निंग सुविधा, क्रीडा साहित्य आणि विविध नवोपक्रमांच्या माध्यमातून उल्लेखनीय प्रगती साधली आहे. सेमी

इंग्लिश शिक्षण पद्धतीचा शाळांनी अवलंब केला आहे. शालेय व्यवस्थापन समिती आणि माझी विद्यार्थी मंडळाकडून अनेक सुधारणा होत आहे.

राज्याचे शैक्षणिक धोरण; मातृभाषेचे महत्त्व

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०; तसेच महाराष्ट्र शासनाचे शैक्षणिक धोरण प्राथमिक स्तरावर मातृभाषेत शिक्षण देण्याला विशेष महत्त्व देते. मुलांचा बौद्धिक विकास, भाषिक कौशल्ये आणि संकल्पना समजून घेण्याची क्षमता वाढविण्यासाठी मातृभाषा हे सर्वात प्रभावी माध्यम असल्याचे या धोरणांमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. याच विचारातून महाराष्ट्रातील मराठी शाळांना अधिक सक्षम, आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण बनविण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. विशेष म्हणजे कला, क्रीडा, स्पर्धापरीक्षा या संदर्भातील मुलांच्या विकासाची यंत्रणा, श्रृंखला याच शाळांमध्ये पूर्ण होते. इथे निधीअभावी कधीही विद्यार्थ्याच्या खिशातून पैसा काढून स्पर्धा घेतली जात नाही, रद्द होत नाही, पुढे ढकलली जात नाही. क्रीडा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, विज्ञान प्रदर्शनी, शिक्षकांचे प्रशिक्षण एकदा ठरले की, पूर्ण केले जाते. राज्याच्या बालकल्याण धोरणाला, बौद्धिक धोरणाला याच व्यासपीठावर राबविले जाते. त्यामुळे या यंत्रणेतून आपण बाद तर होत नाही ना? याचा विचार व्हावा.

आता प्रवेशासाठी लागतात रांगा...

एक काळ असा होता की, काही पालकांना जिल्हा परिषद शाळा म्हणजे ग्रामीण भागातील भक्कम पर्याय वाटत असे. मात्र, अफवा, गैरसमज आणि काही अपवादात्मक घटनांनी या शाळा मधल्या काळात ओस पडायला लागल्या होत्या. मात्र आज परिस्थिती बदलली आहे. राज्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांनी आपल्या गुणवत्तेमुळे वेगळी ओळख निर्माण केली आहे. सातारा, कोल्हापूर, पुणे, सिंधुदुर्ग, नाशिक, नागपूर, जळगाव आणि इतर अनेक जिल्ह्यांतील काही जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेशासाठी पालकांची मोठी मागणी दिसून येते. अनेक शिक्षकांनी आपल्या दायित्वातून, गुणवत्तेतून, कल्पकतेतून शाळांना नवी ओळख दिली आहे. डिजिटल शिक्षण, शैक्षणिक गुणवत्ता, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, संस्कारक्षम वातावरण आणि विद्यार्थ्यांचे उत्कृष्ट निकाल यामुळे या शाळांवर पालकांचा विश्वास वाढत आहे.

नवे शैक्षणिक धोरण : शाळांनी कात टाकली...

काही ठिकाणी अपवादात्मक शाळांच्या जीर्ण इमारती व आवश्यक सोयीसुविधांची कमतरता दिसते. त्यामुळे पालकांनी केवळ भौतिक सुविधा बघून शाळांबाबत भूमिका बनविणे अयोग्य आहे. गरिबातील गरीब विद्यार्थ्यापासून सर्वांना शिक्षण मिळावे, अशी समतोल भूमिका शासनाची आहे. त्यामुळे अतिशय माफक शुल्कामध्ये या शाळेतील शिक्षण मुलांना घेता येते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अनेक ॲप्स शाळांनी विकसित केले आहे. शिक्षकांना जबाबदारीने आपले कर्तव्य पार पाडावे लागत आहे. 'निपुण शाळा' या मोहिमेतून शाळांतील शिक्षणावर नियंत्रण ठेवले जात आहे. तिसऱ्या वर्गापासून प्रज्ञाशोध परीक्षा, चौथी व सातवीत होणारी स्कॉलरशिप परीक्षा, टॅलेंट सर्च परीक्षा, शालेय गणवेश, शालेय पोषण आहार, सगळ्यांना मोफत पुस्तके, केळी व अंडी वाटप, मुलींसाठी दैनिक भत्ता, मुलींना स्वतंत्र स्वच्छतागृह, सॅनेटरी नॅपकीनची उपलब्धता, प्रवेश उत्सव, संस्कार शिबिर अशा विविध उपक्रमांना शाळेत राबविण्यात येते. पहिलीपासून इंग्रजी अनिवार्य केले आहे. त्यामुळे इंग्रजीपासून कोणी वंचित राहत नाही. प्रत्येक जिल्ह्यातील काही शाळा सेमी इंग्लिश झाल्या आहेत. याशिवाय या सर्व यंत्रणेवर पालकांच्या पाच समित्यांचे नियंत्रण असते. त्यामुळे बाह्य चकाकी व इंग्रजी माध्यमांच्या आग्रहातून मुले दर्जेदार प्रशिक्षित शिक्षकांपासून, शिक्षणापासून वंचित राहू नये, यावर विचार करण्याची ही गरज आहे.

अनेक गावांनी शाळांसाठी घेतला पुढाकार...

मराठी शाळा वाचविणे म्हणजे आपली ओळख जपणे होय. घरापासून योग्य अंतरावर असणारी शाळा मुलांना त्यांच्या बाल्यावस्थेत खेळ व अन्य कला-गुणांसाठी भरपूर वेळ वाचवू शकते. गावातील शाळा बाजूला ठेवून शहरातील, तालुक्याच्या ठिकाणच्या शाळांसाठी पालकांना मोठ्या प्रमाणात अतिरिक्त खर्चही करावा लागतो. वाहन व्यवस्था करावी लागते. यामध्ये मुलांच्या जडणघडणीचा वेळ जातो. अनेक गावांनी ग्रामपंचायतीमार्फत ज्या पालकांनी जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घेतला त्यांना घरपट्टीतही सवलत दिली आहे. अनेक गावांनी शिक्षकांना मुख्यालयी राहणे अनिवार्य केले आहे. गावाचे, गावातील प्रमुखांचे, शाळांकडे लक्ष असणे आणि शिक्षकांचे गावातच राहणे यामुळे आदर्श जीवनपद्धतीची जपणूकही होते. गावाप्रतिचा आदरही वृद्धिंगत होतो. शाळा म्हणजे केवळ शिक्षण देणारी संस्था नसते; ती संस्कृती, परंपरा, मूल्ये आणि समाजाची ओळख जपणारे केंद्र असते. गरिबी, श्रीमंतीसोबत मिळणारे एकत्रित शिक्षण सामाजिक जाणिवा वृद्धिंगत करते. त्यामुळे मराठी शाळा टिकल्या, तर मराठी भाषा टिकेल. मराठी भाषा टिकली तर महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख अधिक बळकट राहील.

त्यामुळे आज आपल्या मुलाला मराठी शाळेत प्रवेश देणे म्हणजे केवळ एका शाळेची निवड नव्हे; तर आपल्या भाषेवर, संस्कृतीवर आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्थेवर व्यक्त केलेला विश्वास आहे. पालक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, तलाठी, नगरसेवक, सरपंच, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणतज्ज्ञ या सर्वांनीच ही बाब अधोरेखित करावी. अनियंत्रित खासगी यंत्रणेचे फटके समाजव्यवस्थेला बसत असताना, शिक्षणाची ही मूळ साखळी पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन शाळांना, शाळेच्या यंत्रणेला बळकट करणे आवश्यक आहे.

चला, एक सकारात्मक निर्णय घेऊ या!

यंदाच्या शैक्षणिक वर्षात आपल्या गावातील, परिसरातील जिल्हा परिषद शाळेला भेट द्या. तेथील शिक्षकांशी संवाद साधा. शाळेच्या सुविधा पाहा. विद्यार्थ्यांचे यश जाणून घ्या आणि मग आपल्या पाल्याच्या भविष्यासाठी विचारपूर्वक निर्णय घ्या.

आमचे आई-वडील, आम्ही आणि आमची मुले जिल्हा परिषदेच्या शाळेतच शिकलेलो आहोत. त्यामुळे या वर्षी निर्धारपूर्वक ठरवू या, आपल्या पुढच्या पिढीतील पाल्यांना मराठी शाळेत घालू या...

मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यांचा अभिमानाने वारसा पुढील पिढीकडे सुपूर्द करू या!

(उपसंचालक, (माहिती) विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर
(मोबाइल क्र.: ९७०२८५८७७७), महाराष्ट्र शासन.)

राष्ट्रीय सांख्यिकी दिन

संदीप वि.देवरे

जे मोजले जाते, तेच समजते; जे समजते, त्याचेच योग्य नियोजन करता येते. आधुनिक प्रशासनशास्त्रातील हे सूत्र आजच्या डेटा-केंद्रित युगात अधिकच महत्त्वाचे ठरले आहे. कोणत्याही राष्ट्राचा विकास केवळ आर्थिक संसाधने, तांत्रिक प्रगती किंवा भौतिक पायाभूत सुविधांवर अवलंबून नसतो; तो विश्वासार्ह माहिती, वैज्ञानिक विश्लेषण आणि पुराव्यावर आधारित निर्णयप्रक्रियेवरही तितकाच आधारलेला असतो. त्यामुळे सांख्यिकी ही केवळ आकड्यांची मांडणी नसून सुशासन, विकास आणि लोककल्याण यांचा मूलाधार आहे.

याच विचारांचा गौरव करण्यासाठी भारतात दरवर्षी २९ जून हा दिवस राष्ट्रीय सांख्यिकी दिन (National Statistics Day) म्हणून साजरा केला जातो. हा दिवस भारतीय सांख्यिकीचे जनक मानले जाणारे प्रा. प्रशांतचंद्र महालनोबीस यांच्या जयंतीनिमित्त पाळला जातो. सार्वजनिक धोरणनिर्मिती, विकास नियोजन आणि पुराव्यावर आधारित प्रशासनामध्ये सांख्यिकीचे महत्त्व अधोरेखित करणे, हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे.

स्वातंत्र्यानंतर नव्या भारताच्या उभारणीत विज्ञान, संशोधन आणि नियोजनाधारित विकासाला प्राधान्य देण्यात आले. विकासाचा पाया वस्तुनिष्ठ माहितीवर असावा, या विचाराला प्रा. प्रशांतचंद्र महालनोबीस यांच्या कार्यामुळे वैज्ञानिक बळ मिळाले. त्यांनी भारतात सांख्यिकीला संस्थात्मक स्वरूप दिले आणि राष्ट्रीय नियोजनात तिचा प्रभावी समावेश घडवून आणला.

प्रा. महालनोबीस यांनी विकसित केलेली नमुना सर्वेक्षण (Sample Survey) पद्धती ही सांख्यिकी क्षेत्रातील महत्त्वपूर्ण देणगी मानली जाते. वैज्ञानिक पद्धतीने निवडलेल्या नमुन्यांच्या आधारे समाजाचे वास्तव समजून घेण्याची ही पद्धत आज जगभर वापरली जाते. त्यांच्या नेतृत्वाखाली विकसित झालेल्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण प्रणालीमुळे भारताची सांख्यिकी व्यवस्था जागतिक स्तरावर ओळखली जाऊ लागली.

पंचवार्षिक योजना, कृषी, उद्योग, रोजगार, आरोग्य, शिक्षण आणि आर्थिक नियोजन अशा विविध क्षेत्रांत विश्वासार्ह आकडेवारीच्या आधारे निर्णय घेण्याची परंपरा त्यांनी दृढ केली.

आजच्या घडीला प्रशासन अधिकाधिक डेटा-आधारित होत आहे. लोकसंख्या, आरोग्य, शिक्षण, शेती, पायाभूत सुविधा, हवामान, उद्योग, डिजिटल अर्थव्यवस्था आणि सामाजिक विकास या प्रत्येक क्षेत्रात अचूक माहिती ही परिणामकारक निर्णयांची पूर्वअट बनली आहे. कोणती योजना अपेक्षित परिणाम देत आहे, कोणत्या क्षेत्रात सुधारणा आवश्यक आहे, संसाधनांचे वितरण अधिक प्रभावी कसे करता येईल आणि भविष्यातील गरजांचा अंदाज कसा घ्यावा, यासाठी सांख्यिकी अत्यावश्यक ठरते.

व्यवस्थापनशास्त्रातील सुप्रसिद्ध तत्त्व आहे, जे मोजता येते, तेच प्रभावीपणे व्यवस्थापित करता येते. शासनाच्या निर्णयप्रक्रियेतही हे तत्त्व तितकेच लागू पडते. अचूक आणि अद्ययावत माहिती उपलब्ध असल्यास धोरणे अधिक वास्तववादी, संसाधनांचा वापर अधिक परिणामकारक आणि विकासाची दिशा अधिक स्पष्ट होते. या उलट अपूर्ण किंवा त्रुटीपूर्ण माहितीमुळे नियोजनात अनिश्चितता निर्माण होऊ शकते. म्हणूनच माहिती संकलन, पडताळणी, विश्लेषण आणि प्रसारण या प्रत्येक टप्प्यात वैज्ञानिकता, पारदर्शकता आणि गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे.

डिजिटल युगाने सांख्यिकीचे स्वरूप अधिक व्यापक केले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence), बिग डेटा, मशीन लर्निंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT), भू-स्थानिक माहिती प्रणाली (GIS) आणि डेटा ॲनालिटिक्स यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे माहितीचे विश्लेषण अधिक वेगवान आणि अचूक होत आहे. मात्र या सर्व तंत्रज्ञानाचा पाया मूळ माहितीच्या गुणवत्तेवरच अवलंबून असतो.

संगणकशास्त्रातील Garbage In, Garbage Out हे तत्त्व याच वास्तवाकडे लक्ष वेधते. जर मूळ माहिती अपूर्ण, विसंगत किंवा चुकीची असेल, तर त्यावर आधारित कृत्रिम बुद्धिमत्तेचे विश्लेषण, अंदाज आणि निर्णयही अचूक असू शकत नाहीत. त्यामुळे डेटा गुणवत्तेची जबाबदारी ही केवळ सांख्यिकी संस्थांची नसून, माहिती संकलन करणाऱ्या प्रत्येक यंत्रणेची आणि डेटा वापरणाऱ्या प्रत्येक संस्थेची सामूहिक जबाबदारी आहे.

भारतात सांख्यिकी व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी डिजिटल डेटा संकलन, रिअल-टाइम माहिती प्रणाली, भौगोलिक माहिती तंत्रज्ञान आणि प्रशासकीय डेटाचे एकत्रीकरण यांवर भर दिला जात आहे. त्यामुळे शासनाचे निर्णय अधिक अचूक, परिणामकारक आणि विश्वासार्ह होत आहेत.

राष्ट्रीय सांख्यिकी दिन हा प्रा. प्रशांतचंद्र महालनोबीस यांच्या कार्याला अभिवादन करण्याबरोबरच वैज्ञानिक दृष्टिकोन, वस्तुनिष्ठ विचार आणि पुराव्यावर आधारित प्रशासनाची बांधिलकी अधोरेखित करणारा दिवस आहे.

'मोजा म्हणजे मिळेल!' या संकल्पनेचा अर्थ केवळ आकडे मोजणे नसून, वास्तव समजून लोकहिताचे निर्णय घेणे हा आहे. विश्वासार्ह सांख्यिकी ही सक्षम, पारदर्शक आणि उत्तरदायी प्रशासनाची भक्कम पायाभरणी असून विकसित भारताच्या वाटचालीत तिचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

(विशेष कार्य अधिकारी, मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), महाराष्ट्र शासन.)

शिबिरातून मिळालेली प्रेरणा

निलेश श्यामल सज्जन बरडे

नमस्कार, माझे नाव निलेश शामल सज्जन बरडे आहे. माझे मूळ गाव सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात असून मी कुटुंबासह वास्तव्यास पुण्यात आहे व नोकरी मुंबईत सुरू आहे. या तीन ठिकाणी आतापर्यंत जडणघडण होत असून त्यात आता सोमनाथची भर पडली.

२००८ मध्ये जेव्हा बाबा आमटे यांचे निधन झाले, तेव्हा पेपरमध्ये सोमनाथविषयी माहिती मिळाली, तेव्हापासून माझी सोमनाथला यायची इच्छा होती, ती यावेळी पूर्ण झाली. शेवटच्या क्षणापर्यंत शिबिराला जाता येईल की नाही हे ठरत नव्हतं; पण जर तुम्ही एखाद्या ठिकाणी मनापासून जायचं ठरलं तर ते होतच असते याची प्रचिती मला या शिबिराच्या निमित्ताने आली. ऑफिसचे महत्त्वाचे काम, तिकीट कन्फर्म नाही असे अडथळे आले; पण जे वरिष्ठ अधिकारी येथे येऊन गेले, त्यांना येथील अनुभव होता. त्यांनी सांगितले, कामे होत असतात; पण ही संधी सोडू नकोस. काहीपण करून तू जा, असे म्हटले. त्यामुळे इकडे येण्याचा मनोदय जास्त पक्का झाला.

आंतर भारती श्रमदान शिबिरात पाच दिवस सलग पाच पुष्प आम्हाला अर्पण करण्यात आली. पुष्प हा शब्दच का योग्य आहे, कारण फुलातून सुगंध मिळतो आणि या शिबिरातील प्रबोधन मार्गदर्शनातून आम्हाला आयुष्यभराचा सुगंध मिळाला.

आंतरभारती श्रमदान शिबिर पहिले पुष्प – सोमनाथ रोडे सर व डॉ. दिगंतदादा, डॉ. अनघाताई आमटे.

श्री. रोडे सर यांनी सोमनाथ शिबिर आयोजित करण्यामागचा बाबांचा पूर्ण उद्देश ते आतापर्यंत इतिहास समजावून सांगितला. डॉ. दिगंतदादा, डॉ. अनघाताई यांनी हेमलकसा येथे काम करताना आलेल्या अडचणी व त्यावर कशी मात केली, याविषयी अनुभव खूप छान प्रकारे समजावून सांगितले.

पुष्प दुसरे – अरुण कदम सर – ५१ वर्षांपासून सोमनाथ प्रकल्पात कार्यरत आहेत.

जगन दादा – सोमनाथ ते हेमलकसा असे ७० किमीचे अंतर सायकलवर पार करून साहित्य पुरवले, अशोक काका – सोमनाथ येथे पाण्याची सोय करताना आलेल्या अडचणी दूर करून त्यावर मात कशी केली हे सांगितले आणि कौस्तुभ आमटेदादा यांनी बाबांच्या स्वप्नातील समाज, त्यासाठी युवकांकडून असलेल्या त्यांच्या अपेक्षा याविषयी विचार मांडले. Community work is less me than more us हे सांगितले.

उपरोक्त सर्वांनी आपले कार्य करताना समर्पण भावनेने झोकून दिले पाहिजे हा वस्तुपाठ मांडला.

संध्याकाळी श्री बागवे सर यांनी 'जोडो भारत'च्या वेगवेगळ्या भाषेतील घोषणा आम्हाला शिकवल्या.

पुष्प तिसरे – डॉ. पौळ सर, माधव कवीश्वर काका, डॉ. स्वाती मॅडम यांनी आनंदवन येथील रुग्णालयात आलेले अनुभव कथन केले. तसेच कवीश्वर काका यांनी आनंदवन येथील व्यवस्थापकीय बाजू, पत्रव्यवहार इत्यादी कशाप्रकारे पहिला याविषयी मार्गदर्शन केले. तसेच कडू सर व अमोल सर यांनी हेमलकसा येथील kg to PG शालेय शिक्षणासाठीची माहिती दिली. वेदनेशी जोडणारे शिक्षण अशी शिक्षणाची व्याख्या सांगितली.

पुष्प चौथे – अनिकेतदादा व समीक्षाताई.

हेमलकसा येथील मुलांच्या शिक्षणासाठी चाललेले प्रयत्न याविषयी माहिती दिली. तसेच आजूबाजूच्या परिसरातून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राहण्याची व्यवस्था हेमलकसामध्ये कशा प्रकारे केली जाते, याविषयी त्यांनी काढलेल्या फोटोंमधून आम्हाला माहिती दिली.

हेमलकसाजवळील आजूबाजूच्या भागात पाण्याची व्यवस्था करण्यासाठी चालू असलेल्या प्रयत्नांची माहिती अनिकेतदादांनी सविस्तरपणे दिली. आदिवासी लोकांकडूनसुद्धा बऱ्याच गोष्टी शिकायला मिळाल्या. आम्ही शिकत आहोत, हे समीक्षाताईंनी प्रांजळपणे आम्हाला सांगितले.

तद्नंतर आमच्याप्रमाणेच श्रमदान शिबिरात सहभागी झालेले मनजीत सिंह व अनंता झेंडे यांनी आम्हाला मार्गदर्शन केले.

मनजीत सिंह यांनी आमच्यासोबत श्रमदान करताना जे सांगितले ते आपल्या सर्वांसाठी नेहमीच प्रेरणादायी राहील. मला तर ते खूप भावलं. ते म्हणाले, काम करत असताना आपण स्वतः काम करत राहायचं, दुसऱ्यांनी काम करावं,

अशी अपेक्षा ठेवायची नाही, त्यांना सतत बोलवायचे नाही, ज्याला काम करायचं आहे तो येणारच; पण तुम्ही तुमचं काम करत राहा. त्यांच्या या वाक्यामुळे आम्हाला जे काम दिलं होतं ते जास्त वाटत होतं ते खूप लवकर झालं. Always Charity begins at home.

तसेच अनंत झेंडे यांनी त्यांच्या श्रीगोंदा येथे सुरू असलेल्या कामाची माहिती दिली. कोणतेही सामाजिक कार्य करताना तुम्हाला अडचणी येणारच; पण त्या दूर पण होतात. जर तुम्ही त्यात झोकून देऊन काम केले तरच हे सांगितले.

पुष्प पाचवे – श्री नायडू सर व पल्लवीताई आमटे.

नायडू काका हे त्यांच्या वडिलांच्या वेळेपासून आनंदवनशी संबंधित आहेत हे समजले, स्वतःची नोकरी करत करत सामाजिक कार्य कसे सुरू ठेवता येते, हे त्यांच्याकडून समजले. पल्लवीताई आमटे यांनी आनंदवन येथील कार्य कसे चालते, ते कार्य करत असताना आमच्याकडून असलेल्या अपेक्षा किंवा तरुणांनी तिथे काम करण्यासाठी यावे, याविषयी मार्गदर्शन केले. आनंदवन येथे खूप प्रकारची कामे चालतात, प्रत्येक काम करत असताना अनेकांच्या मदतीची गरज असते, तर प्रत्येकाने शक्य असेल, त्यांनी आपला सहभाग नोंदवावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

१६ ते २१ मे या कालावधीत श्रमसंस्कार छावणीमध्ये बऱ्याच गोष्टी गवसल्या. त्यातून खूप काही शिकायला मिळालं. बाबांनी दिलेली घोषणा 'श्रम ही हैं श्रीराम हमारा' याचा बोध खऱ्या अर्थाने झाला. पाच दिवसात येथे श्रम करताना आपण कोण आहोत, कुठून आलो, या सगळ्या गोष्टी अहंकाराप्रमाणे गळून पडल्या. येथील मातीशी, येथील लोकांशी एकरूप झालो.

रवी सर यांनी या पाच दिवसात रोज एखादं नवीन गाणं गाऊन आमच्यात स्फुरण चढवले. 'नौजवान आओ रे, लहू का रंग एक है...' इत्यादी ही सर्वच गाणी मनाला भिडणारी आहेत, नेतृत्व कसे असावे, याचे दर्शन रवी सरांच्या माध्यमातून आम्हाला झाले. सारिका मॅडम यांनी शेवटच्या दिवशी घेतलेले गाणे 'तू यावं, तू यावं' पण अप्रतिम होते. तसेच रोज आमच्यासाठी जेवणाची व्यवस्था करणारे सतीश काका आणि त्यांचे सहकारी तसेच प्रत्येक वेळी जिथे–जिथे जाऊ तिथे–तिथे पाण्याची व्यवस्था करणारा शाहरुख या सर्वांचे आभार व्यक्त करणे आवश्यक आहे. शेवटी इतकेच म्हणेल, प्रेरणादायी चित्रपट किंवा भाषणातून मिळालेली प्रेरणा काही काळ राहते; परंतु या शिबिरातून मिळालेली प्रेरणा आम्हा सगळ्यांना अनंतकाळ राहील, यात तिळमात्र शंका नाही.

जातपात के बंधन तोडो, भारत जोडो, भारत जोडो...

(सहायक कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.)

ग्रामीण जीवनाचा जिवंत वारसा : वाडा संस्कृती

अश्विनी पुजारी

ग्रामीण महाराष्ट्राची ओळख मानली जाणारी चिरेबंदी वाडा संस्कृती आज हळूहळू अस्तंगत होताना दिसत आहे. एकेकाळी गावागावांत दिमाखात उभे असलेले दगडी वाडे हे केवळ निवासस्थान नव्हते, तर ग्रामीण परंपरा, नातीगोती, संस्कार आणि सामाजिक एकोप्याचे प्रतीक होते. बदलती जीवनशैली, आधुनिक बांधकामांची वाढती पसंती आणि संयुक्त कुटुंब पद्धतीचा होत चाललेला ऱ्हास यामुळे ही समृद्ध वास्तू संस्कृती आता इतिहासजमा होण्याच्या मार्गावर आहे.

पूर्वी ग्रामीण भागात वाड्यांचे बांधकाम अत्यंत मजबूत आणि नियोजनबद्ध पद्धतीने केले जात असे. डोंगराळ भागातून मोठमोठे दगड बैलगाड्यांद्वारे आणले जात. विहिरी खोदताना निघालेल्या पाषाणांचाही बांधकामासाठी उपयोग केला जाई. कुशल कारागिरांच्या मेहनतीतून उभे राहिलेले हे वाडे अनेक पिढ्यांचा भार सहजपणे पेलत असत. चुन्याचे मजबूत बांधकाम, भक्कम चिरे, नक्षीदार लाकडी खांब आणि विशाल अंगणे ही त्यांची खास वैशिष्ट्ये होती.

वाड्यांची रचना ग्रामीण जीवनशैलीशी सुसंगत होती. मध्यभागी प्रशस्त चौसोपी अंगण, पुढे ओटा किंवा सदर, मागील बाजूस धान्याचे कोठार, स्वतंत्र देवघर आणि महिलांसाठी वेगळी व्यवस्था असे. मजबूत मुख्य दरवाजे, आगळ आणि जाड कवाडांमुळे सुरक्षिततेची विशेष काळजी घेतली जात असे. वाड्यांवर तयार केलेले माळवद पावसाळ्यातही टिकाऊ राहत असे. उन्हाळा असो किंवा सणासुदीचा काळ, पाहुण्यांच्या येण्या–जाण्याने हे वाडे कायम गजबजलेले असत.

त्या काळात वाडा म्हणजे जिव्हाळ्याचा केंद्रबिंदू होता. दिवाळीच्या दिवसांत सडा–रांगोळीने सजलेले अंगण, ओट्यावर रंगणाऱ्या गप्पा, एकत्र कुटुंबातील हास्य–विनोद आणि नात्यांची ऊब या सर्व गोष्टी वाडा संस्कृतीतून अनुभवायला मिळत होत्या. गावातील सामाजिक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक उपक्रमांचे केंद्र म्हणूनही वाड्यांना महत्त्वाचे स्थान होते.

मात्र काळाच्या ओघात ग्रामीण भागाचे स्वरूप झपाट्याने बदलू लागले. आज विटा, सिमेंट आणि स्लॅबच्या आधुनिक घरांना अधिक पसंती मिळत आहे. परिणामी अनेक जुने वाडे पाडले जात असून त्यांच्या जागी आधुनिक इमारती उभ्या राहत आहेत. काही ठिकाणी वाडे पडझड झालेल्या अवस्थेत दुर्लक्षित दिसतात. दुरुस्ती करण्याऐवजी त्यातील सागवानी लाकूड विकण्याकडेही कल वाढताना दिसतो.

धनगरवाडा, पाटीलवाडा, कुंभारवाडा अशा नावांनी ओळखली जाणारी वाडा संस्कृती आता फक्त आठवणीत उरली आहे. 'मामाचा वाडा चिरेबंदी'सारखी बालगीतेही नव्या पिढीसाठी अनोळखी होत चालली आहेत. ग्रामीण संस्कृतीचे वैभव जपणारे हे वाडे केवळ वास्तू नसून आपल्या इतिहासाचा आणि सामाजिक परंपरेचा अमूल्य ठेवा आहेत. त्यामुळे या वाड्यांचे जतन आणि संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे.

(सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र शासन.)

'वेगळ्या वाटा' या सदरातून शासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या पाल्यांनी पारंपरिक करिअरच्या चौकटीबाहेर जाऊन विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा परिचय करून दिला जातो. सेजल इरमुलवार या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (डीजीआयपीआर) येथे कॅमेरामन म्हणून कार्यरत असलेले प्रमोद इरमुलवार यांच्या कन्या असून, सध्या जर्मनीतील ड्युईसबुर्ग-एसेन विद्यापीठात संगणकीय यांत्रिकी (Computational Mechanics) विषयातील एम.एस्सी. पदवीसाठी उच्च शिक्षण व संशोधन करत आहेत.

गगनभरारी

सेजल प्रमोद इरमुलवार

१. सर्वप्रथम आपल्या शैक्षणिक प्रवासाविषयी आणि स्वत:विषयी थोडक्यात सांगा.

उत्तर : माझे नाव सेजल आहे. मी एरोनॉटिकल इंजिनीअरिंगचे शिक्षण पूर्ण केले आहे. लहानपणापासूनच विमाने, त्यांची रचना, कार्यपद्धती आणि आधुनिक तंत्रज्ञान याविषयी मला विशेष आकर्षण होते. शालेय जीवनात असतानाच एअरक्राफ्टविषयीची उत्सुकता वाढत गेली आणि त्यातूनच या क्षेत्रात करिअर करण्याचा निर्धार केला. दहावीनंतर मी अकरावी-बारावीमध्ये विज्ञान शाखेची निवड केली. त्यानंतर नागपूर येथील अभियांत्रिकी महाविद्यालयातून एरोनॉटिकल इंजिनीअरिंगची पदवी पूर्ण केली. शिक्षणादरम्यान विमान अभियांत्रिकीशी संबंधित विविध तांत्रिक बाबींचा अभ्यास करण्याबरोबरच प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिकांचा अनुभवही मिळाला.

पदवी पूर्ण केल्यानंतर मला हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (HAL) येथे एक वर्ष काम करण्याची संधी मिळाली. या अनुभवामुळे विमाननिर्मिती क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, उद्योगातील कार्यपद्धती आणि व्यावसायिक जबाबदाऱ्या जवळून समजून घेता आल्या.

सध्या माझे पुढील ध्येय जर्मनीमध्ये पदव्युत्तर (मास्टर्स) शिक्षण घेण्याचे आहे. त्यासाठी येत्या विंटर सेशनमध्ये प्रवेश घेण्याची तयारी सुरू आहे. जागतिक दर्जाचे शिक्षण आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करून भविष्यात एरोनॉटिकल क्षेत्रात प्रभावी योगदान देण्याची माझी इच्छा आहे.

२. एरोनॉटिकल इंजिनीअरिंग हेच क्षेत्र निवडण्यामागील प्रेरणा काय होती?

उत्तर : लहानपणापासूनच विमाने, त्यांची उड्डाण प्रक्रिया, रचना आणि त्यामागील विज्ञान याबद्दल मला विशेष आकर्षण होते. विमान कसे उडते, त्याची निर्मिती कशी केली जाते आणि त्यामध्ये कोणते तांत्रिक घटक कार्यरत असतात, याविषयी जाणून घेण्याची उत्सुकता कायम होती.

पुढे शिक्षण घेत असताना या क्षेत्रासाठी स्वतंत्र एरोनॉटिकल इंजिनीअरिंग हा अभ्यासक्रम उपलब्ध असल्याचे समजले. त्यानंतर या विषयाचा अधिक अभ्यास केला आणि याच क्षेत्रात करिअर घडविण्याचा निर्णय घेतला. या अभ्यासक्रमाद्वारे विमान अभियांत्रिकी, आधुनिक तंत्रज्ञान आणि संशोधन यांचा सखोल अभ्यास करण्याची संधी मिळणार होती. त्याचबरोबर या क्षेत्रात चांगल्या करिअरच्या आणि जागतिक स्तरावर काम करण्याच्या संधीही उपलब्ध असल्यामुळे माझा निर्णय अधिक दृढ झाला.

माझ्या आवडीचे क्षेत्र, तांत्रिक ज्ञान मिळविण्याची संधी आणि भविष्यात या क्षेत्रात योगदान देण्याची इच्छा या तिन्ही गोष्टींमुळे मी एरोनॉटिकल इंजिनीअरिंगची निवड केली.

३. लहानपणापासूनच विमान आणि अवकाश क्षेत्राविषयी आकर्षण होते का?

उत्तर : होय, लहानपणापासूनच मला विमान आणि अवकाश क्षेत्राविषयी विशेष आकर्षण होते. आकाशात उडणारी विमाने पाहताना ती कशी उडतात, त्यांची रचना कशी असते, याविषयी नेहमीच उत्सुकता वाटायची. तसेच दूरदर्शनवर रॉकेट प्रक्षेपण, उपग्रह मोहिमा आणि अवकाश संशोधनाशी संबंधित कार्यक्रम आवर्जून पाहायचे. या गोष्टींमुळे या क्षेत्राविषयीची आवड अधिकच वाढत गेली. याच आवडीतून मी पुढे एरोनॉटिकल इंजिनीअरिंगची पदवी पूर्ण केली. आता या विषयाचा अधिक सखोल अभ्यास करण्यासाठी जर्मनीमध्ये पदव्युत्तर (मास्टर्स) शिक्षण घेण्याची तयारी करत आहे. आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि नव्या संकल्पनांचा अभ्यास करून भविष्यात एरोनॉटिकल आणि अवकाश क्षेत्रातील संशोधनात योगदान देण्याची माझी इच्छा आहे.

४. या अभ्यासक्रमातील सर्वांत आव्हानात्मक बाब कोणती वाटते?

उत्तर : एरोनॉटिकल इंजिनीअरिंग हा अभ्यासक्रम अत्यंत तांत्रिक आणि सखोल स्वरूपाचा असल्याने सुरुवातीला काही विषय समजून घेणे आव्हानात्मक वाटले. विशेषतः एरोडायनॅमिक्स, फ्लाइट मेकॅनिक्स, विमानाची संरचना आणि प्रणोदन (Propulsion) यांसारख्या विषयांमध्ये सैद्धांतिक ज्ञानाबरोबरच तांत्रिक संकल्पना समजून घेण्यासाठी सातत्याने अभ्यास करावा लागला. मात्र, या संकल्पनांचा प्रत्यक्ष प्रकल्पांमध्ये (Projects) आणि प्रयोगशाळेतील उपक्रमांमध्ये उपयोग करण्याची संधी मिळाल्यानंतर विषय अधिक स्पष्टपणे समजू लागले. सैद्धांतिक ज्ञानाचे प्रत्यक्ष कामाशी असलेले नाते लक्षात आल्यानंतर अभ्यास अधिक रंजक आणि सोपा वाटू लागला. या संपूर्ण प्रक्रियेमुळे कठीण वाटणारे विषय आत्मविश्वासाने हाताळण्याची क्षमता विकसित झाली. तसेच तांत्रिक विचारसरणी, समस्या सोडविण्याची कौशल्ये आणि प्रत्यक्ष कामातून शिकण्याची सवय या गुणांचा विकास झाला, जे या क्षेत्रातील यशासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत.

५. भारतातील विमानवाहतूक आणि संरक्षण क्षेत्राच्या वाढत्या संधींकडे आपण कसे पाहता?

उत्तर : भारतामध्ये गेल्या काही वर्षांत विमानवाहतूक क्षेत्राचा वेगाने विस्तार होत आहे. हवाई प्रवासाला प्राधान्य देणाऱ्या प्रवाशांची संख्या सातत्याने वाढत असल्यामुळे देशभरात नवीन विमानतळांची उभारणी होत आहे. त्याचबरोबर विमान कंपन्याही आपल्या ताफ्यात (Fleet) नवीन विमानांचा समावेश करत आहेत. या वाढीचा सकारात्मक परिणाम विमानांच्या देखभाल, दुरुस्ती आणि ओव्हरहॉल (Maintenance, Repair and Overhaul - MRO) सेवांच्या मागणीवर होत असून, या क्षेत्रात रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होत आहेत.

दुसरीकडे, केंद्र शासनाच्या 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या उपक्रमांमुळे संरक्षण आणि एरोस्पेस क्षेत्रात स्वदेशी उत्पादनाला विशेष प्रोत्साहन दिले जात आहे. विमानांचे सुटे भाग, संरक्षण उपकरणे आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान भारतात विकसित व निर्मित करण्यावर भर दिला जात आहे. यामुळे संशोधन, उत्पादन, डिझाइन, चाचणी आणि तांत्रिक विकास अशा विविध क्षेत्रांमध्ये अभियंत्यांसाठी नवीन संधी उपलब्ध होत आहेत. माझ्या मते, भारत आता केवळ विमानसेवा पुरविणारा देश राहिलेला नाही, तर एरोस्पेस आणि संरक्षण तंत्रज्ञानाच्या विकासामध्येही महत्त्वाची भूमिका बजावू लागला आहे. भविष्यात या क्षेत्रात संशोधन, नवकल्पना आणि स्वदेशी तंत्रज्ञानाच्या विकासाला अधिक चालना मिळेल. त्यामुळे एरोनॉटिकल अभियंत्यांसाठी देशात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही उज्ज्वल करिअरच्या संधी निर्माण होतील, असा मला विश्वास आहे

६. एरोनॉटिकल इंजिनीअरिंग आणि एरोस्पेस इंजिनीअरिंग यामध्ये काय फरक आहे?

उत्तर : एरोनॉटिकल इंजिनीअरिंग आणि एरोस्पेस इंजिनीअरिंग हे दोन्ही अभ्यासक्रम परस्परांशी संबंधित असले, तरी त्यांच्या कार्यक्षेत्रात काही महत्त्वाचे फरक आहेत. एरोनॉटिकल इंजिनीअरिंगमध्ये मुख्यतः पृथ्वीच्या वातावरणात उड्डाण करणाऱ्या विमानांचा अभ्यास केला जातो. या अभ्यासक्रमात विमानांची रचना (Aircraft Structures), इंजिन, एरोडायनॅमिक्स, फ्लाइट मेकॅनिक्स, नियंत्रण प्रणाली, देखभाल आणि विमानांच्या कार्यक्षमतेशी संबंधित तांत्रिक बाबी शिकवल्या जातात.

तर एरोस्पेस इंजिनीअरिंग हे अधिक व्यापक क्षेत्र आहे. यामध्ये एरोनॉटिकल इंजिनीअरिंगचा समावेश असतोच; परंतु त्याचबरोबर पृथ्वीच्या वातावरणाबाहेर कार्य करणाऱ्या रॉकेट्स, उपग्रह, अंतराळयान (Spacecraft), क्षेपणास्त्रे आणि अवकाश तंत्रज्ञानाचाही सखोल अभ्यास केला जातो. त्यामुळे एरोस्पेस इंजिनीअरिंगमध्ये विमान तंत्रज्ञानासोबतच अंतराळ विज्ञान आणि अवकाश अभियांत्रिकीवरही विशेष भर दिला जातो.

थोडक्यात सांगायचे झाल्यास, एरोनॉटिकल इंजिनीअरिंग हे विमानांपुरते मर्यादित क्षेत्र आहे, तर एरोस्पेस इंजिनीअरिंगमध्ये विमानांसह अवकाश तंत्रज्ञानाचाही समावेश होतो. त्यामुळे एरोस्पेस इंजिनीअरिंग ही अधिक व्यापक शाखा मानली जाते.

७. भविष्यात भारताला जागतिक विमाननिर्मिती आणि अवकाश संशोधन क्षेत्रात कोणत्या संधी दिसतात?

उत्तर : माझ्या मते, भारतासाठी विमाननिर्मिती आणि अवकाश संशोधन क्षेत्रात भविष्यात मोठ्या संधी उपलब्ध आहेत. गेल्या काही वर्षांत भारताने या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली असून, स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करण्यावर विशेष भर दिला जात आहे. यामुळे देशाची तांत्रिक क्षमता सातत्याने वाढत आहे. विमाननिर्मिती क्षेत्रात सार्वजनिक उपक्रमांसोबतच खासगी उद्योगांचाही सहभाग वाढत आहे. भारतातच विमानांचे सुटे भाग, महत्त्वाचे घटक आणि काही विमानांचे भाग एकत्रीकरण करण्याची क्षमता विकसित होत आहे. यामुळे देशातील उत्पादनक्षमता वाढण्याबरोबरच भारतीय उद्योगांना जागतिक पुरवठा साखळीत (Global Supply Chain) महत्त्वाचे स्थान मिळत आहे. अवकाश क्षेत्रातही भारताने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (ISRO) विविध मोहिमांमुळे; तसेच गगनयानसारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमुळे देशाची ओळख जागतिक स्तरावर अधिक मजबूत होत आहे. त्याचबरोबर अवकाश क्षेत्रात खासगी स्टार्टअप्सची संख्याही वेगाने वाढत असून, उपग्रह निर्मिती, प्रक्षेपण सेवा, अंतराळ तंत्रज्ञान आणि संशोधन यांसारख्या क्षेत्रांत नवनवीन संधी निर्माण होत आहेत. माझ्या मते, शासनाच्या प्रोत्साहनपर धोरणांमुळे, वाढत्या संशोधनामुळे आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे भारत भविष्यात जागतिक विमाननिर्मिती आणि अवकाश तंत्रज्ञान क्षेत्रातील एक महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास येऊ शकतो. यामुळे तरुण अभियंत्यांसाठी संशोधन, नवकल्पना आणि रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील.

८. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना आपला संदेश काय असेल?

उत्तर : विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना माझा एकच संदेश आहे की, सुरुवातीपासूनच सर्व काही परिपूर्ण असणे आवश्यक नसते. कोणत्याही क्षेत्रात यश मिळविण्यासाठी संयम, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि शिकण्याची तयारी या गोष्टी सर्वाधिक महत्त्वाच्या असतात. विज्ञान हे प्रयोग आणि अनुभवांवर आधारित क्षेत्र आहे. प्रत्येक प्रयोग पहिल्याच प्रयत्नात यशस्वी होईलच असे नाही. अनेक वेळा रॉकेट प्रक्षेपणांमध्ये अडचणी येतात, संगणक प्रोग्राममध्ये चुका होतात, संशोधनात अपेक्षित परिणाम मिळत नाहीत. मात्र, या प्रत्येक अनुभवातून काहीतरी नवीन शिकायला मिळते. अपयश हा शेवट नसून, अधिक चांगले यश मिळविण्याचा तो एक टप्पा असतो. विद्यार्थ्यांनी गणित, विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयांचा भक्कम पाया तयार करण्याबरोबरच प्रश्न विचारण्याची सवय, नवीन गोष्टी जाणून घेण्याची जिज्ञासा आणि प्रत्यक्ष प्रयोग करण्याची वृत्ती जोपासली पाहिजे. आज डिजिटल माध्यमांमुळे आणि विविध शैक्षणिक साधनांमुळे ज्ञान मिळविण्याच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. त्यांचा योग्य उपयोग करून स्वतःचे कौशल्य सातत्याने विकसित करणे आवश्यक आहे.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्वतःवर विश्वास ठेवणे, मेहनतीची तयारी ठेवणे आणि मोठी स्वप्ने पाहण्याचे धाडस ठेवणे. परिस्थिती कितीही आव्हानात्मक असली तरी चिकाटी, सकारात्मक दृष्टिकोन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या बळावर कोणताही विद्यार्थी विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात यशस्वी करिअर घडवू शकतो. माझ्या मते, भारताच्या प्रगतीसाठी आणि विकसित राष्ट्राच्या निर्मितीसाठी विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात कार्य करणाऱ्या नव्या पिढीची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या क्षमतेवर विश्वास ठेवून ज्ञान, संशोधन आणि नवकल्पनांच्या माध्यमातून देशाच्या विकासात योगदान देण्याचा प्रयत्न करावा.

शब्दांकन : अश्विनी पुजारी, सहायक संचालक, महाराष्ट्र शासन.

कॉम्प्युटर व्हिजन : जेव्हा यंत्रांना 'दृष्टी' मिळते!

प्रशांत वामन

मानवी उत्क्रांतीमध्ये 'दृष्टी' या इंद्रियाचे स्थान अनन्यसाधारण आहे. आपण आपल्या सभोवतालच्या जगाची बहुतांश माहिती डोळ्यांच्या माध्यमातून मिळवतो आणि मेंदू त्या माहितीवर काही मिलिसेकंदात प्रक्रिया करून निर्णय घेतो. रस्ता ओलांडताना वेगाने येणारी गाडी पाहणे असो किंवा हजारो लोकांच्या गर्दीत आपल्या मित्राचा चेहरा ओळखणे असो – मानवी मेंदू हे काम अत्यंत सहजतेने करतो; पण एका संगणकासाठी, ज्याला केवळ '०' आणि '१' हे आकडे समजतात, एखादा फोटो पाहणे म्हणजे काय? संगणकासाठी फोटो म्हणजे केवळ रंगांच्या छटा दर्शवणाऱ्या आकड्यांचा एक अवाढव्य तक्ता (Matrix) असतो. या आकड्यांमधून अर्थपूर्ण माहिती काढण्याच्या शास्त्रालाच 'कॉम्प्युटर व्हिजन' (Computer Vision) म्हणतात.

या पाचव्या भागात आपण यंत्रांना 'दिसते' कसे आणि ही कृत्रिम दृष्टी आधुनिक जगाचा चेहरा-मोहरा कशी बदलत आहे, हे सविस्तरपणे जाणून घेऊ या.

१. कॉम्प्युटर व्हिजन म्हणजे काय?

कॉम्प्युटर व्हिजन हे कृत्रिम बुद्धिमत्तेचे (AI) असे क्षेत्र आहे जे संगणकाला डिजिटल प्रतिमा (Images) आणि व्हिडिओंमधून उच्च-स्तरीय समज प्राप्त करून देण्यास सक्षम करते. सोप्या भाषेत, जे काम मानवी डोळे आणि मेंदू करतात, तेच काम कॅमेरा, सेन्सर्स आणि अल्गोरिदमच्या मदतीने करणे म्हणजे कॉम्प्युटर व्हिजन.

जेव्हा एखादा कॅमेरा फोटो काढतो, तेव्हा संगणक तो फोटो पिक्सेल्स (Pixels) मध्ये विभागतो. प्रत्येक पिक्सेलचा एक विशिष्ट रंग आणि तीव्रता असते. कॉम्प्युटर व्हिजनचे मुख्य उद्दिष्ट या पिक्सेल्समधील 'पॅटर्न' ओळखणे हे असते. उदाहरणार्थ उभ्या आणि आडव्या रेषा एकत्र आल्या की, तो खिडकीचा आकार असू शकतो, किंवा विशिष्ट वक्र रेषा मानवी चेहरा दर्शवू शकतात.

२. ऐतिहासिक प्रवास: 'समर व्हिजन प्रोजेक्ट' ते 'डीप लर्निंग'

१९६६ मध्ये एमआयटी (MIT) मधील प्राध्यापक सीमूर पॅपर्ट यांनी त्यांच्या एका विद्यार्थ्याला उन्हाळ्याच्या सुट्टीत एक प्रकल्प दिला होता: संगणकाला एक कॅमेरा जोडा आणि त्याला सांगा की, त्याने जे पाहिले त्याचे वर्णन करावे. त्यांना वाटले होते की, हे काम एका सुट्टीत संपेल; पण या 'दृष्टी'च्या कोडला उकलायला शास्त्रज्ञांना पुढची ५० वर्षे लागली.

सुरुवातीच्या काळात, शास्त्रज्ञांनी संगणकाला वस्तूंच्या कडा (Edges) ओळखण्याचे कठीण नियम दिले; पण खरी क्रांती झाली 'कन्व्होल्युशनल न्यूरल नेटवर्क्स' (CNN) मुळे. २०१२ मध्ये



'ImageNet' नावाच्या जागतिक स्पर्धेत जेव्हा एका डीप लर्निंग मॉडेलने मानवापेक्षाही अचूकपणे लाखो वस्तू ओळखल्या, तेव्हा कॉम्प्युटर व्हिजनच्या आधुनिक युगाचा पाया रचला गेला.

३. यंत्रे फोटो नक्की कशी 'वाचतात'? (तांत्रिक प्रक्रिया)

एखादा फोटो पाहून तो कशाचा आहे हे ठरवण्यामागे एक जटिल तांत्रिक प्रक्रिया असते:

- **इमेज ॲक्विझिशन (Image Acquisition)** : कॅमेरा किंवा सेन्सरद्वारे प्रकाश लहरींचे रूपांतर डिजिटल सिग्नलमध्ये केले जाते.

- **प्री-प्रोसेसिंग (Pre-processing) :** फोटोमधील अनावश्यक गोंधळ (Noise) काढला जातो आणि ब्राइटनेस सुधारला जातो जेणेकरून अल्गोरिदमला काम करणे सोपे जाईल.
- **फिचर एक्स्ट्रॅक्शन (Feature Extraction) :** येथे CNN तंत्रज्ञान वापरले जाते. हे तंत्रज्ञान फोटोला छोट्या-छोट्या भागांत फिल्टर करते. पहिल्या थरात रेषा आणि कोपरे ओळखले जातात, तर पुढच्या थरांमध्ये नाक, डोळे किंवा चाकांसारखे जटिल आकार ओळखले जातात.
- **निर्णय (Classification/Detection) :** शेवटी सर्व वैशिष्ट्यांची सांगड घालून AI निर्णय घेते की, समोर दिसणारी वस्तू नेमकी काय आहे.

४. कॉम्प्युटर व्हिजनचे विविध प्रकार

हे तंत्रज्ञान केवळ 'काय आहे' एवढेच सांगत नाही, तर त्याचे अनेक पैलू आहेत:

- **इमेज क्लासिफिकेशन :** फोटोमध्ये मुख्य वस्तू कोणती आहे हे ओळखणे (उदा. हा कुत्रा आहे).
- **ऑब्जेक्ट डिटेक्शन :** फोटोमध्ये एकापेक्षा जास्त वस्तू असल्यास त्या कुठे आहेत, हे शोधणे आणि त्यांच्याभोवती चौकट (Bounding Box) तयार करणे.
- **इमेज सेगमेंटेशन :** फोटोमधील प्रत्येक पिक्सेल कोणत्या वस्तूचा आहे, हे अचूकपणे वेगळे करणे (उदा. डॉक्टरांना ट्युमरचा नेमका आकार समजण्यासाठी हे आवश्यक असते).
- **फेस रेकग्निशन (Face Recognition) :** चेहऱ्यावरील ८० हून अधिक वैशिष्ट्यपूर्ण बिंदूंच्या आधारे व्यक्तीची ओळख पटवणे.

५. दैनंदिन जीवनातील आणि उद्योगातील क्रांतिकारी वापर

कॉम्प्युटर व्हिजनचा प्रभाव आज आपल्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रावर पडत आहे:-

अ) आरोग्यसेवा (Healthcare) : वैद्यकीय क्षेत्रात कॉम्प्युटर व्हिजन एखाद्या देवदूताप्रमाणे काम करत आहे. क्ष-किरण (X-rays), एमआरआय (MRI) आणि सीटी स्कॅनचे विश्लेषण करण्यासाठी हे तंत्रज्ञान वापरले जाते. मानवी डोळ्यांना सुटणारे अत्यंत सूक्ष्म बदल किंवा कॅन्सरच्या गाठींची सुरुवातीची लक्षणे AI मॉडेल्स अचूकपणे शोधू शकतात. यामुळे वेळेत उपचार मिळणे शक्य झाले आहे.

ब) स्वयंचलित वाहने (Self-driving Cars) : टेस्ला किंवा वेमोच्या गाड्यांकडे डोळे म्हणून अनेक हाय-डेफिनिशन कॅमेरे असतात. कॉम्प्युटर व्हिजनमुळे गाडीला समजते की, समोरून येणारा पादचारी आहे, सायकलस्वार आहे की दुसरी गाडी. ट्रॅफिक सिग्नलचा रंग बदलणे किंवा रस्त्यावरील खड्डे ओळखणे, हे सर्व या 'कृत्रिम दृष्टी'मुळेच शक्य होते.

क) सुरक्षा आणि देखरेख (Security Surveillance) : विमानतळांवरील सुरक्षा तपासणी असो किंवा हरवलेल्या मुलांचा शोध घेणे, 'फेस रेकग्निशन' हे तंत्रज्ञान अत्यंत प्रभावी ठरत आहे. सीसीटीव्ही फुटेजमधून संशयास्पद हालचालींची नोंद करून गुन्हेगारांना पकडणे आता सोपे झाले आहे.

ड) आधुनिक शेती (Smart Farming) : ड्रोनच्या मदतीने शेताचे हवाई फोटो घेतले जातात. कॉम्प्युटर व्हिजनच्या मदतीने कोणत्या पिकाला पाणी हवे आहे, कुठे कीड लागली आहे किंवा खताची गरज कुठे आहे, हे शेतकऱ्याला घरी बसून समजू शकते.

इ) रिटेल आणि शॉपिंग : 'Amazon Go' सारख्या दुकानांमध्ये कॅशिअर नसतो. तुम्ही फक्त वस्तू उचलता आणि बाहेर पडता. तुम्ही कोणती वस्तू उचलली, हे छतावरील कॅमेरे कॉम्प्युटर व्हिजनच्या मदतीने ओळखतात आणि तुमच्या खात्यातून पैसे वजा होतात.

६. आव्हाने आणि मर्यादा

इतके प्रगत असूनही कॉम्प्युटर व्हिजनसमोर काही आव्हाने उभी आहेत:

- **प्रकाशाची कमतरता :** अंधारात किंवा खूप जास्त उजेडात यंत्रे गोंधळू शकतात.
- **कोन (Angle) :** एखादी वस्तू वेगळ्या कोनातून पाहिल्यास मशीनला ती ओळखणे कठीण जाते.
- **संदर्भ (Context) :** मानवाला चित्राचा संदर्भ कळतो. उदाहरणार्थ, आरशात दिसणारे प्रतिबिंब आणि समोर उभा असलेला माणूस यातील फरक समजणे AI साठी अजूनही आव्हानात्मक आहे.
- **प्रायव्हसी :** चेहऱ्यावरून ओळख पटवण्याचे तंत्रज्ञान वैयक्तिक गोपनीयतेच्या (Privacy) दृष्टीने वादात सापडले आहे.

७. भविष्य : मानवी डोळ्यांच्याही पलीकडे!

भविष्यात कॉम्प्युटर व्हिजन मानवी डोळ्यांच्या मर्यादा ओलांडेल. यंत्रे अशा लहरी (उदा. इन्फ्रारेड) पाहू शकतील ज्या मानवाला दिसत नाहीत. 'ऑगमेंटेड रिॲलिटी' (AR) चष्म्यांच्या मदतीने आपण जगाकडे पाहतानाच त्या वस्तूंबद्दलची सर्व माहिती आपल्या डोळ्यांसमोर पाहू शकू.

निष्कर्ष

कॉम्प्युटर व्हिजनने यंत्रांना आंधळेपणातून मुक्त केले आहे. यामुळे यंत्रे केवळ माहितीवर प्रक्रिया करत नाहीत, तर ती आपल्या जगाचे वास्तव दर्शन घेऊ शकतात. दृष्टी, मेंदू आणि भाषा जेव्हा एकत्र येतात, तेव्हा खऱ्या अर्थाने एक 'बुद्धिवान' यंत्र तयार होते.

यंत्रांना आता पाहता येते, बोलता येते आणि विचार करता येतो; पण जेव्हा याच बुद्धिमत्तेला एक भौतिक शरीर मिळते, तेव्हा काय होते?

पुढचा भाग ६ : रोबोटिक्स आणि एआय (Robotics and AI) मध्ये आपण पाहणार आहोत की, बुद्धिमत्ता आणि यांत्रिक शरीर एकत्र आल्यावर जग कसे बदलते.

(कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन. मोबाइल क्र: ८९८३३४४३६७)

मुक्त वाचनालय

महेश रामलिंग गरड

वर्तमानपत्र ते स्वत:चं पुस्तकालय आणि नंतर समाजासाठी मुक्त वाचनालय. हा माझा प्रवास तसा खडतरच म्हणावा लागेल. तसं पाहिलं तर कोणताच प्रवास सोपा नसतो. माझ्या या प्रवासाची खरी सुरुवात बारावीच्या परीक्षेनंतरच झाली म्हणायचं.

एवढा मोठा घोडा झाला, सुट्टीत काही तरी कामधंदा करायला पाहिजे, उन्हातान्हाचं नुसतं बोंबलत फिरत्यात, दोन पैशे मिळवायला पाहिजे, नुसती कुत्री मारत फिरत्यात, असे नाना टोमणे सुटीच्या काळात प्रत्येकाच्या गावी, प्रत्येकाच्या घराघरात असतात; पण माझ्या घरात तसा काही प्रकार दिसून आला नाही.

कमवा आणि शिका आचरणात आणण्याचा प्रकार फक्त रात्री झोपण्यापुरताच मनात यायचा; पण सकाळ झाली की, गल्लीतील पोरांच्या गोंधाळात तो विचार विसरून जायचा; पण काय माहीत, एके दिवशी सकाळी या विचारानं उचल खाल्ली. खेळायला जायच्या आधी ठरवून टाकलं. बसं झालं आता. काही तरी कामधंदा करायला पाहिजे. मित्रांनी सल्ला दिला. वर्तमान पत्र वाटणे आणि विकणे, म्हणजे आपण दिवसभर बोंबलत फिरायला मोकळे. फक्त दोनच तास काम करायचं, बघ तुला जमेल आणि सायकल मात्र स्वत:ची पाहिजे. आप्पांच्या कानावर ही गोष्ट टाकली; पण त्यांनी ऐकून न ऐकल्यासारखं केला. त्यांना वाटलं पोरगं बिघडलं.

साधारणत: १९८४–८५ चा मे महिन्याचा काळ असेल. एके दिवशी पहाटे उठून सायकला टांग मारून ६ वाजता बार्शी एस.टी. स्टँड गाठलं. मालकाने पहिल्या भेटीतच दम भरला, मह्या, दांडी मारायची नाही. तरच पेपरला हात लाव. मी भीतभीत, हो म्हटलं आणि त्याच दिवशी १०३ जणांची पत्त्यासह यादी घेऊन कामाला सुरुवात केली. मालक सर्व मुलांना लाइनमध्ये उभा करून ठरवून दिलेल्या लाइनप्रमाणे पेपर द्यायचा. एखादा पेपर यायला उशीर झाल्यास तो पेपर येईपर्यंत वाट बघण्याशिवाय पर्याय नव्हता. तेवढ्या वेळेत पेपरच्या हेडलाइन वाचून काढायचो. तिथूनच पेपर वाचायची सवय लागली. सकाळी ६.३० वाजता सायकलच्या कॅरेजला पेपर लावून निघायचो. मला चांगले आठवते, माझ्याकडे दोन लाईन होत्या आणि मालक १२० पेपर द्यायचा. त्यामध्ये संचार, तरुण भारत, लोकमत आणि सकाळ असे वेगवेगळे पेपर असायचे. १०३ पेपर वाटून उरलेले १७ पेपर कोणत्याही परिस्थितीत आरोळी मारून विकायचो. दर महिन्याचा पगार ९०/– रुपये आणि एक महिना १७ पेपर विकून झाले की, त्याचे १० रुपये मिळायचे. म्हणजे मला दर महिन्याला १००/– रुपये पगार मिळायचा. तो पगार घेतानासुद्धा आनंदाने उर भरून यायचा. पेपर वाचताना काही वाचकांना दिवाळी अंक, पोलीस टाईम्स, दक्षता यांचे अंक द्यावे लागत असे. तेही वाचायची सवय लागली. माझ्याकडे असलेल्या पेपर लाईनमधील वाचकांचे वाचून झालेले दिवाळी अंक त्यांच्याकडून मागून घ्यायचो आणि वाचून त्यांना परत करायचो. तो आनंद वेगळाच होता. सकाळी ८.०० वाजता पेपर वाटून झाले की, ८.३० वाजता कॉलेजला जायचो. असा हा दिनक्रम जवळ–जवळ २ वर्ष ३ महिने होता. त्या कालावधीत दिवाळी अंक, पोलीस टाईम्स, दक्षता आणि रोजचे पेपर वाचायची सवय लागली होती.

खरंतर माझ्या या वाचनवाढीला माझा मामा कारणीभूत ठरला. मामा आठवी पास; परंतु बाबा कदम, देवदत्त पाटील, व. बा. बोधे या लेखकांच्या ग्रामीण कांदबऱ्याचा हौशी वाचक. त्यांची कांदबरी वाचून झाली की, मामा मला दोन दिवसांच्या मुदतीवर वाचायला द्यायचा. दोन दिवसात परत नाही दिली की, मामा लगेच ती कादंबरी घेऊन जायचा. त्यामुळे कॉलेजचा अभ्यास न करता कांदबरी वाचून काढायचो. नक्की आठवत नाही; पण मला वाटतं, माझी पहिली कांदबरी बाबा कदमांची. ती म्हणजे 'भालू' आणि तिथूनच ग्रामीण कांदबऱ्या वाचण्याची सवय लागून गेली.

एस.वाय.बी.कॉमला असताना ४ विषयांत नापास झालो. नापास झाल्याच मला दु:ख झाले नाही; पण हसू मात्र येत होतं. माझे हसू पाहून आई म्हणाली, नापास होऊनसुद्धा दात काढतोस, लाज पण वाटत नाही.

बरं, लाज वाटून काय उपयोग, दोष तर माझाच होता ना! आई–वडील म्हणायचे एवढा अभ्यास करतो, मग नापास कसा झाला. नापास व्हायचं कारण म्हणजे परीक्षेच्या पुस्तकात माझी आवडती कादंबरी पहुडलेली असायची आणि मी तिच्यात रममाण झालेलो असायचो. परीक्षेच्या काळात कांदबरी वाचताना मनात नापासाची तिळमात्र भीती नव्हती. कारण निकाल दोन महिन्यांनी असायचा. दोन महिने म्हणजे माझ्यासाठी मोठा कालावधी असायचा. भीती वाटायची ती निकालाच्या दिवशी आणि तेही मात्र घरी कळेपर्यंत.

एकदा नापास झालो म्हणून समजलं की, मग मात्र भीती वाटली नाही. पुन्हा कादंबऱ्या वाचायला मोकळं; पण नंतर नापासाची थोडी लाज वाटली. परीक्षेच्या काळात पास होण्यापुरता अभ्यास करत होतो; पण वाचन काही थांबत नव्हतं.

त्याकाळी आमच्या गल्लीत एक वयस्कर व्यक्ती कापडी पिशवीत जुनी पुस्तके घेऊन घरोघरी वाचायला द्यायचे. त्याचा मोबदला असायचा दिवसाला १५ पैसे किंवा २० पैसे. त्यांच्याकडून माझी आई आणि मी पुस्तके घेऊन वाचायचो. वाचनाचा वारसा आईकडून माझ्याकडे आला असावा. इतर भावांना वाचनाची आवड नव्हती.

आजही तीच वाचनाची आवड माझ्या मनात तग धरून आहे. मंत्रालयात आल्यावर मी जिमखाना सदस्य झालो आणि तिथेही वाचन सुरू झाले. राजेंद्र महाजन (निवृत्त कक्ष अधिकारी), विलास राजूरकर (निवृत्त अवर सचिव), सुनील धोंडे (अवर सचिव), सरोज देशपांडे (अवर सचिव, मुख्यमंत्री सचिवालय), अनिल तांबे (निवृत्त कक्ष अधिकारी) आमचा हा ग्रुप वाचनाचा भुकेला होता. आमच्या ग्रुपचा वाचनावरही बराच काथ्याकूट व्हायचा.

सन २०१४ पासून स्वतःच्या घरात राहायला आलो. घरात देवासाठी देव्हारा असतो, तसा पुस्तकांसाठी एक कोपरा असावा, ही कल्पना मनात आली आणि हॉलच्या कोपऱ्यात चार उभ्या आणि दोन आडव्या फळ्या मारून एक कपाट करून घेतले. त्यात १० पुस्तके ठेवली. त्या १० पुस्तकांमध्येसुद्धा मोठ्या वाचनालयाचा मालक असल्याचा रुबाब वाटत होता. घरी येणाऱ्या प्रत्येकाला ती १० पुस्तके आणि कपाट आवडीने दाखवत होतो आणि तिथूनच माझे स्वतःचे सुरू झाले पुस्तकालय. माझा मुलगा कॉम्प्युटर इंजिनीअर असून तोही वाचनवेडा झाला आहे. पत्नीही वेळ काढून वाचन करते. आजच्या घडीला संपूर्ण घराला वाचनालयाचे रूप आणलं आहे. इंग्रजी आणि मराठी पुस्तकांसाठी स्वतंत्र जागा करून घेतली आहे. घरातील देव्हाऱ्यावर तुकोबांचा 'आम्हा घरी धन शब्दाचीच रत्ने' अभंग लिहून ठेवला आहे. तो अभंग वाचला की, किचनमधील भांडीसुद्धा पुस्तकेच वाटतात. तुकोबाच्या आवलीला जसा काळ्याचा तिटकारा यायचा, तसा माझ्या आवलीला कधी-कधी या पुस्तकाचा तिटकारा येतो. तुकयाची आवली म्हणायची, विठयाला वेळ देतो; पण मला वेळ देत नाही. तशी ही माझी आवली कधी-कधी म्हणते, या पुस्तकाला वेळ देतो; पण मला वेळ देत नाही. हा वाद तर संताच्या घरात होता, मग माझ्या घरात का नाही होणार? एक संस्कृत सुभाषित आहे.

व्यसनानि सन्ति बहुधा व्यसन द्वयमेव!
विद्याभ्यसनं व्यसनं अथवा हरिपादसेवनं व्यसनम्।।

वाचनाची नशा सोपी वाटली, म्हणूनच वाचन श्वासासारखं सुरू ठेवलं.

सध्याच्या काळात मोबाइलमुळे लोकांचे वाचन कमी झाले आहे. ट्रेन, बसमध्ये प्रत्येक जण मोबाईलमध्ये डोळे घालून बसलेला दिसतो. बाहेर फिरायला गेलेला पर्यटक डोळ्यात निसर्ग साठवून ठेवण्यापेक्षा आपल्या मोबाइलमध्ये निसर्ग साठवून ठेवायच्या मागे लागलेला आहे. आणि घरी आल्यानंतर तोच निसर्ग मोबाइलमध्ये पाहायचा, असा पर्यटकवर्ग तयार झालेला आहे. मोबाइल, इन्स्टा, फेसबुक आणि त्यावर टाकलेले रिल्स पाहणं हेच खरं जीवन झालं आहे. सेल्फीच्या नादात कित्येक जणांचे जीवही गेलेले आहेत. प्रत्येक घरातील प्रत्येक व्यक्ती आपापल्या मोबाइलमध्ये दंग झालेली दिसून येते. मी स्वतःला नशीबवान समजतो.

माझ्या वाचन विचारधारेला माझा मुलगा पुढे वाट करून देत आहे. मी आणि माझा मुलगा एकाच ट्रेनमध्ये प्रवास करतो. वाचनाची आवड जागृत होण्यासाठी तिथेही आम्ही दहा वाचकांचा ग्रुप बनवला आहे. ग्रुपमधील प्रत्येक व्यक्तीला एक पुस्तक वाचायला देतो. ग्रुपमधील वाचक पुस्तक वाचून झाले की, मला किंवा माझ्या मुलाला दुसरे पुस्तक आणायला सांगतात. आम्हीही आवडीने त्यांना पुस्तक वाचायला घेऊन जातो.

पालकवर्ग आपल्या मुलांकडून वाचनाची अपेक्षा करतात आणि स्वतः मात्र मोबाइलवर असतात. हे पूर्णतः चुकीचे आहे. आपली मुले आपलेच अनुकरण करत असतात, हे पालकांनी लक्षात ठेवले पाहिजे. त्यासाठी पालकांनी वाचनाची सवय स्वतःला लावून घेतली पाहिजे. कुटुंबातील प्रत्येक सदस्यांनी मोबाइल वापराचे काही नियम लावून घेतले पाहिजे. इन्स्टाग्राम, फेसबुक अशी बरीच माध्यमं आपल्या अधोगतीस कारणीभूत ठरत आहेत. त्याचा मोजकाच वापर करायला हवा. विज्ञान शाप की वरदान, त्याप्रमाणे मोबाइल चांगला की वाईट, हा विचार आपणच करायला हवा.

वाचनसंस्कृती वाढवणे म्हणजे केवळ पुस्तके वाचन नव्हे, तर विचारांची देवाण-घेवाण, भाषेचा विकास आणि बौद्धिक समृद्धी, एकाग्रता, स्मरणशक्ती व सहानुभूतीत वाढ, समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन, संवाद कौशल्य व नातेसंबंधात सुधारणा, अशा कितीतरी गुणांमध्ये वाढ होते. वाचनाची सवय लावण्यासाठी व ती टिकवून ठेवण्यासाठी दिवसाला फक्त ५ पाने वाचणे आणि त्यासाठी एक विशिष्ट वेळ निश्चित करणे अत्यंत प्रभावी ठरते. यामुळे मेंदूला वाचनाची सवय लागते आणि वाचनाची गोडी वाढीस लागते. हा हेतू मनात ठेवूनच आम्ही कुटुंबीयांनी दिनांक ०१ जानेवारी २०२६ पासून मुक्त वाचनालय असा एक नवीन उपक्रम समाजासाठी सुरू केलेला आहे. दर रविवारी सकाळी ७ ते ९ या वेळेत सीवूड (नवी मुंबई) येथील ज्वेल ऑफ नवी मुंबई या निसर्गरम्य ठिकाणी आमच्या घरातील ५० इंग्रजी व ५० मराठी पुस्तके घेऊन जातो. त्याठिकाणी ही सर्व पुस्तके कोणताही मोबदला न घेता वाचनासाठी उपलब्ध करून देतो. अगदी मोफत. प्रत्येक वाचकांनी पुस्तक काळजीपूर्वक वापरून ते १५ दिवसांच्या आत परत करणे बंधनकारक आहे. तसेच वाचकांनी वाचलेल्या पुस्तकाबद्दलच्या प्रतिक्रिया आपल्या शब्दात ग्रुपवर टाकणे. आज जवळ-जवळ या मुक्त वाचनालयाचा ३०० वाचकवर्ग झालेला आहे. तसेच काही वाचक मित्रांनी त्यांच्या संग्रही असलेली पुस्तके मुक्त वाचनालयासाठी भेट म्हणून दिलेली आहेत.

वाचनवाटेवरील मोबाइलरूपी कचरा दूर करून त्या वाचनवाटेवर समाजाला आवडीने आणण्यासाठी हा नवीन उपक्रम सुरू केला आहे. ज्वेल ऑफ नवी मुंबई येथे लावलेल्या वाचनरूपी वेलाच्या फांद्या शहरातील प्रत्येक सोसायटीच्या प्रवेशद्वारापर्यंत नेण्याचा आमचा मानस आहे. लहान मुला-मुलींना वाचनाकडे आणि मैदानी खेळाकडे आकर्षित करतानाच अजून काय करू शकतो, यासाठी आमचे प्रयत्न असणार आहे. पुस्तक हेच चांगल्या वाटेवर नेण्याचे आणि संकटात आधार देण्याचे साधन आहे. वाचनसंस्कृती जपणे सामाजिक पातळीवर आणि वैयक्तिक; तसेच घरोघरी वाचनाची आवड निर्माण करणे, हाच मूळ उद्देश आमच्या कुटुंबाचा असणार आहे.

(कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.)

शिवरायांच्या विचारांची आजची गरज...

दामोधर दळवी

छत्रपती शिवाजी महाराज आपल्यात भिनवायचे असतील, तर आधी त्यांचा विचार समजून घ्या. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन्'. त्यांनी आपल्या कृतीतून हा विचार प्रत्यक्षात आणला. परिणामाची (Result) चिंता करून वेळ आणि ऊर्जा वाया घालवण्यापेक्षा, तीच ऊर्जा आपले कर्म सर्वोत्तम करण्यासाठी वापरणे म्हणजेच खरा 'कर्मयोग' होय. माझ्या एका मित्राने मला सांगितले की, मी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दलची अनेक पुस्तके वाचली आहेत; पण महाराजांनी कोणाचाही निर्देश जातीवरून केल्याचे एकही वाक्य आढळले नाही. महाराजांसाठी माणूस महत्त्वाचा होता, त्याची जात नव्हे; त्याचे कर्तृत्व, निष्ठा, शौर्य आणि स्वराज्याप्रति असलेले योगदान महत्त्वाचे होते. म्हणूनच महाराजांचे स्वराज्य हे कोणत्याही एका जातीचे नव्हते. ते माणसांना जोडून उभे केलेले स्वराज्य होते.

आज मात्र आपण काय पाहतो? वैयक्तिक फायद्यासाठी सामान्य माणसाच्या भावनांना पेटवले जाते. एकाने दुसऱ्याचा द्वेष करावा, एकाने दुसऱ्याला संशयाने पाहावे आणि आपण सगळे एकमेकांशी भांडत राहावे, यातून फायदा नेमका कोणाचा होतो? सामान्य माणसाचा निश्चितच नाही. म्हणून एक प्रश्न प्रत्येक शिवभक्ताने स्वतःला विचारायला हवा. महाराजांनी आपल्याला भांडायला शिकवले की संघटित व्हायला? महाराजांनी समाज फोडून स्वराज्य उभे केले नाही. महाराजांनी समाज जोडून स्वराज्य उभे केले. त्यांच्या स्वराज्यात विविध समाजघटकांनी आपापल्या कर्तृत्वाने योगदान दिले. योग्य माणसाला योग्य जबाबदारी देणे, शिस्त निर्माण करणे, प्रशासन उभे करणे, व्यापार आणि आरमाराचा विचार करणे, किल्ल्यांचे जाळे उभे करणे, ही त्यांची दूरदृष्टी होती. त्यांची दृष्टी काळाच्या पुढची होती. महाराज केवळ तलवार चालवणारे योद्धे नव्हते. ते उत्तम प्रशासक, संघटक, रणनीतीकार आणि दूरदृष्टी असलेले राज्यकर्ते होते. मला वाटते, आजच्या काळात महाराजांकडून शिकण्यासारखी सर्वात मोठी गोष्ट म्हणजे – आपल्या माणसाला उभे करा.

एखाद्या तरुणाने नवीन व्यवसाय सुरू केला असेल, एखाद्याने स्टार्ट-अप सुरू केला असेल, एखादा कलाकार नवीन कला निर्माण करण्याचे, एखादा शेतकरी नवीन प्रयोग करत असेल किंवा एखादा विद्यार्थी काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न करत असेल तर त्याला पहिला प्रश्न हा नसावा की, तो कोणत्या जातीचा आहे? तर प्रश्न असा असावा, आपण त्याला पुढे जाण्यासाठी काय मदत करू शकतो?

माझ्या एका मित्राने अलीकडे एक छोटासा स्टार्टअप सुरू केला. सुरुवातीला त्याला अपेक्षित पाठिंबा मिळाला नाही; पण तो खचला नाही. त्याचा महाराजांवर विश्वास आहे. तेच योग्य मार्ग दाखवतील, असे त्याला वाटते. त्याला जाणवले, आपण ज्या लोकांमध्ये भिंती शोधतो, तेच कदाचित आपल्यासाठी दरवाजे उघडत असतात. आपल्याकडेही अशीच संस्कृती निर्माण झाली पाहिजे. व्यापारी समाजातील एक गोष्ट मला विशेष भावते, कोणी नवीन व्यवसाय सुरू केला की, आपल्या समाजातील माणूस पुढे गेला पाहिजे या भावनेने त्याच्याकडून काहीतरी खरेदी करण्याचा प्रयत्न केला जातो. एखाद्याने नवीन काही सुरू केले की, ते कोरड्या शुभेच्छा, बुके देण्यापेक्षा संबंधितांकडून नवीन कार्याला पाठिंबा मिळावा, म्हणून काहीतरी खरेदी करतात. मला अलीकडील एका मराठी माणसाची गोष्ट आठवते. त्याने राजस्थानमध्ये चहाचा व्यवसाय सुरू केला, तेव्हा त्याचे मराठी मित्र शुभेच्छा म्हणून बुके देत होते, तर राजस्थानी मित्र पाकिटात पैसे देत होते. पैसे यासाठी की, नवीन व्यवसायासाठी थोडासा खर्च भागवता येईल. आपल्या समाजातील तरुणाने व्यवसाय सुरू केला, तर त्याचा पहिला ग्राहक आपण व्हावे. एखाद्याने नवीन दुकान/व्यवसाय सुरू केला, तर निदान एकदा तिथून खरेदी करावी. एखादा तरुण अपयशी होत असेल, तर त्याला हसण्याऐवजी पुन्हा उभे करावे. कारण समाजाची खरी ताकद घोषणा देण्यात नसते; समाजाची खरी ताकद आपल्या माणसाला उभे करण्यात असते. कारण महाराजांनी मला एक गोष्ट शिकवली, स्वतःच्या पायावर उभे राहा आणि इतरांनाही उभे करा.

माझे म्हणणे स्पष्ट आहे, द्वेष नको, भेद नको, समाजाचे तुकडे नकोत. मला असा समाज हवा आहे, जिथे कर्तृत्व पाहिले जाईल.

जिथे आपल्या माणसाच्या यशाचा हेवा न करता आनंद होईल. आणि जिथे हा माझ्या जातीचा आहे का? यापेक्षाहा आपला माणूस आहे; याला पुढे कसे नेता येईल? हा प्रश्न महत्त्वाचा असेल.

महाराजांची आठवण केवळ त्यांच्या जयंतीच्या दिनी करणे सोपे आहे. त्यांच्या नावाने घोषणा देणेही सोपे आहे; पण त्यांच्या विचारांप्रमाणे वागणे कठीण आहे. महाराजांचा विचार आपल्या कृतीत उतरवणे महत्त्वाचे आहे. महाराजांनी स्वराज्य उभे केले. आता आपली जबाबदारी आहे. एकमेकांना उभे करणारा, कर्तृत्वाचा सन्मान करणारा, उद्योजकतेला प्रोत्साहन देणारा आणि धर्म-जातीच्या भिंतींपेक्षा माणुसकीला मोठे मानणारा समाज उभा करणे. हाच महाराजांना खरा मानाचा मुजरा.

(अवर सचिव, महाराष्ट्र शासन.)

स्वरसाधना

अश्विनी पुजारी

पहाटेचा मंद वारा, वातावरणात दरवळणारी शांतता आणि घराच्या कानाकोपऱ्यातून अलगद उमटणारे रियाजाचे स्वर... काही घरांमध्ये ही केवळ दैनंदिन दिनचर्या असते; पण काही घरांमध्ये याच स्वरांमधून एक आयुष्य आकार घेत असते. क्षितिजा विजयकुमार वेदपाठक यांच्या आयुष्यात संगीताचा प्रवेश असा सहज, नकळत आणि अत्यंत नैसर्गिकरीत्या झाला. त्यांच्या आई, सौ. सुनीता वेदपाठक या जयपूर-अत्रौली घराण्याच्या अभ्यासू गायिका. विवाहानंतर संगीत विषयात पदव्युत्तर शिक्षण घेत असताना घरात अखंड रियाज सुरू असे. त्या स्वरांच्या सहवासात वाढणाऱ्या छोट्याशा क्षितिजाच्या मनात संगीताची बीजे रुजत गेली. अवघ्या पाच-सहा वर्षांच्या वयात ती स्वरांबरोबर गुणगुणू लागली आणि तिच्यातील संगीताची नैसर्गिक जाण आई-वडिलांच्या लक्षात आली. तेव्हाच तिच्या संगीतप्रवासाची पहिली पायरी रचली गेली.

संगीत ही तिच्यासाठी कधीच केवळ कला नव्हती; ती जीवनपद्धती होती. आईच्या मार्गदर्शनाखाली तिने अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालयाच्या विविध परीक्षा यशस्वीरीत्या पूर्ण केल्या. प्रत्येक टप्प्यावर स्वरांशी असलेली नाळ अधिक दृढ होत गेली. कोल्हापूर येथील 'स्वरगंधार म्युझिक ॲकॅडमी' या संस्थेतील सातत्यपूर्ण सांगीतिक वातावरणाने तिच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावली. जीवनात काही क्षण संपूर्ण प्रवासाची दिशा बदलून टाकतात. गुरुपौर्णिमेच्या एका कार्यक्रमात क्षितिजाचे गायन ऐकून जयपूर-अत्रौली घराण्याचे ज्येष्ठ गायक पंडित अरुण कुलकर्णी यांनी तिच्या गायकीतील सुरेलपणा आणि प्रामाणिक साधना ओळखली. 'उद्यापासून माझ्याकडे शिकायला ये', हे त्यांचे शब्द तिच्यासाठी गुरुकृपेचा आशीर्वाद ठरले. त्या दिवसापासून जयपूर घराण्याच्या गायकीतील बारकावे, रागदारीची सूक्ष्मता आणि सादरीकरणाची शिस्त तिच्या साधनेचा अविभाज्य भाग बनली.

औपचारिक शिक्षणातही तिची वाटचाल तितकीच उल्लेखनीय ठरली. शास्त्रीय संगीतातील डिप्लोमा अभ्यासक्रमात प्रथम क्रमांक, त्यासाठी मिळालेला लक्ष्मीबाई जाधव पुरस्कार, ब्रिज कोर्समध्ये दुसरे स्थान आणि त्यानंतर संगीत विषयातील पदव्युत्तर शिक्षणात विद्यापीठात प्रथम क्रमांक- ही यशाची मालिका केवळ गुणवत्तेची नव्हे, तर सातत्यपूर्ण परिश्रमांची साक्ष देते. डॉ. भारती वैशंपायन यांसारख्या विद्वानांचे मार्गदर्शनही तिच्या सांगीतिक व्यक्तिमत्त्वाला समृद्ध करणारे ठरले; परंतु संगीताचा खरा अर्थ केवळ परीक्षांमध्ये किंवा पदव्यांमध्ये सामावत नाही. तो गुरूंच्या सहवासात उमलतो. क्षितिजाच्या आयुष्यात हा निर्णायक टप्पा आला तो पंडित कैवल्यकुमार गुरव यांची मैफल ऐकल्यानंतर. निपाणी येथे त्यांच्या गायनाने ती अक्षरशः भारावून गेली. कार्यक्रमानंतर तिने चरणस्पर्श करून शिकण्याची इच्छा व्यक्त केली. तिच्या डोळ्यांतील जिद्द आणि स्वरांवरील निष्ठा ओळखून त्यांनी स्वत: तिला धारवाड येथे बोलावले. त्यांच्या या विश्वासाने प्रेरित होवून ती धारवाड येथे आसी आणि तिच्या संगीत प्रवासाला नवी दिशा मिळाली. गंगूबाई हनगल गुरुकुलात सुरू झालेली ही साधना आजही अखंड सुरू आहे. गुरुकुलात मिळालेली शिकवण ही केवळ राग शिकण्यापुरती मर्यादित नव्हती. ख्याल कसा विस्तारायचा, स्वराला कसा आकार द्यायचा, प्रत्येक सूर किती संयमाने आणि नेमकेपणाने साधायचा, रंगमंचावर कलाकाराचे व्यक्तिमत्त्व कसे खुलते, रियाजातील सातत्य किती महत्त्वाचे असते, आवाजाची जपणूक कशी करावी या प्रत्येक गोष्टीचा संस्कार त्यांच्या गुरूंनी तिच्यावर केला.

आजही मारुबिहाग राग शिकतानाचा एक अनुभव ती विशेष जपून ठेवते. अनेक वर्षे हा राग सादर करूनही त्या रागातील गंधाराचा खरा स्पर्श तिला गुरूंच्या मार्गदर्शनाखालीच अनुभवता आला. एका स्वरातील सूक्ष्म सौंदर्याची ती अनुभूती तिच्यासाठी संगीताच्या अनंत विश्वाची नवी दारे उघडणारी ठरली. त्या क्षणानंतर स्वर हे केवळ ऐकण्याचे नव्हे, तर अनुभवण्याचे माध्यम आहे, याची जाणीव अधिक गहिरी झाली. संगीतातील साधनेसोबतच तिने शैक्षणिक क्षेत्रातही उल्लेखनीय प्रगती केली. राष्ट्रीय पात्रता परीक्षा (NET) उत्तीर्ण होत तिने अध्यापनाचा मार्ग निवडला. सध्या मुंबई येथील मंत्रालयातील सचिवालयात संगीत शिक्षिका म्हणून ती कार्यरत आहे. अध्यापन आणि सादरीकरण या दोन्ही भूमिका ती तितक्याच समर्पित भावनेने सांभाळते. शास्त्रीय संगीत ही तिची ओळख असली, तरी तिच्या गायकीचा आवाका त्यापेक्षा खूप मोठा आहे. भक्ती संगीत, सुगम संगीत, नाट्यगीत, उपशास्त्रीय संगीत अशा विविध प्रकारांतून ती रसिकांशी संवाद साधते. प्रत्येक प्रकारात शास्त्रीय संगीताची पायाभरणी आणि भावविश्वाची समृद्धता जपत ती आपल्या सादरीकरणाला वेगळा आयाम देते.

विशेष म्हणजे संगीताबरोबरच तिने एमबीएचे शिक्षणही पूर्ण केले आहे. कला आणि व्यवस्थापन या दोन्ही क्षेत्रांचा समतोल साधत त्यांनी आधुनिक काळातील बहुआयामी कलाकाराचे उदाहरण ठरते. आजच्या वेगवान युगात शास्त्रीय संगीत मर्यादित वर्तुळात राहिल्याची भावना व्यक्त होत असली, तरी क्षितिजा वेदपाठक हिच्या मते हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत ही भारतीय संस्कृतीची सर्जनशील आणि आध्यात्मिक अभिव्यक्ती आहे. ते अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचून नव्या पिढीने त्याचे सौंदर्य अनुभवावे, हीच तिची मनापासूनची इच्छा आहे. त्यामुळे आजही तिचा प्रत्येक रियाज, प्रत्येक मैफल आणि प्रत्येक विद्यार्थ्याला दिलेला स्वर हा केवळ संगीत शिकवण्याचा प्रयत्न नसतो; तो भारतीय सांगीतिक परंपरेचा दीप पुढील पिढीकडे सुपूर्द करण्याचा एक प्रामाणिक संकल्प असतो. ज्ञानदानाचा हा पवित्र संकल्प क्षितिजा या कार्यातून पुढे नेत आहे. तिच्या या शास्त्रीय संगीताच्या ज्ञानाचा लाभ मंत्रालय जिमखान्यातील; तसेच अन्य अनेक विद्यार्थ्यांना होत असून, संगीत क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थी घडविण्याचे कार्य ती सातत्याने करत आहे. स्वरांशी जुळलेले हे नाते, गुरूंच्या संस्कारांनी समृद्ध झालेली ही साधना आणि संगीताला आयुष्याचे ध्येय मानण्याची ही वृत्ती यातूनच एका संवेदनशील कलाकाराचा आणि समर्पित संगीतसाधकाचा प्रवास निरंतर सुरू आहे.

(क्षितिजा वेदपाठक या मंत्रालयमध्ये जिमखाना मुंबई येथे संगीत शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. मोबाईल क्र.: ७७७४९६९०२५)

(सहायक संचालक, महाराष्ट्र शासन.)

खगोलशास्त्र म्हणजे काय?

ॲस्ट्रोनॉमी (Astronomy) म्हणजे खगोलशास्त्र ही एक नैसर्गिक विज्ञान शाखा आहे, ज्यामध्ये पृथ्वीच्या वातावरणाच्या बाहेरील अवकाश (तारे, ग्रह, सूर्य, चंद्र, आकाशगंगा) आणि विश्वातील सर्व खगोलीय घटनांचा अभ्यास केला जातो. यात प्रामुख्याने त्यांच्या निर्मिती, भौतिक गुणधर्म आणि हालचालींवर संशोधन केले जाते. खगोलशास्त्राच्या काही प्रमुख गोष्टी खालीलप्रमाणे आहेत :

अभ्यास विषय

यामध्ये लघुग्रहापासून (Asteroids) ते अब्जावधी प्रकाशवर्षे दूर असलेल्या आकाशगंगांपर्यंतच्या (Galaxies) सर्व गोष्टींचा समावेश होतो.

विज्ञान आणि भौतिकशास्त्र

हे पूर्णपणे भौतिकशास्त्राच्या नियमांवर (Physics) आणि निरीक्षणावर आधारित शास्त्र आहे.

दुर्बीण आणि तंत्रज्ञान

खगोलशास्त्रज्ञ अवकाश समजून घेण्यासाठी विविध प्रकारच्या दुर्बिणी आणि उपग्रहांचा (उदा. G$Space Observatories) वापर करतात.

खगोलशास्त्र

खगोलशास्त्र हे मानवाच्या सर्वांत जुन्या विज्ञानांपैकी एक आहे. हे शास्त्र आपल्याला विश्वात आपले स्थान समजून घेण्यास मदत करते. आकाशातील तारे, ग्रह, सूर्यमाला आणि आकाशगंगा यांविषयी जाणून घेताना मनात कुतूहल निर्माण होते. अवकाश संशोधनामुळे विश्वाची अनेक रहस्ये उलगडत आहेत. त्यामुळे खगोलशास्त्राचा अभ्यास ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी ठरतो.

टीम आपलं मंत्रालय

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया अधिक पारदर्शक

ब्रिजकिशोर झंवर

शालेय शिक्षण विभागाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून अकरावी प्रवेश प्रक्रियेत अधिक सुसूत्रता, पारदर्शकता आणि विद्यार्थी-केंद्रित सुधारणा केल्या आहेत. यापूर्वी काही महानगरपालिका क्षेत्रांपुरती मर्यादित असलेली ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया आता संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली आहे. न्यायालयीन निर्देश, विद्यार्थी-पालकांच्या सूचना आणि मागील अनुभवांचा विचार करून सुधारित केंद्रीकृत प्रवेश प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

राज्यातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांसाठी एकच ऑनलाइन अर्ज भरून राज्यातील कोणत्याही महाविद्यालयाची निवड करता येते. दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना पसंतीक्रम नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

प्रवेशासाठी तीन नियमित गुणवत्ता-आधारित फेऱ्या, त्यानंतर रिक्त जागांसाठी 'ओपन टू ऑल' विशेष फेरी; तसेच मुलींसाठी स्वतंत्र विशेष फेरीची तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना किमान एक आणि कमाल दहा पसंतीक्रम नोंदविता येतात. प्रत्येक फेरीत शाखा बदलण्याची; तसेच नियमानुसार प्रवेशानंतरही शाखा, माध्यम किंवा संस्थेत बदल करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

प्रवेश प्रक्रियेत वस्तुनिष्ठता राखण्यासाठी गुणवत्तेनुसार स्पष्ट निकष निश्चित करण्यात आले असून समान गुण असल्यास जन्मतारीख व त्यानंतर वर्णाक्षरानुसार प्राधान्य दिले जाते. महाविद्यालयांसाठी शुल्क विवरणपत्र ऑनलाइन प्रसिद्ध करणे, प्रवेशित विद्यार्थ्यांची व कट-ऑफची माहिती जाहीर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच गैरप्रकारांवर कठोर कारवाई, शुल्क परताव्याचे नियम, तृतीय-पक्षीय लेखापरीक्षण आणि राज्य, विभाग व जिल्हास्तरीय समित्यांद्वारे संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यात येणार आहे.

(विभागीय संपर्क अधिकारी, महाराष्ट्र शासन.)

आदिवासी कन्यांच्या सक्षमीकरणासाठी 'पिंक रूम'चा अभिनव उपक्रम

मनोज सुमन शिवाजी सानप

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील भालिवडी येथील आदिवासी शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या आश्रमशाळेत एक अत्यंत कौतुकास्पद आणि ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आले. निमित्त होते शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या भव्य 'शाळा प्रवेशोत्सवाचे'.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण (जि. रायगड) यांच्या वतीने आयोजित हा सोहळा आदिवासी मुलींच्या आरोग्य आणि संवेदनशील गरजांना एक नवी दिशा देणारा ठरला.

आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे यांच्या हस्ते 'पिंक रूम'चे भव्य उद्‌घाटन करण्यात आले. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण येथील प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे यांच्या कल्पकतेतून आणि अविरत मेहनतीतून ही पिंक रूम साकारण्यात आलेली आहे.

किशोरवयीन मुलींना मासिक पाळीच्या अत्यंत संवेदनशील काळात हक्काचा आराम, स्वच्छता, आणि मानसिक बळ मिळावे, या उद्देशाने वसतिगृहातील एका स्वतंत्र खोलीला अत्यंत सुसज्ज आणि सुंदर स्वरूप देण्यात आले आहे. या पिंक रूममध्ये प्रवेश करताच एका सुरक्षित वातावरणाची अनुभूती येते. मुलींच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी तेथे आरामदायी बेड, गरम पाण्याची पिशवी (हिटिंग जेल बॅग) आणि पिण्याच्या गरम पाण्याची विशेष सोय करण्यात आली आहे. यासोबतच प्रथमोपचार व औषध पेटी आणि वजन काटाही ठेवण्यात आला आहे. केवळ भौतिक सुविधांवर न थांबता, मुलींमध्ये आरोग्यविषयक साक्षरता निर्माण करण्यासाठी या खोलीत 'मासिक पाळीत काय करावे आणि काय करू नये' याचे माहितीफलक लावण्यात आले आहेत. मुलींचे मनोधैर्य वाढवण्यासाठी येथे इंदिरा गांधी, सावित्रीबाई फुले आणि सिंधुताई सपकाळ यांसारख्या महान व प्रेरणादायी स्त्रियांची पुस्तके असलेले छोटे ग्रंथालय उभारण्यात आले आहे. बालविवाह प्रतिबंध, सोशल मीडियाची सुरक्षितता आणि सर्व महत्त्वाचे आपत्कालीन हेल्पलाइन नंबर एकाच ठिकाणी उपलब्ध करून देऊन ही खोली मुलींसाठी खऱ्या अर्थाने 'सुरक्षित कवच' बनली आहे. रानावनांतून आलेल्या या आदिवासी कन्या आपल्या डोळ्यांत स्वप्नांचे मोती घेऊन जेव्हा शाळेच्या उंबरठ्यावर उभ्या राहतात, तेव्हा त्यांच्या पंखांना बळ देण्याचे काम या 'पिंक रूम'च्या माध्यमातून पेण प्रकल्पाने केले आहे.

(जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे/रायगड-अलिबाग तथा उपसंचालक (माहिती)
(अ.का) विभागीय माहिती कार्यालय बेलापूर, नवी मुंबई, महाराष्ट्र शासन.)

अधिकाऱ्यांचे आयआयएमसी, नवी दिल्ली येथे माध्यम व संवाद प्रशिक्षण यशस्वी

केंद्र शासनाच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या अखत्यारीतील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेश (IIMC) ही देश पातळीवरील एक नामांकित आणि अग्रगण्य माध्यम व जनसंपर्कविषयक प्रशिक्षण संस्था आहे.

नवी दिल्ली येथे मुख्यालय असलेली आयआयएमसी (IIMC) ही संस्था प्रशिक्षित जनसंपर्क अधिकारी, माध्यम तज्ज्ञ घडविण्यात सदैव आघाडीवर आहे. देशातील सर्वोत्तम माध्यम आणि पत्रकारिता शिक्षण संस्था म्हणून आयआयएमसीला सातत्याने विविध संस्थांकडून नामांकित केले गेले आहे. आयआयएमसीद्वारे राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकाऱ्यांसाठी जनसंपर्क व माध्यम व्यवस्थापनावर आधारित विशेष प्रशिक्षण दिनांक १३ ते १७ जुलै २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या विशेष पुढाकारातून महासंचालनालयातील वर्ग एक व वर्ग दोन अधिकाऱ्यांसाठी भारतीय जनसंचार संस्था (IIMC), नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेला पाच दिवसीय 'जनसंपर्क व माध्यम व्यवस्थापन' प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमाद्वारे राज्य शासनाच्या विविध विभागांतील जनसंपर्क अधिकारी, संचालक, उपसंचालक, जिल्हा माहिती कार्यालयांतील जिल्हा माहिती अधिकारी, माहिती अधिकारी, अशा विविध पदांवर कार्यरत असलेल्या एकूण २३ अधिकाऱ्यांनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला होता.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने अधिकाऱ्यांची माध्यमांशी प्रभावी संवाद क्षमता, जनसंपर्क कौशल्ये आणि आधुनिक संप्रेषण तंत्रज्ञानाची जाण अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने या प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. प्रशिक्षणामध्ये माध्यम व्यवस्थापन, जनसंपर्क, धोरणात्मक संवाद, डिजिटल संवाद, माध्यमांमधील कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि जनसहभाग, थेट प्रसारित होणारे कार्यक्रम; तसेच पत्रकार परिषदेचे नियोजन आणि आयोजन, प्रीबंकिंग आणि डिबंकिंग या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. आयआयएमसी, प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो (PIB); तसेच राष्ट्रीय माध्यम संस्थांतील तज्ज्ञांनी आपल्या व्यावहारिक अनुभवांवर आधारित सत्रे घेतली.

संकटकाळात नागरिकांपर्यंत अचूक, विश्वासार्ह आणि वेळेवर माहिती पोहोचविण्यासाठी आवश्यक संवादकौशल्ये विकसित करणे, अफवा व चुकीच्या माहितीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे; तसेच जनतेचा विश्वास टिकवून प्रभावी संकट व्यवस्थापनासाठी सक्षम संवाद व्यवस्था निर्माण करणे, हा या सत्राचा प्रमुख उद्देश असल्याचे प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोचे माजी प्रधान महासंचालक जयदीप भटनागर यांनी सांगितले.

प्रशिक्षणामुळे माध्यम व्यवस्थापन आणि धोरणात्मक संवाद कौशल्ये अधिक प्रभावी होतील. तसेच 'विकसित भारत २०४७' या उद्दिष्टांच्या पूर्ततेस हातभार लागेल, असा विश्वास सहभागी अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. यावेळी प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या सर्व अधिकाऱ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी आयआयएमसीच्या कुलगुरू डॉ. प्रज्ञा पालीवाल गौर, कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय संचार ब्युरो (सीबीसी) महासंचालक कांचन प्रसाद उपस्थित होत्या.

यावेळी महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्लीचे संचालक हेमराज बागुल यांनी प्रशिक्षण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भारतीय जनसंचार संस्था (IIMC), नवी दिल्लीचे अधिकारी, विविध विषयांवर मार्गदर्शन करणारे मान्यवर तज्ज्ञ; तसेच प्रशिक्षणात सहभागी झालेल्या सर्व

अधिकाऱ्यांचे आभार मानले. भविष्यातही अशा नामांकित संस्थांमध्ये विविध विषयांतील तज्ज्ञांचे मार्गदर्शन विभागातील अधिकाऱ्यांना मिळावे, यासाठी विभाग कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रशिक्षणादरम्यान मिळालेले ज्ञान, अनुभव आणि कौशल्ये भविष्यातील कामकाजात निश्चितच उपयुक्त ठरणार असून, माहिती प्रसारण, माध्यम व्यवस्थापन आणि जनसंपर्क व्यवस्था अधिक सक्षम, परिणामकारक व लोकाभिमुख करण्यासाठी अशा क्षमता-विकास प्रशिक्षणांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. बदलत्या माध्यमविश्वाशी सुसंगत कौशल्ये विकसित करण्यासाठी अशा प्रकारचे प्रशिक्षण निश्चितच मोलाचे आणि अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

लिहिते व्हा... आपलं मंत्रालय

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयनिर्मित ‘आपलं मंत्रालय’ हे गृहपत्रिका करण्याचे नियोजित आहे. मंत्रालयातील विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी यांनी आपल्या कथा, कविता, स्वानुभव, पाककला, भ्रमंती, विशेष छायाचित्रे, व्यंगचित्रे; तसेच विभागातील पदोन्नती, निवृत्ती या संदर्भातील साहित्य (युनिकोड वर्ड फाईल स्वरूपात) खालील दिलेल्या ई-मेलवर पाठवावेत.





आपलं मंत्रालय

प्रकाशने शाखा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, १७ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई. ई-मेल : aaplemantralay@gmail.com

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR
Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR